
महाराष्ट्राचे

# शिल्पकार

पद्मश्री
डॉ. विठ्ठलराव विखेपाटील



शिवाजी सावंत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

...N: RAJA BADSAL

विठ्ठलराव विखे पाटील :  मातीचा सच्चा देशभक्त

# विठ्ठलराव विखे पाटील -
## मातीचा सच्चा देशभक्त

शिवाजी सावंत

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

प्रथमावृती : एप्रिल २००२

महाराष्ट्राचे शिल्पकार : क्र. ५

प्रकाशक :
**सचिव,**
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ,
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय इमारत,
१७२, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय मार्ग,
दादर, मुंबई ४०० ०१४.

© प्रकाशकाधीन

मुद्रक :
**मायक्रोग्राफ**
रामदूत, २ रा मजला,
डॉ. भालेराव मार्ग,
गिरगाव, मुंबई - ४०० ००४

मुखपृष्ठ : राजा बडसल

किंमत : रु. ३५/-

*या पुस्तकात व्यक्त केलेली मते स्वतः लेखकाची असून या मतांशी साहित्य आणि संस्कृती मंडळ व महाराष्ट्र शासन सहमत असेलच असे नाही.*

# निवेदन

महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्या दिवंगत महनीय व्यक्तींचा महत्वपूर्ण सहभाग आहे अशा व्यक्तींची साधारणतः शंभर ते सव्वाशे पानांची सुबोध मराठी भाषेत चरित्रे लिहून ती "महाराष्ट्राचे शिल्पकार" या योजने अंतर्गत पुस्तकरूपाने प्रकाशित करण्याची मंडळाने योजना आखली असून या चरित्रग्रंथमालेतील 'मातीचा सच्चा देशभक्त - विठ्ठलराव विखे पाटील' हा पाचवा चरित्रग्रंथ आहे.

बेलापूरच्या गूळ बाजारात आपली गूळभेल्याची गाडी घेऊन गेलेल्या; परंतु कचरा मोल भावाने गूळ मागितल्यामुळे हबकलेला, बसल्या धसक्याने परतीच्या वाटेवर गूळभेलीवरच मरून पडलेला कुणीतरी लगड नावाचा शेतकरी बघून "कुठवर चालणार हे? कां? कशासाठी चालू द्यायचं हे? आज लगड गेला, उद्या आणि कुणीतरी जाईल. जाऊ द्यायचा? मग तोड काय याला? शेतकऱ्याला - काळ्या आईच्या या कष्टाळू पोराला कुणी वाली उरलाय की नाही? कां? कशासाठी? कुठवर चालायचं हे?"

अशा विचारांच्या ठिणग्या कसं बसं इयत्ता चवथीचा उंबरठा गाठू शकणाऱ्या लोणीसारख्या एका आडवळणाच्या गावात जन्मलेल्या शेतकऱ्याच्या मुलाच्या डोक्यात झडतात आणि याच ठिणग्या पेटून 'आशिया खंडातील पहिला वहिला साखर कारखाना आपल्या अथक परिश्रमाने व कमालीच्या व्यवहारकुशल दूरदृष्टीने महाराष्ट्रात लोणी बुद्रुक येथे १९६१ साली सुरू करणाऱ्या विठ्ठलराव विखे पाटील यांचे चरित्र रोमांचक तर आहेच पण मुख्यतः ते अभ्यासनीय आहे."

मराठीतील एक समर्थ लेखक श्री. शिवाजीराव सावंत यांनी लिहिलेला 'मातीचा सच्चा देशभक्त - विठ्ठलराव विखे पाटील' हा चरित्रग्रंथ मराठी वाचकांना निश्चितच प्रेरणादायी होईल, असा विश्वास वाटतो.

रा. रं. बोराडे
अध्यक्ष
*महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ*

मुंबई,
दिनांक: ४ मार्च, २००२

# मातीचा सच्चा देशभक्त - विठ्ठलराव विखे पाटील

आशिया खंडातील पहिला - वहिला सहकारी साखर कारखाना आपल्या अथक परिश्रमाने व कमालीच्या व्यवहारकुशल दूरदृष्टीने महाराष्ट्रात लोणी बुद्रुक येथे १९६१ साली सुरू करणाऱ्या विठ्ठलराव विखे पाटील यांचे चरित्र रोमांचक तर आहेच पण मुख्यतः ते अभ्यासनीय आहे. तसा हा कारखाना १९५० सालीच तयार झाला होता. प्रत्यक्षात हा कारखाना सर्व दृष्टींनी १९५० साली तयार असतानाही विठ्ठलरावांनी त्याचे लौकिक उद्घाटन तब्बल १० वर्षे थांबविले. त्यांना ते पंतप्रधान पं. नेहरूंच्या हस्तेच करावयाचे होते. या एकाच घटनेतून विठ्ठलरावांचा जिद्दी स्वभाव स्पष्ट होतो.

सोमवार दि. १५ मे १९६१ रोजी लोणी बुद्रुक येथील या कारखान्याचे रीतसर उद्घाटन भारताचे त्यावेळचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांच्या हस्ते झाले. त्यासाठी चिपाडासह ओल्या उसांच्या भाऱ्यांचेच २०-२५ फुटांचे लांब-रुंद असे जंगी व्यासपीठ बनविण्यात आले होते. नेहरूंच्या विमानाला उतरण्यासाठी जवळच विमानाची तात्पुरती धावपट्टी तयार करण्यात आली होती. पूर्वी 'भुताचा माळ' म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या या कारखान्याच्या जागेत शेतकऱ्यांचा प्रचंड जनमेळ जमला होता. मुंगी शिरकायला वाव नसावा असा नगरी पागोट्यांचा सागरच सागर या माळावर झुलत होता. जमलेल्या हजारो शेतकरी स्त्री-पुरुषांच्या कलकलाटाने 'भुताचा माळ' रोमांचून उठला होता.

केवळ नगर जिल्ह्यातच नव्हे, महाराष्ट्रात नव्हे तर उभ्या भारत वर्षात कृषी क्षेत्राच्या आघाडीवर इतिहासाने आपल्या पानांवर सुवर्णाक्षरात नोंदवावं असं आक्रीत घडत होतं. व्यासपीठावर त्यावेळी विराजमान झालेल्या प्रमुख पाहुण्यांत

होते महाराष्ट्राचे त्यावेळचे अत्यंत लोकप्रिय व दूरदृष्टीचे मुख्यमंत्री (स्व.) यशवंतराव चव्हाण, त्यांच्या शेजारीच बसले होते भारताचे थोर अर्थशास्त्रज्ञ धनंजयराव गाडगीळ, त्यावेळचे महाराष्ट्राचे राज्यपाल श्रीप्रकाशजी आवर्जून उपस्थित होते.

पंडीतजींचं विमान लोणी बुद्रुकच्या भुताच्या माळावर उतरताच जमलेल्या भोवतालच्या हजारो शेतकऱ्यांनी उठून उभे राहून सन्मान देत गगनभेदी आरोळ्या उठविल्या 'पं. जवाहरलाल नेहरू की ऽऽ - ज ऽऽ य! भारत माता की ऽऽ - ज ऽऽय, विठ्ठलराव विखे पाटलांचा ऽ ऽ - विजय असो ऽऽ!'

नेहमीच्या ढंगानं व्यासपीठाच्या पायऱ्या तरातरा चढत लालबुंद चर्येचे पांढरा शुभ्र खादी वेषधारी नेहरू व्यासपीठावर चढलेही. स्वागत, प्रास्ताविक होताच त्यांची धीर गंभीर वाणी लोणी बुद्रुकच्या भुताच्या माळावर घुमू लागली -

''विद्वान व श्रीमंत अशी मोठी माणसे मोठी कार्य करतात, हे मला माहीत आहे, परंतु कमी शिकलेली, लहान माणसेदेखील मोठे कार्ये करू शकतात, हे मला आज कळले! विखे पाटलांसारखा एक सामान्य शेतकरी केवढे मोठे कार्य करू शकतो, हे मी आज पाहिले. खरोखर आज देशाला, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अशाच राष्ट्रभक्तीची गरज आहे. श्री. विखे पाटील हे त्या अर्थाने खरे 'देशभक्त' आहेत! त्यांचे कार्य पाहून मी अक्षरशः थक्क झालो आहे. या देशात गाजावाजा न करता असामान्य प्रतीचे काम करणारे शेतकरी आहेत, ही गोष्ट माझ्या मनात रुजली. आजपर्यंत बारा फूट उंचीचा ऊस मी कधी पाहिलाही नव्हता. आज तो पाहिला.

''नव्या शोधाचा व नव्या शास्त्राचा उपयोग करून महाराष्ट्रातील शेतकरी सहकारी पद्धतीने शेती व उद्योगधंदे कार्यक्षमतेने करू शकतो, अशी माझी खात्री झाली आहे. सामान्य शेतकरी माणसे सहकार व संघटना या बळावर ग्रामीण भागात केवढी मोठी कारखानदारी उभी करून ती चालवू शकतात, हे मी पाहत आहे.

''देशात आता मी जेथे जेथे जाईन, तेथे तेथे आठवण देऊन लोकांना सांगेन, की आपण प्रवरानगराला जरूर भेट द्या. तेथील कार्यपद्धती पाहा व सर्वसामान्य माणसें किती विशाल कार्य करू शकतात, याचे प्रत्यंतर पाहा. प्रवरानगरच्या उदाहरणावरून अनुभव घेऊन देशाचे चित्र बदलून टाका!

''देशाच्या राष्ट्रपतींनी दिलेली 'पद्मश्री' ही पदवी स्विकारण्यासाठी काही दिवसांपूर्वी विठ्ठलराव दिल्लीला - भारताच्या राजधानीत आले होते. त्यावेळी त्यांची माझी भेट झाली होती, तर आज मी विखे पाटलांच्या राजधानीत आलो आहे! मी त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देऊन दीर्घायुरारोग्य चिंतितो. जयहिंद!''

पं. नेहरूंनी मनापासून केलेलं हे मूळचं भाषण त्यांच्या ढंगदार हिंदी भाषेत आजही उपलब्ध आहे. इथं त्याचा सोयीसाठी मराठी तर्जुमा दिला आहे. पं. नेहरूंच्या मुखातून ही रसभरीत प्रशंसा ज्यांना लाभली ते विठ्ठलराव विखे पाटील यांचा जन्म अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर तालुक्यातील लोणी बुद्रुक या गावी झाला. त्यांची जन्मतारीख होती १-७-१८९७. त्या दिवशी गुरुवार होता. भारतीय कालगणनेप्रमाणं हा दिवस आषाढ शुध प्रतिपदेचा होता. त्या दिवशी पुनर्वसु नक्षत्र होते. शके १८१९ चं हेमलंब नामसंवत्सर होतं. विठ्ठलरावांची ही अधिकृत जन्मतारीख त्यांच्या जन्मगावच्या - लोणी बुद्रुकच्या प्राथमिक शाळेतील रजिस्टरमध्ये नोंद केलेली आहे.

विठ्ठलरावांची आजी राधाबाई नेहमी अंदाजाने सांगत आली. त्याप्रमाणे त्यांची जन्मतारीख सन १९०१ च्या नारळी पौर्णिमेची धरण्यात आली. आजही त्यांचे वर्धापन दिन या परिसरात याच तारखेला धरून साजरे होतात.

विठ्ठलराव ज्या घराण्यात जन्मले, ते विखे पाटील यांचे मूळ घराणे पुण्याजवळच्या जेजुरीकडचे असावे, तसे त्यांची आजी राधाबाईच सांगत असे. विठ्ठलरावांच्या खापर पणजोबापासूनच 'विठोजी' हे नाव मुलाला देण्याची प्रथा चालत आलेली असावी. विठ्ठलरावांचे वडील एकनाथराव विखे पाटील. या एकनाथरावांच्या वडीलांचे नाव विठोजी होते. या आजोबा विठोजींच्या वडीलांचे नाव खंडोबा होते. हे खंडोबा हे नाव जेजुरीचे प्रसिद्ध देवस्थान खंडेराय याच्या नावाने दिलेले असावे. या खंडोजीच्या वडीलांचे नावही विठोजीच होते. आजोबांच्या स्मरणार्थ मुलाला नाव ठेवावे अशी प्रथा या विखे पाटील घराण्यात असावी. आजही विठ्ठलरावांच्या मुलाचे खा. बाळासाहेब पाटील यांचे मूळ नाव एकनाथ असे आहे. ते आजोबांच्या स्मरणार्थ ठेवलेले आहे.

पद्मश्री विखे पाटील यांचे वडील हे लोणी बुद्रुकचे शेतकरी होते. ते

पंढरीचे वारकरी होते. त्यांच्याकडे कसणुकीला मोजकीच शेती होती. एकनाथरावांच्या पत्नीचं म्हणजे विठ्ठलरावांच्या आईचं नाव गंगुबाई. सर्वजण मायेनं तिला गंगाई म्हणत. गंगुबाईचं माहेर लाखगंगा. माहेरचं आडनाव चांदगुडे. गंगाईचे वडील शंकरराव. हे विठ्ठलरावांचे आईकडून शंकर आजोबा. त्यांची पत्नी शकुंतलाबाई ही विठ्ठलरावांची आईकडून शकुंतला आजी. विठ्ठलरावांना दोन चुलते होते. तात्याबा विखे पाटील आणि दगडूबा विखे पाटील अशी त्यांची नावे होती. तात्याबाला दोन मुलगे होते. विठ्ठलरावांना दोन चुलत भाऊ होते. एक मुरलीधर, दुसरा रामकृष्ण. त्यांच्या दगडूकाकाला काही मुलबाळ नव्हतं.

विठ्ठलरावांना सख्ख्या अशा पाच बहिणी होत्या. कान्होबाई, द्वारकाबाई, बबईबाई, बड्याबाई, वेणूबाई अशी त्यांची नावे होती. विठ्ठलरावांच्या जन्मानंतर एकनाथराव विखे पाटलांना दोन आवळ्या-जावळ्या मुली झाल्या. पण त्या लहानपणीच वारल्या. विठ्ठलरावांना एकुलता एक मोठा भाऊ होता. त्याचे नाव शंकरराव. एकूणच विखे पाटलांच्या घरात मुलींचं पीक अधिक होतं.

विठ्ठलरावांना गंगाईकडून तीन मामा होते. लाखगंगेच्या या तीनही मामांनी भाचा विठ्ठल याला अतिशय मायेची, लाडाची वागणूक दिली. लाख मोलाचं नातं होतं हे मामा-भाचरांचं. या मामांची नावं होती - आनंदराव, भीमराव आणि विठ्ठलराव अशी.

लोणीत विठ्ठलरावांचं बालपण पाच बहिणींच्या मेळात आणि शंकरदादांच्या सहवासात मजेत गेलं. बालपणी विठ्ठलराव गंगाईपेक्षा अधिक निकटच्या सहवासात राहिले ते राधाज्जीच्या. राधाज्जी हे विठ्ठलरावांच्या जीवनातील मर्मबंधाचं नातं होतं. या गावरान आजीच्या ठायी व्यावहारिक कुशलपण ठासून भरलं होतं. ती दिसायला गोरीपान, शिडशिडीत, अंगलटीची व तरतरीत होती. घारीचं घरट्यातल्या पिलावर असावं, तसं तिचं आपल्या दोन्ही नातवांवर सदैव आणि सावध लक्ष होतं. विठ्ठलरावांचं आपल्या शंकरदादावर आदरयुक्त विलक्षण प्रेम होतं. हा शंकरदादाही कमालीचा कष्टाळू व शंकरासारखाच सरळसोट सांब स्वभावाचा होता. लोणीच्या शाळेत राधाज्जीच्या धाकानं विठ्ठलराव दाखल झाले. पण त्या शाळेत ते फार काळ रमू शकले नाहीत. कसे बसे इयत्ता चौथीचा उंबरठा ते गाठू शकले. चौथीतच शाळेतून पारख्या झालेल्या विठ्ठलरावांनी

लोणी भवतीच्या मोकळ्या आभाळाखाली निसर्गाची शाळाच आपली मानली.

तो १९ व्या शतकातील पहिल्या दशकाचा काळ होता. त्या काळात शेतकऱ्यांच्या पिकानं भरलेल्या शिवारांवर हटकून टोळधाडी पडत असत. अशी एक जबरदस्त टोळधाड लोणीतील शिवारावर पडलेली असताना ती लहान्या - विठोबानं ५ व्या - ६ व्या वर्षीच पाहिली होती. होय.... अंगाची चण लहानखोर असल्यामुळं विठ्ठलाला सगळे सोबती 'लहानू' म्हणत असत. हाच 'लहानू' एवढं महान काम करणार याची त्यावेळी कुणालाचा कल्पना नव्हती. या टोळधाडीनं शेतातील उभ्या पिकांचा हा-हा म्हणता केलेला चट्टामट्टा 'लहानू'नं पोरवयातच समक्ष पाहिला होता. या नैसर्गिक आपत्तीचा खोलवर ठसा त्याच्या बालमनावर स्पष्ट उमटला होता. विशेषतः यावेळी गावकरी व मुलं-बाळं टोळांची अंडी गावचावडीवर पायली मापट्यानं मोजून घालून त्यासाठी मिळणारे आणे-रुपये घेताना त्यानं बघितलं होतं. याचाही सखोल परिणाम विठोबावर ऊर्फ लहानू याच्या बालमनावर झाला होता. उभं पीक फस्त करणारे टोळ आणि त्याचीच अंडी विकणारी माणसं - असा जीवनातील कमालीचा विरोधाभास त्याला स्पर्शून गेला होता.

विठ्ठलरावांचे पहिले लग्न त्यांच्या बालपणीच झाले. १९१५-१६ साली ही घटना घडली. त्यांच्या पत्नीचं माहेरचं नाव जाईबाई होतं. सासरी तिचं नाव पार्वतीबाई ठेवण्यात आलं. ती पाथरे बुद्रुक येथील श्री. गणपतराव घोलप-पाटील यांची कन्या होती. लग्नात सासऱ्यांनी नवरदेवाला साजेसा आहेर केला. कसला? तर बोटाला सोन्याची आंगठी, हातात चांदीचं कडं आणि पायात चक्क चांदीचा तोडा! पार्वतीचं लग्नाच्या वेळी वय होतं बारा-तेरा वर्षांचं! त्या काळच्या प्रथेप्रमाणे पाळण्याला बाशिंग बांधली जात. त्यापेक्षा हे कितीतरी बरे होते.

विठ्ठलरावांच्या किशोर वयात दोन गावांना फार महत्त्व आलं होतं. एक होतं सायळ व दुसरं होते पुणतांबे. सायळ लोणीपासून दक्षिणेला २-३ मैलांवर होते. ते नाथपंथांचे मूळ पुरुष अवधूत दत्तात्रयांचं ठिकाण होते. 'शंकरबाबांचा मठ' म्हणून त्याची नाम्ना चौफेर पसरली होती. तसंच तेथे एक जुनं-पुराणं, चांगलं टुमदार असं दत्तमंदीरही होतं. विठ्ठलराव आपले मित्र नारायण जोशी ऊर्फ बाबूराव महाराज, शंकर मैड, दशरथ मस्के यांच्यासह दर गुरुवारी

दत्तदर्शनासाठी सायळला जात.

या सायळला एक महादूबाबा नावाचे तथाकथित साधू होते. त्यांच्या अंगात संचार होतो असे त्यांचे भक्त वारूवार सांगत. महादूबाबा दत्ताचा अवतारच आहे असे नाना प्रकाराने येणाऱ्या प्रत्येक भक्ताच्या मनावर ठसवत. याचा परिणाम असा झाला की विठ्ठलरावांनाही संसार सोडून संन्यास घ्यावा अशी जोरदार उबळही येऊन गेली. त्यांचे परममित्र बाबूराव महाराज जोशी यांनी त्या काळात विठ्ठलरावांना हिताच्या नाना प्रकारच्या गोष्टी सांगून त्यांचं मन थाऱ्यावर आणलं. जवळच्या पुणतांबे या चांगदेव महाराजांच्या गावाची गोडी त्यांच्या मनात उत्पन्न केली. परिणामी विठ्ठलराव चांगदेव, ज्ञानोबा यांच्या वारकरी पंथाकडे वळले.

एके दिवशी पुणतांब्याच्या चांगदेव महाराजांच्या समाधी स्थानावर हात जोडून त्यांनी मित्रवर्य बाबूराव जोशी यांच्यासह शपथच घेतली, "चांगदेव महाराज आयुष्यात जे जे काही हाती घेईल ते ते निर्धाराने शेवटाला लावील. तुम्ही हटयोगी आहात. माझ्यावर कृपा करा. माझ्या पाठकण्यात केलेला निर्धार पूर्ण करण्याची ताकद भरा. तुमचे गुरू ज्ञानोबा माऊली यांना सांगून अवती-भवतीच्या माझ्या गोर-गरीब माणसांबाबतचा माझ्या मनातील कळवळा ढळू देऊ नका. लोणीच्या धाकल्या पाटलाचं काही चुकलं-माकलं असेल तर ते मोठ्या पदी पदरी घ्या. 'अलक निरंजन - पुंडलिक वरदा हऽऽरी विठ्ठल!"

विठ्ठलरावांनी चांगदेव महाराजांच्या समाधीला साक्षी ठेवून मूकपणे मनोमनी उच्चारलेला हा 'अलक निरंजन' पुढे त्यांच्या जीवनभर नांदीसारखा निनादत राहीला. जेव्हा केव्हा ते जीवनाच्या वाटचालीत अडी-अडचणीत आले, तेव्हा-तेव्हा डोळे मिटून ते स्वतःशीच 'अलक निरंजन' - 'गुरुदेव दत्त' व पुंडलिका वरदा हरी विठ्ठल!' असं म्हणत. आणि एक अनामिक प्रेरणेनं त्यांचं कुणबाऊ, छातवान आत्मविश्वासानं भरून येई. समोर केवढाही अवघड प्रश्न असला तरी हा लोणीचा धाकला पाटील मग मुळीच डगमगत नसे. त्यांच्या पुढील सर्व जीवनचरित्रात याचे कितीतरी रोकडे दाखले बघावयास मिळतात.

अशातच त्यांच्या जीवनातील एक अविस्मरणीय प्रसंग घडला. ते झरेकाठी गावात होळीच्या सणासाठी गेले होते. गाव चौकात नुकत्याच पेटून गेलेल्या होळीचा राखाडी हुडवा दिसत होता. त्याच्या भोवती झाडून सारे झरेकाठकर

जमले होते. एवढी माणसं होती, पण कुणी चकार शब्द बोलत नव्हतं. एक दोंदील लठ्ठसा माणूस हातातील बाकदार काठी वरचेवर उडवत तावातावाने म्हणत होता, 'तुम्हीच सांगा सर्व काठकरांनो,हे असंच व्हायला लागलं, तर कसं द्यावं आम्ही कर्ज या गावच्या लोकांना? सापिकासुद्धा दिला नाही यानं आणि म्हणतोय कसा - शेडजी, ह्यां डाव माफ करा. जप्ती मागं घ्या. पाया पडतू - पोरं उपाशी पडत्याल माझी. दया करा.''

त्याच्या इकडे-तिकडे फिरणाऱ्या बागदार नगरी जोड्याला पुन्हा पुन्हा हात लावून एक लंगोटी, काचोळधारी, फेट्याच्या दशा झालेला, काळवंडल्या चर्येचा, दाढीचे खुंट वाढलेला, झरेकाठचा रापट शेतकरी पुन्हा पुन्हा फक्त 'शेडजी शेडजी' एवढंच काकुळतीनं कसंबसं म्हणत होता. त्याला काहीतरी सांगायचं होतं; त्यासाठी तो तडफडत होता. शेठजी त्याला तशी उसंत-अवसरच घेऊ देत नव्हता. बघ्यांची तर हीऽ गर्दी जमलेली होती. शेतकरी बांधवांचा शिमगाच चालला होता. जशा कुस्तीच्या आखाड्यात झाली होती, तशी विठ्ठलरावांची कानपाळी होळीचा चूड लागल्यागत रसरसून लालेलाल झाली. कानांत तो आवाज 'घुईं-घुईं' पायीचे जोडे बाजूला फेकून विठ्ठलरावांनी काखोटीत हात घालून पहिल्यानं त्या शेतकरीबाबाला, ''ऊठ, डरू डगमगू नगंस. आगुदर ताठ खडा ठाक. काय नि कसंबसं झालंय, ते बयाजवारीनं सांग समद्यांस्नी.'' म्हणत नीट उठता केला.

तो हातच्या काठी - मांडीवर भार टाकत वर उठला व हाताची बोटं कपाळाला लावून विनवून सांगू लागला, ''बाबा, या शेडजीचं येजासगट सम्दं करज फारकत केलंया, एक पै दिकुन बाकी न्हाई शेडजीची माझ्यावर. गावदेवाची आन घिऊन सांगतोय म्या. शिपत्, काय न्हाई बाकी म्या शेठजीची. कुनी ऐकत न्हाई माझं.''

विठ्ठलरावांनी त्या शेतकरीबाबाची वकिली घेऊन शेडजीला हडसून खडसून विचारले, ''काय, मोगलाई चाललीय का ही, शेठजी? काय म्हणतो हा बाबा? काही बाकी नसताना तुमची कशापायी छळ मांडलाय् येवढा या गरिबाचा?''

शेठजीनं त्याहून चढ्या आवाजात विठ्ठलरावांना डाफरलं, ''काय डोकं फिरलंय काय आमचं, पाटीलबुवा? त्यो सम्दं कर्ज दिलंय म्हणतो. दाखव म्हणावं त्याला पावत्या. कर्जाची ही बघा प्रामिसरी.''

शेठजीनं खिशात हात घालून प्रॉमिसरी नोटच विठ्ठलरावांपुढं फेकली.

विठ्ठलरावांनी त्या शेतकरीबाबाला विचारलं, "व्याज दिलंस, मुद्दल फेडलंस - काय हाय का पावती - बिवती संगट?"

मान डोलावत तो पहिल्यापेक्षा काकुळीनं म्हणाला, "काय न्हाई, जी. आम्ही आनाडी माणसं - येवढं कुठं उमागतंय आमास्नी? पार्वती बिवती न्हाई काय माझ्याकडं?"

"अहो, पैशेच दिले नाहीत यानं, तर कुठली असणार पावती ह्याच्याकडं? तुम्ही मधी पडू नगा. हटा बघू!" म्हणत शेठजीनं जहाली करत विड्याच्या पानांवरून सुपारी हटवावी, तसं विठ्ठलरावांना अल्लाद बगलेलाच केलं.

विठ्ठलराव आणि सारे झरेकाठकर बघत असतानाच शेठजीनं आपल्यासंगती आणलेले दोन लाठीधारी दाणगट लाठ्या पेलत पुढे सरसावले. हां हां म्हणता त्यांनी बाबाच्या खोपटापुढच्या रांजणावर लाथ हाणून तो फोडला. कुडासकट खोपट उघडून टाकलं. भेदरून आतच चिडीचाप बसलेली त्याची बायको-पोरं रडत-भेकत बाहेर पडली. बाबाच्या पाठीत चार दणके बसले. तो कळवळला - चक्क तोंडावर हात ठेवून कोकलला. काय करणार होतं दुसरं बापडा! आज त्याच्या लोटक्या-मडक्याच्या संसाराची होळीच नव्हती का पेटविली शेठजीनं?"

"वाळीत टाका याला समद्यांनी. कर्ज बुडवा हाय हा!" म्हणत त्याच्या शिवाराच्या जप्तीचा कागर हातात नाचवत शेठजी झरेकाठच्या होळी-चौकातून फटाफट जोडे वाजवत निघून गेला.

अनवाणी चालताना तळपायात टोकदार खडा रुपावा, पाय वर्म धरून दुखरा व्हावा, खडा टोचल्याजागी चांगली कडक केळणी आपोआप तयार व्हावी, तशी 'शेठजी - सावकार - कर्ज' या शब्दांबद्दल प्रत्यक्ष दत्तगुरुंनीही विभूती फासली तर निपटता निपटणार नाही, अशी अढीच अढी विठ्ठलरावांच्या बांड्या पाटील मनावर पसरली. सुरवंट त्यालाच न कळणाऱ्या कोषात गुरफटला. तिटकरा तिटकारा आला एकच एका शब्दांचा 'क र ज!'

१९१८ साली नगर इलाख्यात फार मोठा दुष्काळ पडला होता. त्याचा लाभ उठवत लोभी सावकारानं अडाणी व नडलेल्या नगरी शेतकऱ्यांच्या कित्येक जमिनी घशात घातल्या. या दुष्काळामुळे नगरी शेतकरी बांधवांची झालेली ससेहोलपट प्रत्यक्ष समोर बघताना दत्तभक्त विठ्ठलराव विखे पाटलांचा ऐन तारुण्यातील

आत्मा कळवळून गेला. पत हरवलेल्या आर्थिक कुचंबणेच्या दलदलीत कसलेल्या आपल्याच हाडामासांच्या शेतकरी बांधवांसाठी काही तरी केलं पाहिजे. हे त्यांना यावेळी प्रकर्षाने स्पर्शून गेलं.

महाराष्ट्राच्या म्हणजे तेव्हाच्या मुंबई इलाख्याच्या सहकारी क्षेत्राच्या आघाडीवर यावेळी एक लक्षणीय घटना घडत होती. मुंबईत याच दरम्यान 'सेंट्रल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट'ची स्थापना झाली होती. पण प्रवासाची व वाहतुकीची काहीही साधने उपलब्ध नसल्याने मुंबई नगर जिल्ह्यापासून व बुद्रुक बेलापूरपासून कितीतरी लांब होतं.

ज्या क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा व चक्रवर्ती विक्रमी जीवनाचा झेंडा विठ्ठलरावांनी लावला, त्या क्षेत्राच्या दृष्टीने १९१८ साली एक पायाभूत घटनाही घडली होती. परक्या ब्रिटिश सरकारने केवळ संख्यात्मक वाढीपेक्षा गुणात्मक वाढ डोळ्यासमोर ठेवली. आपल्या सरकारला उपयोगी ठरेल असे चलाऊ सहकारी क्षेत्र तयार करण्याचे धोरण समोर ठेवले. त्यावेळच्या मुंबई इलाख्यात म्हणजे आजच्या महाराष्ट्रात सहकाराचा पाया घातला. १९१८ सालीच 'बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट' म्हणजेच आजच्या 'महाराष्ट्र राज्य सहकारी संघाची' स्थापना केली.

हे गोऱ्या सरकारने का केले होते? तर तत्कालीन शाळा-कॉलेजांमधून बाहेर पडलेली शिक्षित पिढी जशी शाळा मास्तर, कारकून तशीच ती सहकारात चाकरमानी म्हणून येण्याची शक्यता होती. विशेष म्हणजे १९१८ च्या भयाण दुष्काळाची काडीभर सुद्धा दखल या ब्रिटिश सरकारने घेतलेली नव्हती.

यातच दत्तभक्त असलेल्या विठ्ठलरावांनी आपल्या भक्तमैत्रांचं एक 'पोथीमंडळ' सुरू केलं. संध्याकाळी रोजच्या पोथीला वाढीव माणसं जमू लागली होती. जुने मैतर दाट घसटीचे - घसटीचे कसले, घरचेच झाले. नवे केव्हा पोथी-मंडळात दाखल झाले, ते कळलंही नाही. पैठणला जसं एकनाथ महाराजांचं चौसोपी घर होतं, तसं आता लोणीला व पंचक्रोशीला विठ्ठलरावांच्या आबांचं - एकनाथबाबांचं घर झालं होतं.

विठ्ठलराव आणि शंकरदादानं एक विचारानं गुऱ्हाळ वाढवायचं योजलं. खड्याच्या, सोनारपट्टीच्या, बेंदाच्या शेतांवर नव्या विहिरी खोदून घेतल्या. उसाचं

रान वाढीव धरून त्याला मोटवानाचं पाणी द्यायचा सपाटा त्यांनी सुरू केला. उसाच्या लावणीचे वाफारे उठवावं, खूप मेहनतीचं काम. ते उभारताना त्यांचे कनोटे कसे भरून येऊ लागले. त्यांना केल्या मशागतीचं काही वाटायचं नाही, कारण डोळ्यासमोर आट्यापाट्याच्या मैदानागत आखीव-रेखीव ऊस-शिवार डुलताना दिसायचं. सारा शिणोटा त्याच्या नुसत्या दर्शनानंच कुठच्या कुठं पसार व्हायचा.

एक रोज मात्र सांजच्याला हातचं फावडं बगलेला ठेवून शंकरदादा बांधावर कसातरीच निसूर बसला. जवळ जाऊन त्याला चिंतागतीनं विठ्लरावांनी हटकून विचारलं, ''काय झालं रं, दादा? गपसा दिसतोस?''

वर न बघता तो छातवानावर हात ठेवून म्हणला, ''काही न्हाई, इठ्ठला. धाप लागली वाईच.''

तो म्हणाला, 'वाईच', पण ते तसं नव्हतं. जसे दिवस जाऊ लागले तसं त्याला श्वास घेणं जड जाऊ लागलं. त्याला श्वास घेणं जड जाऊ लागलं, तशी त्याची काळजं जडाऊ झाली. विठ्ठलरावांनी - त्यांच्या आबांनी गाडी करून त्याला संगमनेरला दागतरला दाखवून आणलं. त्यांनी दिली, ती भारी दवा-औषधी त्याला केली. गावठी झाडपाल्याचा त्याच्या श्वासावर मारा करून बघितला. अंगारे-धुपारे झाले. पोथी वाचणारे म्हस्केबुवा तर पोथी ऐकताना तो एकटाच नाही, हे बघून - 'आता थांबू या, मंडळी,' म्हणत मध्येच थांबू लागले.

शंकरदादा लई मोठा होता. औषध-उपचार घ्यायचा, पण नको म्हटलं, तरी चाबूक-फावडं घेऊन रानात जायचाच.

एक रोज विठ्ठलराव व दादा दोघे वायले वायले असे रानातल्या टोकांना मशागत करत होते. सांज झाली. किन्नाट धरून आलं. विठ्ठलराव मशागत आवरून मधभागच्या खोपीजवळ परतले. समदं गडी माणूस परतलं, तरी शंकरदादाचा मात्र काहीच पत्त्या नव्हता. आता येईल, मग येईल, म्हणून वाट बघून ते सारे दमगीर झाले. शेवटाला संगती दोन गडी घेऊन ते पुन्हा शिवारात उतरले.

एका बांधावर पांढरट ठिबका दिसताच विठ्ठलराव बरगडीच्या देठातून चरकले. खेचल्यासारखे झपाझप पुढं झाले. तो शंकरदादाच होता. झोपल्यासारखा

तो बांधाला चिकटला होता. बगलेला फावडं पडलं होतं. विठ्ठलराव जवळ जाऊन त्याला उठता करण्यासाठी गदागदा हलवीत, "दादा, अरं दादा ऊठ की, रं! गपसा दिसतोस?" म्हणत त्याच्यावर कोसळले.

कारण त्यांना ठाऊक होतं, तो झोपलाच होता - आधी कधी न उठण्यासाठी!

विखे पाटलांच्या लोणीतील शेतातील मशागतीचं काम मोठा मुलगा शंकर याच्यावर पडलं होतं. शंकरदादा स्वभावानं नेक होता. कमालीचा कष्टाळू होता. पण लोणीच्या पांढरीचा रखवालदार असलेल्या म्हसोबाच्या मनात काही आगळंच होतं. जोवर शंकरदादा शिवारात राबत होता, तोवर लहान्या विठ्ठलावर कसलीच जबाबदारी नव्हती. तो खांद्यावर 'एळकी' घेऊन शेळ्या-मेंढ्यांच्या खांडामागं रानभर फिरत असे. एळकीनं आपल्या शेळ्या-मेंढ्यांना रानातील निवडक झाडांचा शेलका पाला खाली पाडून चारणं हा लहानूचा उद्योग होता. विठोबा त्यात मनापासून रमलाही होता. अशातच त्याच्या जीवनाला वळण देणारा पहिला प्रसंग घडला. १९१९ साली एके दिवशी शंकरदादा जो शिवारात गेला, तो घरी परतलाच नाही. श्वासाच्या विकारानं शेतावरच्या बांधावर निष्प्राण पडलेल्या शंकरदादाचा देह लोणीकरांना बघायला मिळाला. यावेळी विठोबा ऊर्फ लहानू ऊर्फ विठ्ठलरावांचं वय होतं २३ वर्षे.

शंकरदादा गेला आणि विखे पाटलांच्या घराच्या दाबजोर बारदान्याची जोखीम येऊन पडली ती जवान विठोबाच्या खांद्यावर. ती पडताच त्यांनी अंगभूत धोरणानं काही निर्णय घेतले. प्रथम त्यांनी विख्यांच्या दावणीचं खिल्लार कमी केलं. स्वतःसाठी एक नेम ठरून घेतला - काहीही काम केलं नाही तरी शिवारावर रोज एक तरी धावती चक्कर टाकायचीच.

विठोबाच्या लोणी गावाजवळूनच नाशिक भागातील भागवत पंथी वारकऱ्यांची दिंडी हरसाल टाळांच्या गजरात पंढरीकडं जाई. आषाढाच्या दिवसात या पंढरीच्या वारकरी दिंडीच डोळाभर दर्शन घेऊन तिच्यासंगती काही मैल विठ्ठल नामाच्या गजरात चालण्याचं भाग्यही या लोणीच्या तरुण विठोबाला तरुणपणीच मिळालं.

१९१८-१९ साली नगर जिल्ह्यात मानमोडीची म्हणजे एन्फ्ल्यूएंझाची मोठी साथ येऊन गेली. या साथीत विठ्ठलरावानं रुग्णांना धान्यवाटपाचं मोठं काम

अंगभूत प्रेरणेनं मनःपूर्वक स्वतः समक्ष उभा राहून केलं. परिणाम असा झाला की ते स्वतःच मानमोडीच्या साथीनं प्राणांकित आजारी पडले. या काळात त्यांच्या (स्व.) शंकरदादाच्या पत्नीनं म्हणजे विधवा वहिनीनं - भागीरथी बाईनं फार परीश्रमपूर्वक व ममतेनं त्यांची सेवा केली.

१९२० च्या दरम्यान लोणी बुद्रुकची गाव पाटीलकी विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील यांच्याकडे आली. लहानूचा विठोबा झाला होता. विठोबाचा आता रीतसर विठ्ठलराव झाला - पाटील झाला. कसं होतं या गावपाटील विठ्ठलराव विखे पाटील या जवान रांगड्या नगरी शेतकऱ्याचं रूपडं? तर डूईला साफ धुलाईचा घेरेदार पांढरा पटका, कपाळी गोपीचंदाचा टिळा, गळ्यात माळ, हातोऱ्याची बंडी, त्यावर खिशांचा पांढरा मातकट कोट, खांद्यावर सफेद उपरणं, धोतर, पायी नगरी बाकदार जोडे, हाती नगरी तडाख्याच्या ऊनतिरिपेला वारण्यासाठी छत्री. गावोगावची रपेट साधण्यासाठी विठ्ठलरावांनी एक नामी, गुणवंत व चपळ अशी घोडीही खरेदी केलेली. तिचं नाव त्यांनी अत्यंत कौतुकानं ठेवलं ते 'सारंगी'!

'सारंगी' हा विठ्ठलरावांच्या जीवनचरित्रातील एक पर्वाचाच विषय आहे. या इमानदार सारंगीला एखाद्या एकनिष्ठ सेवकासारखं सोबतीला घेऊन विठ्ठलरावांनी पुढं महाराष्ट्राच्या सहकारी जगतातील एक कधीही पुसलं न जाणारं 'सहकारी रामायण' रचूनही दाखवलं.

विठ्ठलराव पाटील झाले तेव्हाच महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर एक मोठी पोकळी निर्माण झाली होती. १ ऑगस्ट १९२० रोजी मुंबईच्या सरदारगृहात बाळ गंगाधर टिळकांचं दुःखद निधन झालं होतं. 'स्वराज्य' हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविनच' ही भारतीयांसाठी काळ्या दगडावर रेघ ठरलेली अमर घोषणा लो. टिळकांनी भरल्या न्यायालयात इंग्रज न्यायाधिशासमोर निडरपणे केली होती. त्यावेळी भारताची लोकसंख्या सुमारे ३० कोटी होती. या ३० कोटीत असं छातीठोकपणे म्हणणारा हा पहिलच महापुरुष ठरला.

'स्वराज्य' हा कोट्यवधी भारतीयांचा कळीचा प्रश्न होता. त्याला लो. टिळकांच्या मुखातून उद्‌गार तर मिळाला होता. हे 'स्वराज्य' कुणासाठी, कशासाठी व कसं हे अद्याप ठरायचं होतं.

पोथी मंडळात पोथी भ्रमणातून विठ्ठलरावांच्या मनात आता आळंदी, पंढरपूर, गाणगापूर, नरसोबाची वाडी, नारायणपूरजवळील कानिफनाथ अशा लहान-थोर तीर्थक्षेत्रांबद्दल एक जिवाभावाच्या गाठीची ओढ निर्माण झाली. तसंच कीर्तनकार, वारकरी, 'बोले तैसा चाले' या व्रताचे संन्यासी, बुवा, बैरागी यांच्याबद्दल जिव्हाळा वाटू लागला.

गुलाम देशाला गुलामीच्या खाईतून बाहेर खेचण्यासाठी धडपडणाऱ्या असंख्यात वीर स्त्री-पुरुषांची नावं कानांवर पडत होती. वारकऱ्यांबद्दल होता तेवढाच जिव्हाळा विठ्ठलरावांच्या मनात या कार्यकर्त्यांबद्दल येऊ लागला. पण पंचवीस वर्षांच्या या ऐन बांड्या उमरीतही विठ्ठलरावांच्या मनात जबरदस्त ओढ होती, ती नाथ सद्गुरू दत्तात्रयाचीच! त्यामुळं घरच्या ओसरीवर गुरुचरित्र, नवनाथ-कथासार अशा पोथ्यांची पारायणं चालूच होती. पोथी-वाचनाचं काम धार्मिक म्हणून विठ्ठलरावांचे मैतर दशरथबुवा म्हस्के यांनी आता आपणहून पत्करलं होते. जुने पंडित गुरुजी कुठंतरी दुरगावी निघून गेले होते.

विठ्ठलरावांचं सायळला दर गुरुवारी महादूबाबांच्या दत्तमठात जाणं चालूच होतं. या दर्शन फेरीत त्यांच्यासंगती महाराज, दशरथबुवा म्हस्के, शंकर मैड, त्र्यंबक वाबळे ही मंडळी असायचीच.

त्यावर्षीच्या दत्तजयंतीनं मात्र त्यांच्यातील भोळ्या, श्रद्धाळू भक्तीवर चांगलाच हात फिरवला. दत्तात्रयांचीच कृपा म्हणायची ती! यावर्षी असेच ते सारे दत्तभक्त मैतर सायळच्या महादूबाबांच्या मठात गेले. जातानाच दशरथबुवा म्हस्के थोडेसे कुरकुरतच होते. त्यांचा थोरला मुलगा काशिनाथ घरी फार आजारी होता. या काशिनाथलाही विठ्ठलरावांच्या शंकरदादासारखी धाप लागत होती. श्वास घेणं जड जात होतं.

दशरथबुवा म्हणतच होते, ''काशिनाथ लई आजारी हाय. तुम्ही व्हा म्होरं, मी थांबतो.''

पण त्यांनी काही त्यांचं ऐकलं नाही. बळं बळं भरीला घालून त्यांना सायळच्या वाटेला लावलंच. सालाबादप्रमाणं सायळच्या दत्तमठात सगळे विधी, कार्यक्रम पार पडू लागले. दुपार टळतीला लागली, तसं दशरथबुवांच्या घराकडून वर्दी घेऊन एक लोणीकर धापखत सायळला आला. म्हणाला, ''दशरथबाबा,

हाइसा तसं चला लोणीला. काशिनाथला धाप लागलीय. डोळे फिरवतोय. काही खरं न्हाई त्याचं."

महादूबाबा डोळे मिटूनच म्हणाले, "त्याला काय म्हणजे काय हुनार न्हाई. तुम्ही जायची गरज न्हाई. आल्या माणसासंगं ही विभूती द्या. लावा त्येच्या कपाळाला - काय हुनार न्हाई, भरवसा ठेवा.

महादूबाबांचे ते ठोस बोल ऐकून भिजल्या पावसातल्या पाखरागत ते सर्वजण सायळच्या मठात त्यांच्यासमोर हात जोडून भिंतीलगत गुमान उभेच राहिले. एक म्हणता दुसरा, तिसरा अशी पाठोपाठीनं दशरथबाबांच्या घराकडून वर्दीदार माणसं येतच राहिली. काकाळून हात जोडत म्हणत राहिली, "काशिनाथला भेटाय तरी चला. त्येचा श्वास वरच्या वर लागलाय" - ते ऐकताना समोरच्या धुनीत धुराचा भपकारा उठविणारी कसली तरी मूठ टाकून महादूबाबा डोळे मिटून म्हणत राहिले, "दत्त महाराजांच्या सावलीत हाय त्यो! काय न्हाई हुनार न्हाई त्येला. डरू नगा. हलू नगा."

सांज झाली. मठात दत्तआरती घुमून उठली.

*"धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरुरायाची।*
*झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची॥"*

झपाझप पावलं उचलत सारे मैतर चिडीचाप झालेल्या दशरथबाबांसंगती लोणीला परतले. म्हसक्यांच्या अंगणात माणसांचं भिरं पडलं होते. महादूबाबांच्या विभूतीनं वा धूपाच्या धसकाऱ्यानं हात टेकले होते. दशरथबाबा म्हस्केंच्या वीस वर्षाच्या तरण्याबांड काशिनाथच्या जीवाच्या ज्योतीचं 'विमान' काही रोखून ठेवलं नव्हतं. ते विठ्ठलरावांसह साऱ्या दत्तभक्तांना हसत वर उडालं होतं. काशिनाथ गेला होता. उपचार, इलाज न होता आपल्या जन्मदात्या वडिलांना न भेटता! त्याच्या हंबरड्या फोडणाऱ्या आईचं सांत्वन करायला विठ्ठलरावांच्याजवळ शब्दच नव्हते. ते काशिनाथला लहान भावाच्या - विश्वनाथाच्या पाठीवर फक्त हात थोपटत राहिले. त्यांना कळून चुकलं की त्रिकालज्ञानी दत्तात्रयाला भजायचं झालं, तर त्यासाठी महादूबाबांसारख्या दलालाची गरज नाही. कुठलं तरी दत्ताचं तीर्थस्थान आपलं आपणच निवडून, मूकपणे मनोमन अवधूत दत्तात्रयांची गाजावाजा न करणारी, निष्ठेची आराधना केली पाहिजे.

त्यांच्या सख्ख्या भावानं - शंकरदादानं त्यांना एक धडा शिकविला होता - शिवार आणि शिवारातील माणसं कशी राखावी याचा. आता म्हसक्याच्या काशिनाथनं त्यांना दुसरा धडा शिकविला. माणसांची धार्मिकता हेही डोळ्यात तेल घालून जपावं असं एक शिवारच आहे. मात्र त्यात अंधश्रद्धेचे तण माजता उपयोगी नाही.

एकदा ते आणि महाराज असे जोडीनं जाऊन अकोल्याच्या भंडारदरा धरणाचं बांधकाम बघून आले. पाण्याचा तो अमाप, उदंड साठा बघताना त्यांचे डोळे कसे निवून गेले. पण त्यांच्या इलाख्याच्या दुष्काळात तरसणाऱ्या जमिनी डोळ्यांसमोर येताच काळीज न कळणाऱ्या आगीनं धगधगत राहिलं. का मिळू नये या पाण्याचा थेंब-थेंब किसान बांधवांच्या जमिनीच्या तुकड्या-तुकड्याला?

कसं करायचं हे? कोण ऐकणार त्यांचं? एक ठिणगी त्यांच्या कुणबाऊ काळजावर पडली होती. कुठंतरी दूरवर धग धरून मुरली होती.

भंडारदऱ्याच्या पाट-पाण्यामागं ब्रिटिश सरकारचा काय हेतू असावा? याचा ते विचार करू लागले.

त्यांच्यापुढं चित्र साफ होऊ लागलं. नुकतंच पहिलं महायुद्ध लढून हटलं होतं. पुन्हा ते पेटलं, तर गोऱ्या सरकारला गाठीला धान्य पाहिजे होतं. चाकरीला लढाऊ सैन्य पाहिजे होतं. त्यांनी पाहणी, सरतपास करून हे धरण बांधायचं ठरवलं होतं.

धरणाच्या फिरलेल्या पाण्याच्या पाटाभोवती असलेल्या एक-दोन एकर मालकीच्या सहित शेतकऱ्याच्या जमिनी मात्र 'उपळून' जात होत्या. दलदलीनं त्या तशाच नापीक पडून राहत होत्या. ज्या काही थोडक्यांची ऐपत होती, त्यांनी पाटाचं पाणी विकत घेतलं होतं. त्यांतल्यासुद्धा केकांची पाणी-पट्टी भरण्याची कुवत नसल्यानं बाकी वाढत होती. त्यांच्यासुद्धा कित्येक जमिनी त्यामुळं लिलावात निघत होत्या.

महाराष्ट्रातच नव्हे तर उभा भारतवर्ष खेड्यापाड्यांनी आजही भरलेला आहे. अशा एका ठिपक्यासारख्या लोणी बुद्रुक या खेड्याची पाटीलकी विठ्ठलरावांकडे आली. ती येताच मनानं वारकरी असलेले व वृत्तीनं दत्तभक्त असलेले विठ्ठलराव आपलं गाव लोणी व परिसर कसा आबादान व सुक्षेम होईल या विचाराने कामाला

लागले.

कठल्याही गावाचं शिवार हे फुलतं, बहरतं ते मुख्यतः पाण्यावर. तसंच ते फुलारतं ते त्याची मुलासारखी ठेवलेल्या निगराणीवर आणि वेळोवेळी केलेल्या अचूक मशागतीवर व खतपुरवठ्यावर. बी पेरल्यापासून पीक राशीने घरात येईपर्यंत शेतकरी ते कधीच आपलं मानीत नाही. पारतंत्र्याच्या या काळात नगर जिल्ह्यात १९०१ साली इंग्रजांनी आपल्या सोयीसाठी 'विल्सन' नावाचं धरण बांधलं. तेच 'भंडारदरा' धरण होय. या काळात ते बांधून पूर्ण झालं नव्हतं तरीही त्यात जो पाणी साठा होता, तो शेतीला पुरविला जात होता. मात्र त्यात एक गोम होती. हा पाणीपुरवठा फक्त तालेवार शेतकऱ्यांना तोंड बघून दिला जात होता. त्यातही कलेक्टर ऑफिसकडं ज्यांची वट असेल, त्या दाबजोर असामींनाच शेतीसाठी हे पाणी मिळत होतं. अशा तालेवार शेतकऱ्यांच्या शिवारांना लागून असणाऱ्या एक-दोन एकराच्या शेतमालकाला म्हणजे सादिलवार शेतकऱ्याला या धरणातील पाण्याचा थेंबही मिळत नव्हता. ज्या तालेवारांना हे पाणी मिळत होतं, त्यांच्या रानालगतच्या अशा सादिलवार शेतकऱ्यांच्या एक-दोन एकरांच्या जमिनी मात्र शेजारीच होणाऱ्या वारेमाप पाणी पुरवठ्यामुळं उपळून जात होत्या म्हणजे दलदलीच्या होत होत्या. त्यांची पिकं हाकनाक व नमुन्यावारी वाया जात होती. लोणीच्या गावकामगार पाटलांच्या - विठ्ठलरावांच्या गरूड नजरेनं हा पाण अन्याय अचूक हेरला. त्यांच्या जीवनातील सहकारी रामायणातील 'पाणकांडा'ला प्रारंभ झाला.

लोणीत विठ्ठलरावांचे शंकरराव कुलकर्णी नावाचे जिव्हाळ्याचे दत्तभक्त मित्र होते. त्यांच्यासह जाऊन त्यांनी अकोल्याचं भंडारदरा धरण बारकाव्यानं बघून घेतलं. अशातच लोणीच्या शिवारात एक मजेदार घटना घडली. एक लोणीकर शेतकरी एके दिवशी अचानक विठ्ठलरावांच्या घरी आला. गयावया करीत म्हणाला, 'पाटील माझा मशागतीचा तरणाताठ बैल रानात उपणलेल्या जमिनीत रुतून बसलाय, त्याला लवकर बाहेर काढला नाही तर तो जागीच मरेल. माझी शेती बसेल. चला.' ते ऐकताच विठ्ठलराव डुईला पागोटे गुंडाळून, अंगात कोट चढवून घराबाहेर पडले. नावनिशीने हाका मारत त्यांनी १०-१२ गावकरी गोळा केले. सगळ्यांच्या मदतीने कासरी लावून 'व्हय गड्या - व्हयशाऽ' अशा ललकाऱ्या देत एकजुटीनं तो जंगी बैल दलदलीतून सुखरूप बाहेर काढला.

ही घटना विठ्ठलरावांच्या पुढील जीवनकार्याची सूचक अशी पताकास्थानाची घटना ठरली. या वेळीच जसं काही विठ्ठलरावांच्या सुप्त मनात एका विचाराचं बीज पडलं की हा इथून तिथवर पसरलेला कष्टकरी समाज पुरुष असाच अज्ञानाच्या, कर्जाच्या, किंकर्तव्यभावनेच्या दलदलीत रुतून पडला आहे. त्यांच्या मनातील दत्तभक्त व विठ्ठलभक्त वारकऱ्याला धरून एक धारकरी आपोआप जसा काही हुंकार घेत होता.

याच वेळी महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक आघाडीवर आणखी एक पोकळी निर्माण होत होती. १९२२ साली महाराष्ट्रातील बहुजनांच्या जीवनातील कायापालट करण्यासाठी डोळस व दूरदृष्टीची पाऊलं टाकणाऱ्या एका महामानवाचा अंत होत होता. बहुजनांचा राजकारण, समाजकारण, शिक्षण, शेती, व्यायाम अशा सर्वच आघाड्यांवर कैवार घेणारे राजर्षी छ. शाहू महाराज यांचे मुंबईतच दि. ६ मे १९२२ रोजी दुःखद निधन झाले. घराघरातील मराठी माणूस हळहळला. आपल्या पत्नीला-सावित्रीबाई फुले यांना त्यांच्याच नावाची शाळा काढून विद्यार्थिनी म्हणून शाळेत दाखल करणाऱ्या म. फुले यांच्या 'शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही' या महामंत्राचाच पाठपुरावा राजर्षी शाहू छत्रपतींनी जीवनभर अटीतटीने केला होता.

या वेळी ऐन जवानीत असलेले विठ्ठलराव विखे पाटील छोट्याशा लोणी गावात गावकामगार पाटील म्हणून शब्दशः असंख्य आघाड्यांवर झुंजत होते. स्वतः ते तर नव्हतेच पण त्यांच्या अवती-भवतीही पुरेशी लिखापढी झालेला एकही माणूस नव्हता. कसा होता विठ्ठलराव विखे पाटलांच्या अवती-भवतीचा परिसर? गावोगावचे शेतकरी ठार अडाणी होते, कर्जबाजारी होते. ठिकठिकाणच्या शेतकऱ्यांची शिवार लहान-सहान कारणासाठी सुद्धा सावकार निर्दयपणे भर चौकात लिलावात काढत होते. अनेक लहान-सहान शेतकऱ्यांच्या उपळलेल्या पाणथळ जमिनी नापीक होत्या. सालोसाल दुष्काळाचे तडाखे बसतच होते. अधून-मधून टोळधाड, मानमोडी, प्लेग अशी संकटं कोसळतच होती. जमीन एकीकडं, पाणी एकीकडं, कर्जबाजारी हवालदील झालेला एकूण एक शेतकरी एकीकडं, त्यांच्या जमिनी संधी मिळेल तेव्हा घशात कोंबायला टपलेला बोके- वानाचा सावकारी पाश सगळीकडं. तोंड बघून पाणी देणारे पाणीपट्टी अधिकारी दुसरीकडे. असा सगळा 'विस्फोट' झालेला माणसाला हताश-हताश करून टाकणारा नजारा

विठ्ठलरावांभोवती आ वासून पसरलेला होता.

माणसाचा माणसाशी कसलाच मेळ नव्हता. त्यामुळं नाना प्रकारच्या अंधश्रद्धा बोकाळल्या होत्या. शेतीसाठी लोखंडी नांगर लागतो, हेही कैक शेतकऱ्यांना माहीत नव्हतं. पिकांची खतं, औषधं यांचा तर पत्ताच नव्हता. शिवता-शिवत, स्पृश्य-अस्पृश्य याचा तर पावलोपावली पडताळा येत होता. अशा स्थितीत गावपाटील म्हणून एखाद्या युगप्रवर्तक कामाच्या दिंडीची पताका खांद्यावर घेणं म्हणजे मासळी बाजारात सुगंधी उदबत्ती लावण्यासारखंच ठरणार होतं.

विठ्ठलरावांच्या देखरेखीखाली आलेली वडिलोर्जित जमीन चार ठिकाणी विभागून पसरलेली होती. कुठं दोन-चार एकर, कुठं चार-सहा एकर अशी ती वेगवेगळ्या ठिकाणी होती, सलग नव्हती. या चारही जमीन तुकड्यांना खडा, तरटी, बेंद, इनाम अशी नावं आपोआपच पडली होती.

समोर आव्हानांचा गरजता दर्या पसरलेला असतानाच विठ्ठलरावांच्या जीवननौकेनं दुसरं वळण घेतलं. १९२३ साली त्यांच्या पूज्य व प्रिय पिताजी एकनाथराव विखे पाटील यांचं दुःखद निधन झालं. शंकरदादा गेलाच होता, आता बाबाही गेले. आता विठ्ठलराव पूर्णतः एकाकी झाले.

विठ्ठलरावांच्या लोणी बुद्रुक या गावात महाराष्ट्राच्या सर्व खेड्यात होते तसेच दोन पाट्यांचे दोन फड होते. एक धावण्यांचा, दुसरा विख्यांचा. दसऱ्याच्या होळीला अग्रपूजेचा मान कोणाला, बळी पाडण्याला बळीचा पहिला मान कोणाला, चैत्री पाडव्याला गुढी पहिल्यांदा कुणाच्या दारात उभारायची, अशा क्षुल्लक कारणासाठी धावणे व विखे यांच्यात कडक तोंडातोंडी होई. परस्परांच्या आई-माईचा उद्धार होई. मग एक पक्ष डूक धरून दुसऱ्या पक्षाच्या जनावरांना रानात विषबाधा करवी. आताशा तर गावात कधी धावण्याचं एखादं जनावर विषबाधेनं रानात आडवं होई तर दोन दिवसांत विख्यांचं जनावर कोसळे.

हे सर्व बघून पाटील म्हणून मनोमन वैतागलेल्या विठ्ठलरावांनी त्या वर्षीच्या गावसभेत सर्वच लोणीकरांना परखड शब्दांत धारेवर धरलं. या सभेला कडलग, धावणे, मुसळे, मैड, राठी, विखे असे झाडून सारे लोणीकर हजर होते. सर्वांना उपदेशून, नाकावर घामथेंब तराळलेले विठ्ठलराव सात्विक संतापाने कडाडले, 'होळी, दसऱ्याला, पाडव्याला अग्रमान कुणाचा म्हणून भांडताय? गावची

पाटीलकी कुणाकडं म्हणून परस्पर कुजबुजताय? एकमेकांची जनावरं परगावचे जनावरांना विष देणारे टगे हाताशी धरून मारताय! उद्या तेच टगे शिरजोर होऊन तुमच्या नरड्यावर फरशीचं पातं धरतील हे विसरताय! तुमच्या या गमज्या मी मुकाट्यानं बघत राहीन असं वाटतंय काय, फाकड्यांनो? हे ताबडतोब थांबणार आहे की नाही? मी तुम्हाला गावपाटील म्हणून मान्य आहे की नाही? स्पष्ट बोला.' विठ्ठलरावांच्या त्या बिनतोड, खुल्लमखुल्ला सवालानं लोणीकर टरकले. अप्पा बापू विखे त्यांना जोड देत म्हणाले, 'विठ्ठलराव, लोणीचे पाटील तुम्हीच. तुम्ही सांगाल ते आम्हा सर्व लोणीकरांना मान्य आहे.'

ते ऐकून विठ्ठलरावांनी आपल्या अटीतटीच्या गावसभेचा जो अजब निवाडा दिला, त्यातच त्यांच्यातील नेतृत्वगुणांचा पडताळा येतो. सर्व गावकऱ्यांवर आपली वारकरी नजर फिरवून विठ्ठलराव शांतपणे म्हणाले, 'इथून पुढं कुठल्याही सणाच्या अग्रपूजेचा मान लोणी गावातील कुणाचाच राहणार नाही! या वर्षीच्या अग्रपूजेचा मान वैजापूर तहसिलातील डोणगावच्या अप्पा गणपती डोखेला द्यायचा. पुढील वर्षापासून कुणाला द्यायचा ते त्यांच्या सल्ल्यानं सर्वांनी ठरवायचं. आहे कबूल?'

या ऐतिहासिक गावसभेला जमलेल्या लोणीकरांनी एकमुखाने प्रतिसाद दिला, 'आहे कबूल!'

'लोणी गावची पाटीलकी कुणाची म्हणून भांडताय! आजपासून पाटीलकी पाच वर्षे धावण्यांकड व पुढील पाच वर्ष विख्यांकडं राहील. आहे कबूल?'

अर्थातच सर्व गावकरी प्रतिसादले, 'पाटील, आहे कबूल!'

या गावसभेपासून विठ्ठलराव तमाम गावकऱ्यांचे प्रिय असे 'अप्पा' झाले. म्होरके झाले. लोणीतील बाबासाहेब धोगरे, दगडूबा विखे, सखाराम म्हसके, त्रिंबक वागळे, शंकर भंवर, धोंडीराम दौलतराम, भाऊ दावणे, बळवंत विखे, बापू धावणे, गोपा विखे अशा सहकाऱ्यांच्या मदतीने गावात पहिली 'पतपेढी' उभी करण्याचा घाट घातला. लोणीत व भवतीच्या ५-२५ खेड्यांत सामान्य शेतकऱ्याची एकच स्थिती होती. त्याला समानात 'पत' म्हणून कसली ती मुळीच नव्हती. सर्व शेतकरी समान अज्ञानानं आणि नाना प्रकारच्या अंधश्रद्धांनी दारिद्र्याच्या चिखलात गळ्याएवढा रुतला होता. कोल्ह्याच्या वृत्तीचे सावकार, त्यांची शेते कर्जापोटी बळकावित होते. अनेकांचे उभे संसार गाडग्या-मडग्यासकट

लिलावात निघत होते. ठार अडाणी असलेले स्त्री-पुरुष कसलाच एकमेळ नसल्याने मुकाटपणे गावात होणारे हे जप्तीचे लिलाव डोळे विस्फारून बघत होते. रोगराईनं कमालीचा उच्छाद मांडला होता. मरण येत नाही म्हणून माणसे जगत होती. देशात स्वातंत्र्य अद्याप फार दूरच होतं.

भवतीच्या या सर्व प्रतिकूल अंधःकारातच दि. २३।१।१९२३ रोजी 'लोणी बुद्रुक सहकारी पतपेढी' ही संस्था विठ्ठलराव विखे पाटील यांनी नोंदविली. श्रीरामपूर तालुक्यातच नव्हे, नगर जिल्ह्यातच नव्हे, केवळ मुंबई इलाख्यातही नव्हे तर हिंदुस्थानच्या सीमा पार करून उभ्या आशिया खंडातील पहिलीच ठरणारी ही सहकारी संस्था होणार होती याची लवभरही त्यांना कल्पना नव्हती. आपल्या जिवाचं उडाण घालून त्यांनी हे सहकारी रोप लोणी बुद्रुक या भारतीय खेड्यात सच्चा शेतकरी मनानं लावलं होतं.

या संस्थेच्या नोंदणीमुळेच विठ्ठलराव विखे पाटील यांच्या सहकारी कार्याचा श्रीगणेशा झाला! या पहिल्या पतपेढीचे अध्यक्ष मात्र ते स्वतः झाले नाहीत. ती जबाबदारी त्यांनी दगडू रामचंद्र विखे पाटील यांच्यावर सोपविली. तेही निष्ठेने काम करणारे कार्यकर्ते निघाले.

आता लोणी गावाला एकमेळाचा बाज धरत चालला. कुठलंही काम गावानं एक-दिलानं करावं या विठ्ठलरावांच्या विचाराला, आग्रहाला साथ देणारी बाबासाहेब घोगरे, दगडूबा विखे, सखाराम गेनू म्हस्के, त्र्यंबक वाबळे, शंकर भाऊ भंवर, धोंडीराम दौलतराम, भाऊ धावणे, बळवंत नारायण विखे, बापू शिवराव धावणे, गोपा गंगाराम विखे अशी माणसं त्यांना लाभली.

लोणी बुद्रुक सहकारी पतपेढीचा पहिला अध्यक्ष म्हणून सगळ्यांनी दगडू रामचंद्र विखे याला गळ घातली. ना-ही, ना-ही करत दगडूबानं ती पत्करली. दगडूबा पतपेढीचा अध्यक्ष झाला. त्याच दिवशी विठ्ठलरावांनी स्वतःसाठी म्हणून एक पणच केला; कुठल्या म्हणून अधिकाराच्या खुर्चीवर स्वतः कधीच बसायचं नाही! मात्र साजेशा वकुबाचा माणूस, सर्वांना सांभाळून घेईल, असा माणूस त्या खुर्चीवर बसविल्याशिवाय कधी राहायचं न्हाई. पेरणी, निगराणी जशी महत्त्वाची असते, तशीच राखण फार मोलाची असते.

लोणीत निघाली तशी पतपेढी त्यांना भोवतीच्या गावोगावांना काढायची

होती. जंगला-रानात राहणाऱ्या, लाकूडफाटा, मध विकून जागणाऱ्या थेट आदिवासींपर्यंत तिचं लोण पोहोचवायचं होतं. त्यासाठी पडेल ते लहान-थोर कार्य करणारी माणसं गाठीला असणं आवश्यक होतं. त्यांच्या 'नाडी-परीक्षा' या हुन्नराचं त्यांना त्यावेळी चांगलंच पाठबळ मिळालं. त्यांच्या कोटाच्या खिशात जसे कामाचे कागद, वर्तमानपत्रं असतं, तसेच 'लसणादीवटी' या गुणकारी आयुर्वेदाच्या गोळ्यांची डबीही असे. वस्तीवर सूतशेखर मात्रा, त्रिभुवनकीर्ती, आडुळशाच्या पानांचा काढा, तुळसपानांचा रस, शेक देण्यासाठी विटकरी असत. नाडी-परीक्षेची ही कला त्यांनी त्यांचे आबा - एकनाथराव पाटील यांच्याकडून शिकून घेतली होती. त्यांच्या लोणीत म्हसबाबा नावाचा माणूस होता. तो मंतरलेले गुणकारी दोरे नेमके घालत असे. त्याचीही जोड त्यांना मिळत चालली होती. गावात लक्ष्मीबाई बोरसे नावाची एक 'पायाळू' आदिवासी बाई होती. कोणाच्या पाठीत उसण भरली वा पाठ धरली वा शिर चढली, तर विठ्ठलराव त्या गावकऱ्याला तिच्याकडं पाय फिरवून घेण्यासाठी धाडू लागले. कुणाला कावीळ झाली, तर कावीळ उतरविण्यासाठी भाऊराम चांभाराकडं पाठवू लागले, तसंच कुणाला 'पान' लागलं तर त्यासाठी म्हसूबाबा, पाटीलबुवा विखेकडं पाठवू लागले. त्यांच्या नाडीपरीक्षेची नाम्नाा एव्हाना चौफेर पसरली होती. या निमित्तानं नाना ढंगांचे, स्वभावांचे, लकबीचे लोक त्यांना रोजाना बघायला मिळत होते. माणसांशी भरपेट दोस्ताना जमून येत होता.

लोणीपासून जवळच तहसील बैजापुरात 'सराले' नावाचं बेट होतं. तिथं कोंडूजी काका नावाचे एक संतपुरुष मठ स्थापून होते. या सराले बेटावरून दरसाल कार्तिक मासात वारी निघायची. या दिंडीतल्या वारकऱ्यांना विठ्ठलरावांच्या घरासमोर प्रसादाचं जेवण होई. कोंडूकाका सुरेख हरिकीर्तन करायचे. विठ्ठलरावांचे 'सायळ मंडळ' ही सराले बेटावर त्यांचं कीर्तन ऐकायला जायचं. असेच एकदा सर्वजण कीर्तन ऐकून सराले बेटावरून परत येत असताना बाबूराव महाराज यांनी त्यांच्या घरासमोर थांबून विठ्ठलरावांना सांगितलं,

"पाटील, आता चांगली दोन-तीन वर्षं आपली भेट होणार नाही. मी चाललोय संस्कृतचं शास्त्रशुद्ध शिक्षण घ्यायला लोणी सोडून."

"कुठं?" विठ्ठलरावांनी चक्रावून विचारलं.

सारी दत्त भक्तमंडळी तशीच नाराजीनं त्यांच्याकडं बघू लागली.

'बडोद्याला!'' महाराजांनी त्यांनी न बघितलेलं बडोदा डोळ्यांसमोर बघत असल्याचा माग घेत सांगितलं.

सर्वजण निसूर झाली.

विठठलरावांनी त्यांच्या खांद्यावर हात ठेवून म्हटलं, ''बरोबर हाय तुमचं, महाराज. किसानाच्या पोराला बैल-कसोटी कळली पाहिजे, तसं बामनाच्या पोराला लिहनं-वाचनं बयानीनं आलं पाहिजे. सय ठेवा मैतरगवांची बडोद्यात.''

कुठसं असावं हे बडोदं? विठ्ठलराव याबाबत विचारात पडले.

''त्या तिकडं गुजरातेत!'' म्हणत महाराजांनी विठ्ठलरावांसह सर्व मैतरांचा निरोप घेतला.

एकीकडे ही संस्था स्थापन होत असतानाच दुसरीकडे १९२५ साली भारतात लोकल बोर्डाच्या म्हणजे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या पहिल्यावहिल्या निवडणुका सरकारने घोषित केल्या. ही घोषणा परकीय इंग्रज सरकारची होती हे निट लक्षात ठेवले पाहिजे. आणखी एक महत्त्वाची घटना या १९२५ सालीच घडली. ब्रिटिश सरकारने सहकाराचे क्षेत्र दिल्लीच्या केंद्रस्थानाकडून मुंबई इलाख्याकडे वळविले.

या वेळी नाशिक जिल्ह्यातील मालेगाव जवळील 'दाभाडी' या गावी मुंबई इलाख्यातील तमाम शेतकऱ्यांचा एक जंगी मेळावा भरला. या मेळाव्यात आनंद स्वामी आणि दाभाडे पाटील यांनी जमलेल्या शेतकऱ्यांना हिताच्या सर्व गोष्टींचे प्रभावी मार्गदर्शन केले. या मेळाव्याला विठ्ठलराव आपल्या निवडक सोबत्यांसह सारंगी घोडीवरून गेले होते. शेतकऱ्यांच्या इतिहासात या दाभाडी मेळाव्याला पुढे फार मोठे स्थान प्राप्त झालं. शे. का. पक्षाची स्थापना याच मेळाव्याच्या विचारमंथनातून झाली आहे.

दाभाडीहून परतल्यापासून विठ्ठलरावांनी गावोगाव सहकारी पतपेढ्या उठविण्याचा चंगच बांधला. या कामात त्यांना पोहेगावचे गणपतराव आवताडे व श्रीरामपूरचे यशवंतराव टेकावडे यांचे मोलाचे सहकार्य झाले. नगर जिल्ह्यात एकीकडे विठ्ठलराव सहकाराची पताका खांद्यावरून घेऊन अशी दिंडी काढत असतानाच दूरवर कोल्हापूर जिल्ह्यात भास्करराव जाधव या बहुजनातील

विचारवंताने 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली.

पतपेढ्यांच्या उभारणीसाठी करायच्या या अथक भ्रमंतीत विठ्ठलरावांनी स्वतःसाठी काही आवश्यक नेम बांधून घेतले होते. ते भल्या पहाटे उठत. विधी, अंघोळ आटोपून पूजा करत. राधाज्जीला चटणी-भाकरी फडक्यात बांधलेलं दशमीचं गठूडं तयार ठेवायला सांगत. ते गठूडं आपल्या खाकी कोटाच्या खिशाच्या आत घालून आपल्या सारंगी घोडीवर मांड ठोकत. लोणीच्या घराबाहेर पडण्यापूर्वी त्यांनी ग्लासभर दूध ओठाआड केलेलं असे. पायात नगरी बाकदार जोडे, कमरेला चुनीदार मातकड धोतर, अंगातल्या शर्टावर खाकी कापडाचा दुहाती मोठे खिसे असणारा शिकाऱ्यासारखा कोट, त्याच्या एका खिशात आजीच्या बटव्यासारखी असणारी नानाविध देशी गोळ्यांची अटकर थैली, डूईला पिळाचं पांढरी नगरी पागोटं, कपाळी वारकऱ्याचा टिळा असे. विठ्ठलराव नगरी उन्हाच्या तडाख्यात मैल न मैल एकटेच भटकत. मुळच्या लालसर गव्हाळ असलेला त्यांचा चेहरा या धावणीमुळं पार रापून जात असे. घामानं डबडबलेला मुखडा पिळाच्या पाघोट्यानं टिपत ते कधी श्रीरामपूरच्या टेकावड्यांच्या वाड्यातील ओसरीवर तांब्याभर पाणी डोकं वर करून नरड्याची घाटी गटागट वर खाली करत रिचवित. त्यांना अशा रूपात बघितल्याचं अनेक शेतकरी आजही सांगतात. काही जण त्यांचं हे वर्णन करताना सहज म्हणून जातात, 'लई जिद्दीचा आमचा फाकड्या अप्पा विखे पाटील!'

याच वेळी १९२६ साली ब्रिटिश सरकारनं प्रवरा नदीवरील विल्सन ऊर्फ भंडारदरा धरण बांधून पूर्ण केलं. तिकडं दूर पुण्याजवळ बारामतीत शेठ लल्लुभाई शामलदास मेहता यांनी 'नीरा व्हॅली शुगर कंपनी' नावाचा खाजगी साखर कारखाना काढला. कारखान्याला आवश्यक स्वतःचा ऊस परिसरात न मिळू शकल्याने तो लवकर बंद पडला. इथं अत्यंत महत्त्वाची अशी एक गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. विठ्ठलरावांच्या सहकारी रामायणाच्या रचनाकार्यात पुढं अत्यंत उपयोगी ठरलेल्या सहकार-वाल्मीकी' - वैकुंठभाई मेहता हे याच लल्लुभाई मेहतांचे चिरंजीव होत.

मातुलठाणचा रामराव बोर्डे-पाटील हा नगरच्या बापूसाहेब भापकर व सथ्था

यांच्यासारखाच तळमळीचा, नि सचोटीचा माणूस होता. त्यामुळंच असेल, तो विठ्ठलरावांच्या जिवाभावाचा मैतर झाला. रामरावाला देशभर चाललेल्या गांधीबाबाच्या गोऱ्या सरकारविरुद्धच्या झगड्यात खूप रस होता. तो सहज बोलता-बोलता गांधीबाबा आज कुठं आहेत, कसल्या चळवळीत गुंतले आहेत, यात रंगून जायचा.

तसं विठ्ठलराव व त्यांच्या सर्व मैतरांचं टोळकं क्वचितच एक जागी यायचं. असा योग जुळून आला, तो शेवगावला. तिथल्या राजारामराव म्हस्क्यांनी छत्रपती शिवाजीराजांचा उत्सव जोरावारीनं साजरा करायची नामी पण धाडसी कल्पना काढली. ते सर्व मैतरांसह शेवगावला गेले. तिथं संगमनेरच्या केशवराव देशमुख वकिलांची आणि विठ्ठलरावांची ओळख झाली. विठ्ठलरावांना त्यांच्या जिंदगीतला भेटलेला, तालेवारीनं मायदांळ शिकलेला हा पहिला वहिला माणूस संगमनेरचे देशमुख वकील! देशमुख हे ऽ भले मोठे शिकलेले. विठ्ठलराव तसे अडाणीच. पण त्या दोघांची तार जुळलीच. शिवाजी महाराजांच्या उत्सवाचा गुलाल कपाळी घेऊन एकमेकांसंगं बोलताना त्यांच्या दोघांच्या चर्चेत 'आपली पोरं लिखा-पढीला पिछाडलीत. त्यांस्नी वाव न्हाई. काय नि कसकसं करावं,' यावर चांगली घंटाभर चर्चा झाली.

शेवगावहून लोणीला विठ्ठलराव परतले, ते पोराबाळांच्या लिखापढीचा विचार डोक्यात घेऊनच. त्यातच त्यांना त्यांच्या सालकरू रामराव म्हस्के यानं सांगितलं की 'माहेगावच्या देवराम पाटील काळे हा मेंढपाळीला लई जाणता हाय, त्याची एकदा गाठ-भेट घ्यायला पाहिजे', सालकऱ्याच्या सल्ल्याप्रमाणं विठ्ठलराव आहेगावला गेले. तिथल्या देवराम पाटलाची भेट घेतली. त्यानं त्यांच्या कानी घातलेलं मेंढ्यांचं मोठेपण ते कधीच भुलले नाही.

तो म्हणाला, ''विठ्ठलराव, मेंढीचं खत शिवाराला सोनखतच! चार बैल अन् एक मेंढीचा कळप उपयोगाच्या दृष्टीनं सारखाच. शिवाय लोकर अन् सालीनाची दोन कोकरं वायलीच.''

देवरामनं विठ्ठलरावांना मेंढ्या घेऊन दिल्या. राखणीसाठी माहीतगार असा म्हातारबा कांदळकर नावाचा धनगरही सालकरी म्हणून जोडून दिला. विठ्ठलरावांनी त्यांच्या व रस्त्यांवरच्या शिवारात मेंढ्यांची बसकण सुरू केली.

असंच एकदा एक विचाराच्या विठ्ठलराव व त्यांच्या साऱ्या मैतरगणांना बापू बच्युजी शिंदेनं सामाईक जेवायला बोलावलं.

त्या जेवणाच्या पंगतीत विठ्ठलराव, बापूसाहेब, शामराव बोर्डे, दगडू रामचंद्र, लक्ष्मण पाटील, म्हस्के असे अनेकजण होते. भरल्या पंगतीला हात करत बापू बच्युजी म्हणाला, ''हां, होऊ द्या, मंडळी, चांगभलं! करा सुरू. येवढी समदी जमला - भरून पावलो म्या.''

विठ्ठलरावांसमोर मांडलेली जेवणाची पत्रावळ त्यांनी हलक्या हातानं बाजूला सारली. वस्तीवरून येतानाच फडक्यात बांधून आणलेली चटणी-भाकरीची वळी कोटाच्या खिशातून बाहेर घेतली. का, कुणाला ठाऊक, त्यांना एकाएकी राधाज्जीची आणि ती देत आली होती, त्या भिजेची सय झाली. विठ्ठलराव भाकरीचं गाठुडं सोडू लागले. बापू शिंद्या त्यांच्या सामने घेऊन केव्हा खडा ठाकला होता, त्यांना कळलंच नाही.

तो सगळ्या पंगतीला ऐकू जाईलसं गरजला, ''काय हे विठ्ठलराव? अहो भरल्या पंगतीत कुठली काढली ही शिदोरी तुम्ही? कशापायी?''

''हे बघ, बापू, मी वारकरी हाय. परक्या घरचा थाळा घ्यायचा न्हाई, हा नेम हाय माझा. मी कुठंबी, कायबी खात न्हाई भाईरचं.'' पानात हात डुबवलेली पंगत विठ्ठलरावांचे बोल ऐकून चक्रावून तशीच थांबली. यजमान बापू शिंदेच चकरात पडला.

''पाटील, कायबी करा. दोन घास घ्या, मग खावा होतर तुमची दशमी. पंगत थांबलीय.''

एरवी विठ्ठलराव मिळेल तिथं स्वतःच्या मनचे विचार सांगण्यासाठी शेतकऱ्यांसमोर बोलत होतो. आज त्यांच्या पंगतीत बोलणं भाग होतं! काखेत पटका मारून विठ्ठलराव तसेच उठले. हात जोडून सर्वांना म्हणाले,

''हे बेलापूर हाय. शंकराच्या पिंडीवर सोडत्यात, त्या बेलाच्या तीन दळी पण एक देठी बेल - पानागत सगळे जमलायसा. मला येडा-खुळा म्हणा हो तर, पर माझा नेम मोडाय लावू नगा. हात जोडतो मी समद्यांना. तुम्ही सारे माझे हायसा. हात वले करा.'' विठ्ठलरावांनी पंगतीला हात जोडून विनवणी केली.

लोकांनी ती मानली.

अशातच चौफेर अफवा उठली की देशी वस्तूंचा प्रचार करीत गोंदियापासून गांधीबाबा पुण्याकडं निघाल्यात. आता ते नगर इलाख्यात उतरणार. तिथं त्यांस्नी नगरचे शेट फिरोदिया मानपत्रं देणार.

होळी सणाचे दिवस तोंडावर आले.

गोंदियाहून निघून सत्याग्रह्यांच्या तांड्यासह गांधीबाबा नगरला उतरले. नगरकरांनी त्यांना बखळ मानपत्र दिली. समारंभानंतर आपल्याला दिलेल्या चंदेरी करंड्याच्या व गळ्यात घातलेल्या फुलांच्या माळेचा गांधीबाबानंच सर्वांसामने लिलाव पुकारला. लिलावामुळं गांधीबाबांची सतराशे रुपयांची थैली सहा हजार रुपयाला गेली. लिलावाची तिसरी बोली सर्व शेतकऱ्यांच्या जमिनी गहाणवटीनं व तारण घेणाऱ्या शेठ मगनीराम सावकारानंच केली!

नगरचा हा सारा करीना महाराज व त्र्यंबक वाबळे यांच्याकडून विठ्ठलरावांच्या कानावर गेला.

या दौऱ्यात गांधीबाबानं बेलापूरलगतच्या हरेगावच्या साखर कारखान्यालाही ठरवून भेट दिली. बेलापूर फाट्यात लोकांचा गैरसमज होता, की कारखान्यातील साखर पांढरी पांढरी धोट निघते. त्याचं कारण बैलांच्या हाडाची भुकटी तिला कारखान्यात फासत असावीत! लोकांचा हा गैरसमज दूर हटवायला हरेगावच्या मालकांनी गांधीबाबाला आपणहून बेलापूरला आणलं होतं. बाबांनं जाहीर सभेत हाडाच्या भुकटीचा अन् साखरेच्या पांढरेपणाचा काही संबंध नाही, हे जमल्या लोकांना पटवून दिलं.

विठ्ठलराव गांधीबाबांच्या या व अशा कानांवर पडणाऱ्या लहान-थोर गोष्टी कान भरून अन् कौतुकानं ऐकत होते व वाचत होते. बाबांचं दर्शन घ्यायला काही ऐकायला जावं, असं सारखं वाटत होतं. पण बाबांभोवती पडलेलं शेठ-सावकारांचं कडं बघून आपणहून काही त्यांच्या सभेला जावं, असं विठ्ठलरावांचं मन घेत नव्हतं. का, कुणास ठाऊक पण शिव-पिंड कशी कोळशानं रेघाटावी, तसंच वाटायला लागलं सारखं विठ्ठलरावांना. विठ्ठलराव आपली चारही वस्त्यांवरची रानं, गावोगावच्या पतपेढ्या, पाणी-परिषदा, शेतकरी सभा, तालुका लोकल बोर्ड, डी. एल. बी. सुपरवायझिंग युनियन, को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, त्यांचा दोस्ताना, सत्यशोधकांच्या बैठकी यांतच गुरफटले होते.

आन् पाटील-वाड्याच्या दिंडी दरवाज्यावर ठोकलेली असते, त्या झळझळीत कातऱ्या पितळी कारंजीगत चकतीसारखा दिसणारा दिवस त्यांच्या जिंदगीत फटफटला! काही ध्यानीमनी नसताना अचानक संगमनेरच्या परशुरामी वकिलांचा सांगावा आला.

''गांधीबाबा माझ्याकडंच उतरणार. नाव घेऊन याद केलंय् तुम्हांला भेटीसाठी. असाल तसे निघून या.''

विठ्ठलरावांसाठी हे भलतंच होतं. पार तिरपागडून टाकणारं. ध्यानीमनी नसलेलं. गांधीबाबा नगर इलाख्यात उतरले नव्हते - त्यांच्या रूपानं जसं विठ्ठलरावांच्या वारकरी जिंदगीत परब्रह्मच अवतरलं होतं - पुंडलिकाच्या भेटी आल्यासारखं! कुठं गांधीबाबा अन् कुठं विठ्ठलराव? गांधीबाबानं 'याद केलंय' म्हटल्यावर काटाच सरकला त्यांच्या अंगावर.

ते अवाक्‌च झाले. काही म्हटल्या काहीच सुचेना, सुधरेना. सांगावा देणाऱ्याला 'हा आलोच. तू हो म्होरं' म्हणत विठ्ठलराव तयारीला लागले. त्यातल्या त्यात ठेवणीचं पागोटं काढलं. कोट, पायताणं चढवली, खांद्यावर उपरणं फिरवलं अन् सारंगीवर मांड टाकली. संगती महाराज, दत्तमंडळातले भक्त, पतपेढ्यांचे दगडूबा, विठ्ठल तेली असे साथीदार घेतले. बैलगाड्या काढल्या. आणि निघाले संगमनेरला - परशुरामी वकिलांच्या घराकडं. स्वदेशीचा प्रचार करीत गावोगाव फिरणाऱ्या गांधीबाबांना भेटायला!

संगमनेरच्या परशुरामी वकिलांचा वाडा त्या रोज कसा नुसता गजबजून गेला होता - शाळूच्या दिवसांत मुखड्यात इवले पांढरे कण घेऊन तुरु-तुरू धावणाऱ्या देवमुंग्यांच्या वारुळागत दिसत होता तो! माणसंच माणसं भिडली होती त्या वस्तीला.

कसं भेटायचं आता गांधीबाबाला यात? मनात तर मायंदाळ दाटून आलं होतं! काय विचारावं अन् काय नगं आम्हां शेतकऱ्यांबद्दल गांधीबाबाला? देशाचा मोठा म्होरक्या तो. काही ना काही तोड काढील तो. त्याच ओढीनं विठ्ठलरावांनी वकिलांस्नी बगलला काढलं. त्यांच्याशी कानगोष्टी करत स्वतःच्या मनचा बेत त्यांच्या काळजापर्यंत, कधी नव्हे एवढ्या काकळतीनं पोहोचवला. म्हणाले,

''वकीलसाहेब, कायबी करा पर मला पाच मिनिटं बोलू द्या गांधीबाबांसंगं.

मी काय बोलणार, ठावं हाय तुम्हांला. येवढा मेळ पाडा. कसंही करा, पर कसब करा.''

परशुरामी वकील अंगातल्या खादी कोटाची दोन्ही टोकं पोटाशी अगदी जुळती घेत म्हणाले, ''विठ्ठलराव, ही जत्रा बघताय नव्हे? आपण सर्वांनी बापूजींचं दर्शन घ्यायचं, त्यांची ओळख करून घ्यायचीय्. ते सांगतील, तो मंत्र उरात जपून ठेवायचाय्! स्वराज्याचा लढा त्याला धरून लढवायचाय्.''

''पर वकीलसाहेब, आम्हां शेतकऱ्यांची बाब गांधीबाबांच्या कानांवर...''

''पाटील, शेतकरी काय एकट्या नगर इलाख्यातच आहेत? साऱ्या देशभर आहेत. बापूजी स्वदेशीचा प्रचार करीत देशभर हिंडताहेत. त्यांना काय माहीत नाहीत शेतकऱ्यांचे प्रश्न, असं म्हणायचंय का तुम्हाला?''

''तसं नव्हं, पर मला बोलू द्या की जरा बाबांसंगं.'' विठ्ठलरावांनी लावून धरलं.

''मी नक्की नाही सांगत. पण निघाला विषय, तर बोलतील बापूजी.'' वकील म्हणाले.

तेवढ्यात गांधीबाबा बसले होते, त्या दालनातून सांगावा आला, 'भेज दो सबको', आणि कानावर शब्द पडले, तसं माणसंच माणसं घुसली बाबांच्या दालनात.

पांढऱ्या सफेद बिछायतीवर पाठीशी असलेल्या खादीच्या अभ्र्याच्या तक्क्याला न टेकता गांधीबाबा पलक मांडी घालून, एक हात बिछायतीवर ताठ उभा टेकवून बसले होते तसेच ताठ. पापणी लवायच्या आत ते ताडकन उठले, दोन्ही हात जोडून लहान पोरागत जिवणी पसरून हसत म्हणाले, ''आइये.''

विठ्ठलराव काही बाबाला विचारायचंय, हेच ते पार भुलले! बघतच राहिले. भान हरपून! नाकावर पितळी बारीक काड्यांचा गोल चष्मा घातलेले, साफ पांढरा सफेद पंचा नेसलेले, त्याला लागून चुन्याच्या डबीगत कमरेला नाडीचं घड्याळ लटकत असलेले गांधीबाबा. नुकतीच थंडी हटल्यानं बाबा शाप उघडाबंब होता. कशी दिसत हुती बरी त्याची अंगलट? ऊन-तापीचा मारा घेत अंगभर तकतकणाऱ्या काळवट शिवारासारखी! छेः! आम्हां नगरी कुणव्याच्या खोपटासमोरच्या रोवलेल्या रांजणासारखी! कारभारणीनं नुकताच भरल्यामुळं निथळत ओसंडणाऱ्या

रांजणासारखी!

बाबा अर्धा एक घंटा सर्वांना बोलावून घेतलेल्या नगर इलाख्यातील शेतकऱ्यांसमोर हिंदीत काय बाय बरंच बोलले.

"अब हम पूना जा रहे है...." म्हणत बाबांची बातचीत संपली. साऱ्यांची त्यांच्यासंगं पछान करून देण्यात आली. तसं करताना दुभाषा विठ्ठलरावांच्या समोर येऊन म्हणाला, "ये हैं विठ्ठलराव विखे पाटील! लोनी ग्राम के! किसानों के मुखिया!"

"अच्छा?" म्हणत बापूजी विठ्ठलरावांसमोर थांबले. त्यांनी जोडलेले दोन्ही हात हातांत घेऊन आजवर कधीच बघितलं नव्हतं व पुढं कधी बघायला मिळणार नाही; असं लहान्या पोरागत प्रथम निरागस हसले अन् म्हणाले, "किसानों के मुखिया? तो निरा मूरख समझा होगा इन्होंने हमें - हम जो है, इस सूखे में मानपत्र लेते गाँव गाँव सफर कर रहे है...."

अन् ढाश्या वाऱ्यासारखे हां हां म्हणता गांधीबाबा साऱ्यांसमोरून दालनाबाहेर निघूनही गेले. बाबा काय म्हणाले विठ्ठलरावांना? ते त्यांनाच काय, कुणालाही कळलं नाही.

एकदा तर लोणीत सांजच्याला कालवाच उठला. दिसेल तो माणूस चावडीसमोरच्या चौकाकडं धावत होता. चौकात गुळाच्या भेल्या भरलेली एक बैलगाडी उभी होती. दमगीर बैल धापावत रवंथ करत होते. त्यांच्या तोंडातून लाळेच्या फेसाळ तारा लोंबत होत्या. एवढं माणूस जमलं होतं चावडी-चौकाला, पर कुणाच्या तोंडून शबुद फुटत नव्हता. विठ्ठलराव पुढं होऊन गाडीत डोकावले. लगड नावचा एक लोणीकर गुळाच्या पिवळ्याधमक भेल्यांवर तोंड वासून उताणा पडला होता. निपचीत. कुणी त्याला हात लावू धजत नव्हतं.

विठ्ठलराव पुढं झाले. लगडाला उठवावं, म्हणून गदगदा हलवू लागले. त्याला हात लावताच काटाच सरकला त्यांच्या अंगावर. लगड प्राणगत झाला होता.

बेलापूरच्या गूळ-बाजारात आपली गूळ-भेल्यांची गाडी घेऊन तो फीर फीर फिरला होता. 'दोन-तीन रुपये उभा पल्ला' अशा शेवाच्या भावानं गूळ मागताना एकाही व्यापाऱ्याला लाज कशी ती म्हणून वाटलीच नव्हती.

हबकलेला लगड हताश होऊन परतीच्या वाटेला लागला होता. बसल्या धसक्यानं वाटेतच कधीतरी मरून पडला होता. घाम गाळून त्यानं केलेल्या गुळावरच त्यानं आपली उभी कुडीच ठेवली होती. त्याच्या इमानी बैलांनी तीच वाहून आणून चावडी-चौकात सर्वांसमोर जाब पुसायला जशी खडी केली होती.

आभाळाकडं सताड उघडे डोळे लावलेल्या प्राणगत, निपचीत लगडाकडं विठ्ठलराव डोळे फाडून बघतच राहिले. गुऱ्हाळ गुऱ्हाळ फिरलं त्यांच्या मस्तकात.

"कुठवर चालणार हे? का? कशासाठी चालू द्यायचं हे? आज लगड गेला, उद्या आणि कुणीतरी जाईल. जाऊ द्यायचा? मग तोड काय याला? शेतकऱ्याला काळ्या आईच्या या कष्टाळू पोराला कुणी वाली उरलाय की नाही? का? कशासाठी, कुठवर चालायचं हे?"

लोहार-मेटाच्या तापल्या कांबेवर घणामागून घण दणदणावेत, तसा एकच एक विचार विठ्ठलरावांच्या मस्तकात ठणकू लागला. का? तोड काय?...

ठिणग्याच ठिणग्या उधळू लागल्या.

त्या रोजापासून उताणा लगड, जबड्यातून लाळेच्या तारा लोंबणारे त्याचे दमगीर बैल, चालच हरवून खुडूक कोंबडीसारखी जागीच खिळलेली त्याची बैलगाडी - बैलगाडी कसी - जिंदगानीची गाडी! हे चित्र कुणालाही पुसता येणार नाही, असं काळजावर रेखलं गेलं त्यांच्या.

भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील म. गांधींचे सविनय कायदेभंग व असहकार या तंत्राचे संपूर्ण जगाला नवीन वळण देणारे युद्ध ऐनभरात आलेले मिठाचा सत्याग्रह म्हणून स्वातंत्र्यलढ्यात मैलाचा दगड ठरलेली गांधीजींची दांडीयात्रा त्या काळात देशभरच नव्हे तर जगभरच गाजली.

महाराष्ट्रात सत्यशोधक समाजाच्या लढाऊ आघाडीवर 'देशाचे दुश्मन' नावाने गाजलेल्या खटल्यात केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर व बागडे यांना शिक्षा झाली. 'शिवाजी महाराज की जय' व 'म. फुले की जय' म्हणत हे तिघेही निडर कार्यकर्ते पोलिसांच्या गाडीतून जेलकडे निघून गेले.

विठ्ठलराव परम दत्तभक्त होते. शेजारी असलेल्या सायळ गावच्या दत्ताच्या दर्शनाला ते नेहमी जात. त्यांचे एक 'पोथीमंडळ' होते. त्या मंडळात मैड, वाबळे,

म्हस्के, बाबूराव महाराज असे भक्तगण होते. बाबूराव जोशी हे विठ्ठलरावांचे भक्तीच्या क्षेत्रातले जिव्हाळ्याचे मित्र होते. अनेक कौटुंबिक व व्यावहारिक बाबतीत ते बाबूराव महाराजांचा सल्ला घेत. तसेच त्यांचे एक 'जासूद मंडळ'ही होते. त्यामध्ये एकनाथ न्हावी, भाऊराव चांभार, पांडू भिल्ल, रामचंद्र वडारी, साळबा तेली, पंढरीनाथ परीट अशी अठरा पगड जातीतील हुन्नरी माणसं होती.

तसे विठ्ठलरावांची तीन लग्नं झाली. पहिल्या पत्नी पार्वतीबाई. त्यांना २ मुले झाली; पण लहानपणीच वारली. मित्रवर्य बाबूराव महाराज जोशी यांच्या आग्रहानं त्यांनी दुसरे लग्न अस्तगाव, तालुका-कोपरगाव येथील द्रौपदीबाईंशी केलं. त्यांना दि. ५ मे १९३२ रोजी अस्तगाव येथे मुलगा झाला. आजचे खा. एकनाथ ऊर्फ बाळासाहेब विखे पाटील हे त्यांचे नाव. त्यांच्या तिसऱ्या पत्नी वेणूबाई लोणी खुर्दच्या आहेर घराण्यातील होत्या. त्यांना दि. ११ मे १९३७ रोजी मुलगा झाला. विठ्ठलरावांच्या या द्वितीय पुत्राचे नाव भाऊसाहेब ठेवण्यात आले. बाळासाहेब व भाऊसाहेब यांना सख्ख्या व सापत्न बहिणीही आहेत.

१९२८ साली विठ्ठलराव डी. एल्. बी.च्या निवडणुकीत निवडून आले. त्यांनी गावोगाव उभ्या केलेल्या पतपेढ्या यासाठी त्यांना उपयोगी पडल्या.

१० डिसेंबर १९२९ रोजी विठ्ठलरावांनी राजूरी या अत्यंत छोट्या गावी सहकारी सोसायटी स्थापन केली. एवढेच नव्हे तर भारतातील शेवटच्या टोकावरचा तळागाळातील जो नागरिक त्याचीही अकोलातील 'चास' या गावी सोसायटी उभी केली. भारतातील अशा प्रकारची ही पहिली सोसायटी होती.

१९३० सालीच विठ्ठलरावांच्या सहकारी जीवनयात्रेला दोन अधिक ठळक पायवाटा येऊन मिळाल्या. ते राहूरी तालुका सुपरवायझींग युनियनचे अध्यक्ष झाले. त्यापूर्वीच ते को-ऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूटचेही अध्यक्ष होते. या दरम्यान सत्यशोधक चळवळीची मुलुखमैदान तोफ असलेले प्रबोधनकार ठाकरे यांचे 'शेतकऱ्यांचे स्वराज्य' पुस्तक प्रकाशित झाले. हे पुस्तक म्हणजे म. फुले यांनी पूर्वी लिहिलेल्या 'शेतकऱ्यांचा असूड' या पुस्तकानंतरचे एकमेव नाव घ्यावे असे पुस्तक होते. या दोन्ही पुस्तकांतील विचार महाराष्ट्रभर पसरलेल्या अडाणी शेतकऱ्यांना कळणे शक्यच नव्हते. तरीही स्वतः अर्धशिक्षित असून त्या पुस्तकातील आर्थिक आघाडीवरच्या विचारांना विठ्ठलराव कमर कसून प्रत्यक्ष

भिडले होते.

यावेळी दि. २० एप्रिल १९३० रोजी दै. पुढारीचे संपादक व सत्यशोधक चळवळीचे कट्टर पुरस्कर्ते श्री. ग. गो. जाधव, म. गांधींना गुजरात येथील नवसारी भागात प्रत्यक्ष भेटले होते. ही भेट समुद्रकाठच्या कऱ्हाडे-मलवाड या गावी झाली. जाधवांनी स्वभावधर्माप्रमाणे गांधीजींच्या समोर वही धरून जीवनाच्या वाटचालीसाठी संदेश मागितला. त्या वहीत गांधीजींनी स्वहस्ताक्षराने दिलेला संदेश आजही उपलब्ध आहे. भारतीय शेतकऱ्यांच्या वर्माच्या दुःखावर अचूक बोट ठेवत गांधीजींनी १९३० साली लिहिले आहे की 'यह लढ़त न ब्राह्मणों की है - न ब्राह्मणोतरों की है - न हिंदू की है परंतु सारे हिंदोस्थान की है। इसमें भी मुख्यशः हिंदोस्थान के करोडो भुके मरते हुये गरीबों की है। इसलिए सब ब्राम्हणेतरों को जो हिंदोस्थान में इतनी बड़ी संख्या में है - इस लढ़त में आ जाना चाहिए।'

गांधीजींच्या या संदेशातील शब्द न शब्द अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यातील 'लढत' हा शब्द 'स्वराज्या'शी निगडीत आहे. पण राजकीय स्वराज्य मिळाले. त्यातील 'गरीबों की लढत' पूर्ण झाली आहे काय? याचे खेदाने नाही असेच कोणत्याही शहाण्या व न्यायी माणसाला उत्तर द्यावे लागेल. आपल्या परीने सर्व शक्तीनिशी ही लढत विठ्ठलरावाने अटीतटीने लावून धरली. हेच त्यांच्या जीवनचरित्राचे प्रमुख अंग आहे.

१९२९-३० साली जगभर मंदीची लाट आली होती. अशातच इंग्रज सरकारने १४ ऑक्टो. १९३१ रोजी बी. एस. कामत यांच्या नेतृत्वाखाली 'कामत कमिटी' नेमली. ही कमिटी शेतकऱ्यांचे पाणी, कर्ज, खंड इ. जीवनावश्यक प्रश्न सोडवण्यासाठी नेमली होती. या कमिटीने दिलेल्या अहवालात साखर कारखान्यासाठी लागणारा ऊस पिकविणाऱ्या शेतकऱ्याबद्दल शब्दही नाही, उलट शेतकऱ्यांच्या जमिनी कारखानदारांनी खंडाने घ्याव्यात व या खंडाची मुदत १ वा २ वर्षे नव्हे तर चांगली ३० वर्षे असावी अशी शिफारस आहे.

जसे भारताच्या स्वातंत्र्यासाठी म. गांधी, पं. नेहरू, सरदार पटेल झुंजत होते तसेच स्वा. सावरकरही आपल्या क्रांतिकारक मार्गाने लढत होते. दि. २२ फेब्रुवारी १९३१ रोजी स्वा. सावरकरांनी डॉ. शिंदे व भागुजी कीर यांच्या मदतीने सर्व जातींना खुले असे भारतातील पहिले 'पतित पावन मंदिर' रत्नागिरी शहरात

उठविले.

आपल्या चारही वस्त्यांवरची घरची शेती, खांद्यावर पडलेली सहकारी संस्थांची जबाबदारी, लोकल बोर्डाची कामगिरी या विविध आघाड्यांवर विठ्ठलराव मनापासून कार्यरत होते. विशेषतः त्यांच्या चारही वस्त्यांवर गुऱ्हाळं शिजत होती. काहिलीतून बाहेर पडणारा पिवळा धमक गूळ संगमनेरच्या बाजारात व्यापाऱ्यांच्या गुळपेढ्यांवर जात होता.

अशातच पंचकृषीतल्या तमाम शेतकऱ्यांत कुणीतरी एक अफवा उठवून दिली की पाटाचं पाणी वापरलं तर जमीन गार होते, ती पिकतच नाही! यामुळं भंडारदऱ्याच्या कालव्याचं पाणी कुणीच वापरेनासं झालं. विठ्ठलरावांना शेतकरी बंधूंच्या मनातील हा अपसमज दूर करण्यासाठी गावोगाव पायपीट करावी लागली. या भ्रमंतीत त्यांना सखाराम पाटील, मुरलीधर इंगळे, आबासाहेब तोरडमल, आर. के. देशमुख, काशिनाथ धनवटे, मांढरे मास्तर, गजानन खोर्डे, मारुती गायकवाड, मुकिंदा माळी, विठ्ठल तेली, एकनाथ तांबे, देवबा गाडेकर, सावळेराम देवकर, मुरलीधर कडू असे किती तरी निष्ठावंत सोबती मिळाले. सर्वांत महत्त्वाचं ठरलं ते संगमनेरच्या के. बी. दादा देशमुख व जया वहिनी यांचं प्रेम व मार्गदर्शन.

या भ्रमंतीत विठ्ठलरावांना एक महत्त्वाची गोष्ट कळून चुकली की कोपरगावची ब्रॅण्डी आणि कंपनी, महाराष्ट्र शुगर मिल्स आणि माळी समाजातील धनवार तालेवार संगमनेर, श्रीरामपूर भागातील शेतकऱ्यांच्या जमिनी कवडीमोलाने गिळंकृत करणार.

१९३२ साली शेतसारा भरण्यासाठी विठ्ठलरावांना बुद्रुक लोणीच्या श्रीमती जडाबाई रूपचंद मारवाडी या सावकार स्त्रीकडून शंभर रुपये कर्जाऊ काढण्याची नौबत आली होती.

प्रॉमिसरी नोटवर काढलेल्या या कर्जाचे वार्षिक व्याजच तर शेकडा रुपये बारा होते! 'सावकारी पाशाची' त्यांना अंगभूत जी चीड दिसते तिचे मूळ अशा घटनेत नसेल काय?

ती प्रॉमिसरी नोट खालीलप्रमाणे आहे.

नंबर

लिहून घेणार : जडाबाई कोम रूपचंद मारवाडी

राहाणारा : लोणी बुद्रुक, ता. संगमनेर, जि. नगर.

प्रामिसरी नोट लिहून देणार विठ्ठल येकनाथ विखे राहाणार लोणी बु. ता. संगमनेर जि. नगर लिहून देतो ऐसाजे की आम्ही तुम्हापासून आज मि॥. चैत्र शु.॥ १४ रोज मंगळवार शके १८५४ रोजी रोख रुपये १०० अक्षरी शंभर पठीकरता घेतले. यास व्याज दरमहा दरशेकडा रु. १ प्रमाणे देण्याचे कबूल करून घेतले आहे. हे रुपये सव्याज तुम्ही मागाल त्यावेळी त्या ठिकाणी बीन तकरार आणून देऊ. भरणा पावला ही प्रामिसरी नोट राजीखुशीने लिहून दिली. सही मिती चैत्र शु.॥ १४ शके १८५४ संवत १९८७ ता. १९-४ सन १९३२.

(विठ्ठलराव विखे पाटील)

# प्रकरण २

अडचणीत आलेले सभोवतीचे शेतकरी सभासद असल्यामुळे विठ्ठलरावांच्या गावोगावच्या सोसायट्या बुडितात येऊ लागल्या. यासाठी मा. गायतोंडे साहेबांचं त्यांनी मार्गदर्शन घेतलं. त्यांच्या अध्यक्षतेखाली नगरला बँकेची एक जंगी बैठक घेतली. या बैठकीत जमलेल्या शेतकऱ्यांना विठ्ठलराव फार परखडपणे बोलले. गावोगावच्या पतपेढ्या जगविण्याचं त्यांनी पोटतिडकीनं सर्वांना आवाहन केलं.

या काळात लोणी जवळच्या कात्रड या गावी थोर संत गाडगे महाराज यांचं वऱ्हाडी बोलीतील ठणठणीत कीर्तन ऐकण्याचा योग विठ्ठलरावांना आला. गाडगेबाबांनी आपल्या रोकड्या वऱ्हाडी बोलीत समाजाच्या घनघोर अज्ञानावर ओढलेले परखड कोरडे ऐकायला मिळाले. बाबांचे हे झणझणीत प्रबोधन त्यांच्या मनात खोलवर रुजलं. त्यांनी आपल्या वस्तीवर गाडगेबाबांना पाचारण करून त्यांची प्रेमानं आहोभगती केली.

लोकल बोर्डातील निवडीमुळं विठ्ठलरावांचं नगर, संगमनेर, पुणे असं प्रवासाचं क्षेत्र वाढलं. शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर त्या वेळी विचार करणाऱ्या व निकरानं झुंजणाऱ्या कार्यकर्त्यांचं मोहोळच महाराष्ट्रात होतं. त्यातील पुणे-नगर भागातील बाबुराव जेधे, अण्णासाहेब आवटे, शंकरराव मोरे, बाबुराव सणस, शंकरराव चव्हाण, बापुसाहेब भापकर, सरदार थोरात, रा. ब. नवले अशा जाणत्यांच्या नेहमी पुण्यात बैठका होत. पुण्याचे विठ्ठलरावांचे मैतर ज्ञानोबा जाधव त्यांना बैठकीचा सांगावा देत. मग विठ्ठलराव न चुकता पुण्याला येत. सर्व

कार्यकर्त्यांचे बैठकीतील उलट-सुलट विचार ध्यानपूर्वक ऐकत. संतश्रेष्ठ तुकाराम महाराजांचा - 'मनाचा चाले मनाशी संवाद' या ढंगानं त्यांचं स्वतःशीच ऐकलेल्या विचारांवर चिंतन होत राही.

अशातच नगरला गावोगावच्या पाटील लोकांचा एक 'पाटील दरबार' ही भरला. त्यात रावसाहेब तोरडमल पाटील, काशीनाथ धनवटे पाटील, कर्जतचे दादासाहेब पाटील, भागवतराव कोळसे-पाटील, कानवडे-पाटील, भाऊसाहेब गुंजाळ पाटील, पंढरीनाथ दळवी पाटील अशा नगरी पाटलांची ही बैठक होती. रंगी-बेरंगी पिळाच्या पाटील पागोट्यांचा बैठकीत मजेदार फुलोरा फुलला होता. एक-एक तालेवार पाटील इरेसरीन बोलत होता. आपण पाटील माणकरी कसे इंग्रज सरकारच काय चुकत, काँग्रेसवाल्यांची शेतकऱ्यांच्या प्रश्नावर हेळसांड कशी होते हेच सर्वजण वेगवेगळ्या बोलीत, वेगवेगळ्या ढंगात पण आवर्जून सांगत होता. जवळजवळ घंटाभर विठ्ठलरावांनी सर्वांचं म्हणणं ध्यानपूर्वक ऐकलं. शेवटी 'सौ सुनारकी - एक लोहार की' या न्यायानं सर्व पाटील मंडळींना उद्देशून त्या दरबारात विठ्ठलराव ठणठणीत बोलले. त्या बोलण्यात गावोगाव बघितलेल्या अनुभवांचा रोकडा ठेवा होता, विचारांची स्पष्टता होती. निडरता तर त्यांच्या नसे-नसेत भिनलेली होती. ते म्हणाले, 'मघापासून तुमचं पाटील रामायण गुमान मुकाट ऐकलं. साफ, खुल्लमखुल्ला बोलतो, राग धरू नका. पाटील म्हणून तुमच्या पुका-पासरीच्या तालेवारीला कवडीचीही किंमत नाही! कशापायी जगता ती एवढी धापा टाकत! कोण इचारतो तुम्हास? नथ गेली तरी भॉक राहिलं अशी गत हाय आजची तुमची. जरा डोळं शाप उघडे ठेवून बघा एक डाव आपलं आपल्याकडच. काय दिसतंय?''

मग एक-एक करीत विठ्ठलरावांनी सामाजिक अपराधाची, अज्ञानाची आणि भाकड-पोकळ डामडौलाची स्पष्ट उदाहरणं सर्वांसमोर ठेवली. त्यात लग्नातील हुंडा, त्यासाठी कर्ज, त्यामुळे होणारे गावोगावच्या शेतांचे लिलाव, जीव गेला तरी जपली जाणारी जात-पात, टोळधाड, प्लेग, महामारी यासारख्या हटकून दरसाल येणाऱ्या आपत्ती यांचा आपल्या घोगऱ्या परखड शब्दांत पाडा वाचला. तो सर्वांनीच मुकाट ऐकला. कुणीही त्यांच्या बोलण्याचा प्रतिवाद करू धजलं नाही. या पाटील दरबारानं विठ्ठलरावांच्यातील शेतकऱ्यांच्या हिताला

बांधणाऱ्या नेत्यानं जशी काही एक कातच टाकली. गावोगावच्या नगरी पाटील मंडळींना कळून चुकलं की विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील/ऊर्फ 'पेहेरेचा पाटील बुवा' हे पाणी काही आगळंच आहे.

या काळात पुण्याच्या केशवराव जेधे व काकासाहेब गाडगीळ या जोडगोळीनं पुण्याच्या परिसरातील सर्व जिल्ह्यात आणि खेड्यापाड्यांत काँग्रेस नेऊन पोहचविली होती. दोघेही अभ्यासू व तडफदार वक्ते होते. विठ्ठलरावांचा दोघांशीही दोस्ताना होता. जेधे-गाडगीळ ही जोडगोळी गावोगावच्या शेतकरी बंधूंना चांगलीच परिचित झाली होती.

विठ्ठलरावांच्या डी. एल. बी.च्या उमेदवारीला खरी धार चढली ती गोऱ्या सरकारनं पाणीपट्टी एक आण्यानं वाढविली, त्या वेळेला. या वाढीविरुद्ध त्यांनी दंड थोपटले. शेतकऱ्यांचे म्होरके म्हणून मिरवणारे डी. एल. बी. तील अनेक सहकारी या पाणीपट्टीच्या वाढीत गोऱ्या सरकारला सामील झाले. अनेक मातब्बर यात होते. 'एक आण्याची तर वाढ आहे' म्हणत त्यांनी पाणीपट्टी वाढ मंजूरही करून टाकली. तेव्हा संतापून उठलेल्या विठ्ठलरावांनी भरल्या मिटींगमध्ये सर्वांची परखड खरडपट्टी करून आपल्या डी. एल. बी. च्या पदाचा राजीनामा खरडून अध्यक्ष शिवराम थोरात यांच्या तोंडावर फेकला. या एकाच निर्भय कृतीनं अगोदरच गावोगाव पोहचलेल्या त्यांच्या नावाला निर्भयतेचं तेज लाभलं.

महाराष्ट्रात दूरवर सांगली जिल्ह्यात या वेळी शिक्षकांच्या आघाडीवर लक्षणीय घटना घडत होती. दूधगावच्या भाऊराव पाटील यांनी सुरू केलेली रयत शिक्षण संस्था सरकार दरबारी अधिकृतरित्या नोंदली गेली होती.

या काळात एके दिवशी संगमनेरच्या तहसिलदार कचेरीसमोर कलेक्टर संभाजीराव घाटगे यांच्या उपस्थितीत एक 'सहकार दिन' साजरा झाला. तो त्याकाळी फारच गाजला. प्रमुख पाहुणे असलेल्या कलेक्टर घाडगे साहेबांनी 'सहकाराचा पांढरा हत्ती' कशाला पोसायचा? असा खडा प्रश्न केला. कारणे दिली ती गावोगावच्या बुडीतात निघणाऱ्या सहकारी पतपेढ्यांची, ऐपत नसताना शेतकऱ्यांनी काढलेल्या कर्जांची, ती कर्जे वसुल करण्यासाठी फुकट वाया जाणाऱ्या वेळेची.

शेवटी कलेक्टरांच्या वतीनं आयोजकांनी एक प्रश्न विचारला : घाटगे

साहेबांच्या म्हणण्यावर कुणाला काही बोलायचं आहे का? जमलेले हजारो शेतकरी चिडीचाप झाले होते. मूग गिळून गप्प बसले होते. तेव्हा जमावातून हात वर करून विठ्ठलराव म्हणाले, 'श्यायब, मला बोलायचंय. असं कसं म्हणताय तुम्ही की एकूण एक सहकार वंगाळ हाय, डागाळ हाय. श्यायब, तुम्ही कधी नगरच्या दवाखान्यात गेलाय का? तिथल्या जनरल वॉर्डात गेलं आणि इकडून-तिकडं नजर फिरविली तर बिमारच बिमार दिसतात. म्हणून समदं नगरच बीमार म्हणायचं काय? दवाखान्याबाहेर पडलं की जगायसाठी आटा-पिटा करणारी, धावपळ करणारी बायाबापडी दिसत नाहीत काय?' विठ्ठलरावांच्या या सडेतोड निरुत्तर करणाऱ्या दाखल्यामुळं घाटगे साहेबही आवाक झाले. त्यांना अधिक आवाक करीत विठ्ठलरावांनी अखेरचा घाव घातला. 'श्यायब, बारशाला येऊन तेराव्याचं जेवण जेवायची सवय नाही आम्हा मराठमोळ्या किसानास्नी. ह्यो 'सहकार दिन' आहे. सहकारातील खराब-वंगाळ बाजूला सारून मुळचा विचार आम्ही वधारूनच चालवू.' विठ्ठलरावांच्या या बिनतोड विचारसरणीला जमलेल्या शेतकऱ्यांनी साथसोबत दिली.

१ सप्टेंबर १९३९ रोजी युरोपात दुसऱ्या महायुद्धाला तोंड फुटलं. जर्मनच्या हिटलरनं हा-हा म्हणता पोलंड या स्वतंत्र देशाचा घास घेतला. सगळं जगच त्यानं जाळावर घातलं. या दुसऱ्या महायुद्धानं उभ्या जगाचा चेहरा-मोहराच पार बदलून टाकला. हे महायुद्ध चांगलं १९४५ पर्यंत रेंगाळलं. जगभर हा-हा म्हणता महागाई वाढली. मानवी मूल्यांची समूळ उलथा-पालथ करणारं ठरलं हे दुसरे महायुद्ध. भारतावरही याचा परिणाम अटळ होता. दुसऱ्या महायुद्धात जर्मनी, इटली व जपान असा एक पक्ष होता आणि त्याच्या विरोधात इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका अशा दोस्त राष्ट्रांचा दुसरा पक्ष होता. भारतावर असलेल्या इंग्लंडच्या गोऱ्या सरकारला धारेवर धरण्यासाठी व कोंडीत पकडण्यासाठी हीच संधी नामी होती. म. गांधीजींनी जाणीवपूर्वक तेच केलं. दि. ८ ऑगस्ट १९४२ रोजी पडत्या पावसात जमलेल्या लाखो भारतीयांना साक्षी ठेवून त्यांनी निर्धारी घोषणा दिली - 'भारतीयांनो करा वा मरा. गोऱ्यांनो भारत सोडून चालते व्हा! चले जाव!!' गांधीजींचं हे ललकारतं आवाहन भारतीय स्त्री-पुरुषांनी मनःपूर्वक उचलित धरलं. पेटला - भारतीय स्वातंत्र्याच्या यज्ञकुंडातील अग्नी काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत धडधडून पेटला. भारताच्या इतिहासात या पूर्वी असा क्षण कधीच आला नव्हता.

ब्रिटिशांनी भारतीयांचा उद्रेक दडपून टाकण्यासाठी पं. नेहरू, सरदार पटेल, मौलाना आझाद, कृपलानी अशा गांधीजींच्या भक्तीच्या जवळजवळ १५-एक देशभक्तांना सभेनंतर लागलीच अटक केली. त्यांची रवानगी ताबडतोब दूरवरच्या अहमदनगर किल्ल्यात केली.

आता स्वातंत्र्याच्या लढाईची सूत्रं दुसऱ्या क्रमांकाच्या तरुण पिढीतील नेत्यांनी हाती घेतली. त्यात जयप्रकाश, लोहिया, एस. एम., नरेंद्र देव, ना. ग. गोरे अशी मंडळ होती. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या आघाडीवर अत्यंत लोकप्रिय असलेल्या क्रा. नाना पाटील यांनी 'प्रतिसरकार'चा (पत्रि सरकारचा नव्हे) छ. शिवरायांच्या गनिमी काव्याला जवळचा असा आगळा-वेगळाच लढ्याचा खेळ मांडला. विठ्ठलरावांनी या काळात क्रां. नाना पाटलांची पेटून उठलेली व खास कुणबाऊ ठणठणीत बोलीतील काही व्याख्याने ऐकली. नानांची रोकडी भाषा पटकन् त्यांच्या काळजाला भिडत असे. त्यासाठी भूमिगत असलेल्या क्रां. नाना पाटलांना विठ्ठलराव विखे पाटलांनी एकदा आपल्या वस्तीवर हात ओले करण्यासाठी पाचारणही केले होते.

१९४५ च्या अखेरीला जपानमधील हिरोशिमा, नागासाकी या दोन मोठ्या शहरांवर शेवटी अमेरिकेने दोन प्रचंड ताकदीचे अणुबॉम्ब टाकले. या जगातील पहिल्याच विनाशकारी अणुबॉम्बचा तडाखा एवढा जबरदस्त होता की काही मिनिटांतच दोन्ही शहरांत शब्दशः हजारो माणसांची राखरांगोळी झाली. कडव्या राष्ट्रभक्तीच्या जपानने त्यामुळे सरळ शरणागती पत्करली. ५ वर्षे जगाच्या काळजाचा ठोका चुकविणारं महायुद्ध एकदाचं थांबलं. दोस्त राष्ट्रांनी हिटलरच्या बर्लिन मधील बंकरला वेढा घातला. डोकीत गोळ्या झाडून घेऊन हिटलर संपला. त्याच्या जाण्याबरोबरच उभ्या जगानं अनेक आघाड्यांवर एक कात टाकली. संपूर्ण जगाच्याच नव्या जीवनाला प्रारंभ झाला.

दारिद्र्य, अज्ञान, रोगराई, अंधश्रद्धा, कर्जबाजारीपणा यांत लोणी बुद्रुक, संगमनेर, श्रीरामपूर, कोपरगांव यांसह नगर जिल्हाच नव्हे तर उभा महाराष्ट्र आणि बरोबरच हजारो खेड्यांनी भरलेला भारत यावेळी पांदीतल्या चिखलात रुतलेल्या बैलासारखा हताश-हताश होता. कोण काढणार त्याला बाहेर? मरण येत नाही म्हणून जगणाऱ्या शेकडो स्त्री-पुरुषांना कोण देणार होतं संजीवन? कसलं? आणि

कसं?

दि. १७ डिसेंबर १९४५ हा दिवस विठ्ठलराव विखे पाटलांच्याच नव्हे तर या देशातील शेतकऱ्याच्या जीवनातील सोन्याचा दिवस ठरला. या दिवशी बेलापूरला (आजच्या श्रीरामपूरला) तमाम नगरी शेतकऱ्यांची एक बागाईतदार परिषद भरली. या परिषदेत अंगच्या जन्मजात ऊर्मीनं विठ्ठलरावांनी जी मुसंडी मारली ती ऐतिहासिक ठरली. उंच कड्याचा विषय निघाला की एव्हरेस्ट पादाक्रांत करणाऱ्या अडाणी पण जिद्दीच्या शेर्पाचं - तेनसिंगाचं नाव आपोआप निघावं, तसंच काहीसं झालं. या बागाईतदार परिषदेनं लोणी बुद्रुकच्या विठ्ठलराव विखे पाटील या नगरी किसान आसामीचं पुढचं जीवनच बदलून टाकलं. कृतार्थ होण्यासाठी कुठल्याही सजीवाला जीवनाचा एक मकसद असावा लागतो, तो त्यांना मिळाला. कसला?

या बागाईतदार परिषदेसाठी बेलापूरच्या मराठी बोर्डिंगच्या परिसरात झाडून सारे तालेवार शेतकरी एकवट झाले. कोण नव्हतं त्यात? त्यात माधवराव गिरमे व आमदार रामचंद्र गिरमे होते. सिताराम रासकर, महादेवराव बोरावके, साहेबराव जाचक, नामदेवराव भोंगळे, गणपतराव कदम, चंद्रभान डाकले, शिवराम झंवर, सूर्यभान महाले, राम नारायण खटोड, गरूड, राब, शेंबेकर आणि विद्वांस असे कितीतरी धरतीचे लाल होते. एकेकाच्या गाठीशी १००-१०० बिघे जमीन असलेले. कित्येकांच्या गळ्याभोवतीची उपरणीच शे-दोनशेच्या असली जरीची होती. कैकांच्या पायीचे करकरीत, रंगीत नगरी जोडेच ५-५० रुपड्यांचे होते. कित्येकांनी हाताचे दोन्ही अंगठे सोडून बोटभर अंगठ्या चढवल्या होत्या. कित्येकांच्या कानात सोनेरी मोतीबंद भीकबाळ्याही होत्या. अद्याप परिषदेचे प्र. पाहुणे यावयाचे होते. जमलेल्या तालेवार शेतकऱ्यांत गट-गट करून गप्पांचा कलकलाट चाललेला होता. एकमेकांची खुशाली घेताना गावरान नगरी बोलीचे फवारे उडत होते. त्यातून उडालेले पानांचे लाल तुषार उपरण्यात अलगद उतरत होते.

सभेची वेळ झाली. पुण्याहून दोन गाड्या आल्या. त्यातून गोऱ्यांचे मंत्री असलेले ना. ल. म. पाटील, डॉ. गिल्डर सह उतरले. त्यांच्या मागून झळझळीत केतकी वर्णाचे काळी टोपी व गळाबंद कोट घातलेले, धोतरधारी, चष्मेवाली एक

सौम्य असामी उतरली. त्यांच्या पायातील साध्याच पुणेरी चपलांबरोबर बेलापूरच्या भूमीवर बरंच कांही उतरलं. ते होते डॉ. धनंजयराव गाडगीळ! मुळचे साताऱ्याचे, नंतर संपूर्ण भारत देशाला अर्थतज्ज्ञ म्हणून परिचित झालेले, कमी बोलणारे, अधिक विचार करणारे, त्याहून अधिक प्रत्यक्षात उठवून दाखविणारे.

बेलापूरच्या या ऐतिहासिक बागायतदार परिषदेला रीतसर प्रारंभ झाला. अध्यक्ष होते अर्थातच डॉ. धनंजयराव गाडगीळ. त्यांच्या दोन्ही हातांना खुर्च्यांवर बसले होते ना. गिल्डर साहब हे पाणीपुरवठा मंत्री. ते हुषार होते. पारशी होते. दुसऱ्या बाजूला दे. भ. ल. मा. पाटील होते. गिरम्यांच्या विनंतीवरून प्रथम गिल्डरसाहेब बोलले. म्हणाले, 'तुम्ही नगर जिल्ह्यातील प्रमुख प्रमुख बागाईतदार मिळून सहकारी तत्त्वांवर एक साखर कारखाना सुरू करता आहात, ही आनंदाची बाब आहे. सरकारच्या वतीनं मी तुमचं अभिनंदन करतो, पाणीपुरवठा मंत्री म्हणून तुम्हा सर्वांना एक ठोस आश्वासन देतो. पाण्याबाबत सरकारचे पूर्वीच काही खाजगी कारखानदारांबरोबर करार झालेले आहेत. ते पाळून शिल्लक राहिलेलं पाणी तुमच्या या कारखान्याला अवश्य देऊ.'

पारशी साहेबानंतर बोलले ते दे. भ. ल. मा. पाटील. ते म्हणाले, 'इथं खाजगी कारखाने असतानाही सहकारी साखर कारखाना काढत आहात. याचा मला आनंद आहे. सरकार दरबारी या कारखान्याला लागणारी परवानगी मी अवश्य मिळवून देईन. सभेचे अध्यक्ष गाडगीळ साहेब जाणते अर्थशास्त्रज्ञ आहेत. वेळोवेळी त्यांचं मार्गदर्शन घेत चला, त्यांना भेटत चला.'

या परिषदेचे आमंत्रक आमदार गिरमे यांनी सर्वात शेवटी अध्यक्ष धनंजयराव गाडगीळ यांना बोलण्याची विनंती केली. तसं गाडगीळ म्हणाले, 'तुम्ही नगरचे शेतकरी मिळून जो हा सहकारी साखर कारखाना उठवित आहात, तो देशाच्या इतिहासातील पहिलाच प्रयोग आहे. आज भारतात ठिकठिकाणी मोजकेच असे कारखाने आहेत. पण ते सर्वच खाजगी मालकीचे आहेत. सहकारी साखर कारखाना असा भारतात हा पहिलाच ठरणार आहे. त्यासाठी तुम्हा सर्वांचं मिळून काही एक मूळ भांडवल लागेल ते तुम्ही प्रयत्नपूर्वक उभे कराल याचा मला विश्वास आहे. याच क्षणी एवढंच सांगतो की माझ्या बँकेकडून जे लागेल ते सहकार्य माझे अधिकारी तत्काळ देतील. तुमच्यापैकी कोणाला या कारखान्याबद्दल काहीही

बोलायचे असेल तर ते विनासंकोच, मनमोकळं बोलावं.'

काही क्षण कमालीच्या शांततेत गेले. मग कसला तरी निर्धार बांधून विठ्ठलराव उठले. डूईचं पागोटं काढून त्यांनी आपला घामेजलेला रापट गुखडा क्षणैक पुसून घेतला. पागोट्याचा बोळा काखेत घट्ट धरून हात वर करून ते गरजले, 'गाडगीळ श्यायब, हाय - मला बोलायचं आहे.' तसं गाडगीळ साहेबांनी त्यांना हातानंच व्यासपीठावर येण्याची खूण केली. बैठकीवर बसलेल्या बागाईतदारांची फळी फोडत ते थेट व्यासपीठावर चढले. बागाईतदार परिषदेचे आमंत्रक व सभेचे आयोजक आमदार रामभाऊ गिरमे यांच्या हातून त्यांनी कर्णा आपल्या हातात घेतला. विठ्ठलराव दत्तभक्त होते. पुणतांब्यांच्या चांगदेवाचे भक्त होते. त्या दोघांचं त्यांनी मनोमन स्मरण केलं. सभेत बोलताना त्यांचा आवाज नेहमीच भसाडत असे. उभ्या नगर जिल्ह्याला त्यांच्या या विशिष्ट आवाजाची आता चांगलीच जान-पछान झाली होती. सर्वांवर आपली कसदार कुणबी नजर फिरवत, काखेतील पागोट्याचा गोळा घट्ट दाबत ते कडाडले, 'गांधीबाबा म्हणतोय, त्ये स्वराज्य येन्हार हे तर पक्कच हाय. आता ती काळ्या दगडावयली रेग हाय. पन ते कोनासाठी येनार? हे तुमी-आमीच ठरवायचं न्हवं? ह्ये गिल्डर श्यायब म्हणत्यात सरकारनं मागं खाजगी करखानदारांसह केलेले करार शाबुत ठेऊन उरलं, तर देऊ पाणी तुम्हास्नी! म्हणजे काहीच देणार नाही, असं त्यांचं म्हननं हाय! मी म्हणतो 'गरज पडली तर आता पूर्वीचे करार बगलेला ठेवावे लागतील. या कारखान्यासाठी नवे करावे लागतील. पुरेसा पानी पुरवठा नसेल, तर ती शेती होणार की काय व कारखाना चालणार तो कसा? विठ्ठलरावांचा हा खडा सवाल बिनतोड होता. त्यांच्या सवालानं जमलेल्या बागायतदारांचं खोपडीत आता कुठं पटकन दिवा लागला. अध्यक्ष गाडगीळ साहेबांच्याकडं बघून लागलीच विठ्ठलराव म्हणाले, 'श्यायब तुमी एवढे जाणतं. तुम्ही या समद्यांस्नी आशीर्वाद देऊन बी मोकळं झाला. पर ते मार्गी कसं लागणार, तेच उमगत नाही मला?

देशाचे थोर अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ तो नगरी सडेतोडपणा ऐकताना चक्रावले. नाराजीनं म्हणाले, 'काय म्हणायचंय तुम्हाला? ते नीट बोला. काय चुकलं माझं? स्पष्ट सांगा.'

हा क्षण ऐन मोलाचा होता. विठ्ठलरावांनी तोच उपजत शहाणपणाने

साधला. याच क्षणी त्यांनी बोट दाखवून उल्लेख केला असता, तरच सर्वसामान्य शेतकऱ्यांची दाद लागणार होती. नाही तर जमलेले सारे तालेवारदार 'बागायतदार' त्या शेतकऱ्याला प्लेगच्या उंदराकडे अलगद उचलून या कारखान्या बाहेर फेकणार होते.

याच क्षणी विठ्ठलराव सर्व बळ एकवटून ठामपणे म्हणाले, 'जशी काही महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मीच नियती होऊन त्यांच्या तोंडून बोलली. 'स्वराज्य सर्व सामान्यांसाठी येनार नव्हं? मग कारखाना बी गोर-गरिबांसाठी यायला पाहिजे.'

कपाळाच्या आठ्या चमत्कारिक आक्रसत गाडगीळ साहेब म्हणाले, 'नाही कोण म्हणतो? आमची तर तीच इच्छा आहे.'

तसं दालनभर हात फिरवीत विठ्ठलराव उत्तरले, 'हे समदे बडे बागाईतदार आहेत, श्यायब. शेतकरी कुणीबी न्हाई. माझा उन्हा-तान्हात राबणारा किसान बसलाय तिकडं रानात. त्यो एक-दिडा बिगा जमिनीचा मालक हाय. त्याला या भांडवलात भाग घ्यायचा हक्क मिळाला पाहिजे. ह्यो कारखाना सच्च्या अर्थाने समद्यांचा म्हणजे सहकारी व्हायला पाहिजे. धर्म, जात, भेद न मानता हर वावाच्या शेतकऱ्यांचा हात कारखान्यांच्या उठवणीला लागाय पाहिजे. फकस्त १५ भागावरच्या किसानांचा त्यो झाला तर त्योबी खाजगी कारखान्यांगत भांडवलदारांचाच हुणार की! त्या साध्या किसानांचा कसा राहील? विठ्ठलरावांच्या या रोखठोक तर्कशास्त्रानं परिषदेत कुजबूज माजली. समोर एक-एक जंगी बागाईतदार बसला होता. त्यातील एकालाही माघार घ्यायची सवय नव्हती. काही क्षण कलकलाट, कुजबूज झाली. शेवटी रामभाऊ गिरमे म्हणाले, 'कशी काय उभी करणार कारखान्याच्या भाग-भांडवलांची एवढी मोठी रक्कम किसानांच्या कडून पाटील?' त्यांची हाता-तोंडाची मारा-मार आहे. एक जात सर्व कर्जबाजारी आहे. लगीन कार्याला, बारशाला सुद्धा फुटकी दमडी नाही त्यांच्याकडं. कोण घेणार या भाग-भांडवलाची जिम्मेदारी पाटील?'

गिरम्यांनी वर्माला हात घातला होता. कळीचा सवाल उठविला होता.

विशेष आश्चर्याची बाब आहे ती ही की या प्रश्नावर विठ्ठलराव मुळीच गोंधळले नाहीत. क्षणभरही त्यांनी इकडे-तिकडे जाऊ दिला नाही. काखेतल्या पागोट्याचा बोळा उंच उचलून गिरम्यांसह सगळ्या परिषदेच्या मानकऱ्यांकडे

बघत, नगरचा तो जिद्दीतला मातीतला शेतकरी विठ्ठलराव विखे पाटील आपल्या भसाड्या बोलीत कडाडला, 'मी मी घेतोय ती जिम्मेदारी. मी उठवून दावीन कारखान्यांसाठी लागणारं भांडवल. माझ्या लहान्या-शेतकऱ्यांच्या खोपटा-खोपटांतून!'

झाली. दि. १७ डिसेंबर १९४५ या भारताच्या भूमीतील सहकाराच्या ऐतिहासिक रामायणाला कलाटणी देणाऱ्या दिवसापासून चक्रवर्ती सुरुवात झाली!

बेलापूरच्या परिषदेच्या दिवसापासून विठ्ठलरावांच्या जीवनाला प्रचंड कलाटणी मिळाली. १७ डिसेंबर १९४५ हा त्यांच्या आयुष्यातील एक क्रांतिकारक दिवस ठरला. त्यांच्यासमोर आव्हान होतं ते गोर-गरीब नगरी शेतकऱ्यांकडून कारखान्यासाठी २५ लाख रुपयांचं भाग-भांडवल उभं करणं हे. त्यासाठी त्यांनी आपले सहकारी शंकरराव तांबवेकर व मुरलीधर इंगळे या संताजी-धनाजीसारख्या कर्तबगार, कष्टाळू जोडीदारांनिशी कमर कसली. प्रथम त्यांना कारखान्यासाठी रीतसर सरकारी परवाना मिळवायचा होता. तसंच गावोगाव भटकून दातांच्या शब्दशः कण्या करत कारखाना उठविण्याशिवाय पर्याय नाही हे भवतीच्या ठार-अडाणी स्त्री-पुरुषांना पटवून देणं महत्त्वाचं होतं.

या वेळी विठ्ठलरावांचे वय होते ४९ वर्षे. त्यांचे जोडीदार होते - बाबूराव महाराज, यशवंतराव टेकावडे, गणपतराव अवताडे, शंकरराव धुमाळ, कर्नल मोहितेसाहेब, बापूसाहेब भापकर, के. बी. दादा, भाई संथ्था आणि असे अनेक. आपल्या सारंगी घोडीवर मांड ठोकून एक नगरी कुणबी शिलेदार परतंत्र भारतात शेतकऱ्यांचा स्वतंत्र सहकारी साखर कारखाना उठविण्याच्या मोहिमेवर निघाला. या भ्रमंतीत त्याला चांगले आले तसे जीवघेणे कटू अनुभवही आले. प्रसंगी नगरी बाया-बापड्यांनी आपल्या हाता-गळ्यातील दागिने विठ्ठलरावांना 'पाठचा भाऊ' मानून निर्धास्तपणे त्यांच्या ओंजळीत ठेवले. मात्र श्रीरामपूरच्या भरल्या व्यापारपेठेत व्यापाऱ्यांच्या खोड्याळ पोरांनी 'लोणीचं येडं पाटील' म्हणून हेटाळणी करत खडेही मारले. पण विठ्ठलराव दबले-बधले नाहीत. हटले नाहीत. अंगावरच्या खाकी कोटाच्या खिशात दशम्या चटणीचं कापडी गठुडं, उरात दुर्दम्य इच्छा शक्ती हेच विठ्ठलरावांचं यावेळी एकमेव मूळ भाग-भांडवल होतं. त्याच्या बळावर त्यांच्या अखंड भ्रमणयात्रेला प्रारंभ झाला. या यात्रेत कोल्हार, पिंपरी-

निर्मळ, सात्रळ, चिंचपूर, आश्वी, तिसगाव वाडी, हसनापूर, कुरणपूर अशा पंचक्रोशीतल्या झाडून साऱ्या लहान-थोर गावाचा समावेश होतो.

कारखान्याचा परवाना मिळवणं ही एक आघाडी होती. कारखान्यासाठी लागणारं भाग-भांडवल उभं करणं ही दुसरी आघाडी होती. पहिल्या आघाडीवर संगमनेरचे के. बी. दादा देशमुख, नगरचे बापूसाहेब भापकर आणि गाडगीळ साहेब यांची मदत होणार होती. दुसऱ्या आघाडीवर गावोगावचे इमानदार, सच्चे साथीदार शोधून घडवायचे होते. विठ्ठलरावांना ज्या आळंदीला जायचं होतं, तीचं नाव होतं- 'शेतकऱ्यांचा सहकारी साखर कारखाना'. त्या आळंदीच्या दिंडी यात्रेची वाट एकमेव होती - 'ऊस शेती' ही.

प्रथम शंकरराव तांबवेकरांनी कारखान्याच्या कायदेशीर नोंदणीसाठी लागणारा अर्ज व सर्व कागदपत्रे बिनचूक तयार करून आवश्यक तिथं सर्वांच्या सह्या घेऊन नोंदणी खात्यात दाखल केली. हे काम शंकररावानं ज्या शिताफीनं केलं ते बघून विठ्ठलरावांनी शंकरराव तांबवेकर या माणसाला हातातून कधीच सोडायचं नाही हा मनोमन निर्णय घेतला. या नोंदणीचं कार्यालय होतं पुण्यात. तिथं एक पटेल नावाचे अडेलतट्टू अधिकारी होते. ते काहीतरी खुसपट काढून अर्ज दाखल करून घ्यायलाच तयार नव्हते. यामागं एक गोम होती. शेवटी पटेल साहेबांनी कसातरी अर्ज दाखल करून घेतला. पण बरेच दिवस तो पुण्यातच दाबून ठेवला. खाजगी कारखान्याचे मालक असलेले बडे बागाईतदार नोंदणी खात्यावर दबाव आणत असावेत. विठ्ठलरावांच्या कारखान्याच्या नोंदणी अर्जाचं घोडं काही तसुभरही पुढं सरकेना. तसं त्यांनी शंकरराव तांबवेकरांसोबत थेट मुंबई गाठली. गोऱ्या सरकारचे सहकार खात्याचे मंत्री वैकुंठभाई मेहता यांची त्यांच्या ऑफिसात भेट घेतली. वैकुंठभाई हे थोर मनाचे सज्जन गृहस्थ होते. त्यांनी ताबडतोब नोंदणीचं आश्वासन दिलं. आणि थोड्याच दिवसांत ते पुरंही करून दाखविलं.

कारखान्याला लागणारं पाठबळ देण्यासाठी शक्य तेवढ्या अधिक पतपेढ्या सुरू करणं आवश्यक होतं. १९४६ मध्येच विठ्ठलरावांनी हसनापूर, बाभळेश्वर, कोल्हार आणि पाथवे बुद्रुक अशा चार गावी पतपेढ्या उठविल्या. यातून त्यांना सुलेमान पटेल, बालम व हाजी अहमद पटेल, लक्ष्मणराव, रामराव व भिमाजी म्हसके-पाटील, गंगाराम खांदे, मुरलीधर कडू असे जोमदार सहकारी मिळाले.

गावोगाव पतपेढ्या उठविणे, कारखान्याच्या भाग-भांडवलासाठी दारोदार भटकणे, कारखान्याच्या नोंदणीसाठी पुणे-मुंबईला फेऱ्या घालणे यातूनही विठ्ठलरावांनी एक महत्त्वाची गोष्ट केली. पूर्वी एकदा गाडगे महाराजांना त्यांनी आपल्या गावी आणलं होतं. त्यांचे विचार ऐकले होते. या सर्व धबडग्यात ते मनोमन ठेवून एकदा साताऱ्याला गेले. कर्मवीर भाऊराव पाटलांच्या 'रयत शिक्षण संस्थे'च्या स्थापनेची वार्ता केव्हाच त्यांच्या कानावर आलेली होती. साताऱ्याला ते कर्मवीर भाऊराव अण्णांची निवांत भेट घ्यायलाच गेले. भाऊरावांच्या केळीच्या बागेत एका संध्याकाळी त्या साताऱ्याच्या व या नगरच्या अशा दोन पाटलांची ऐतिहासिक भेट झाली. रयत शिक्षण संस्थेचं ध्येय-धोरण, कामकाजाची पद्धत विठ्ठलरावांनी या भेटीत प्रत्यक्ष कर्मवीर भाऊराव पाटलांच्या तोंडून बयाजवार ऐकली. शेतकऱ्यांच्या पुढच्या पिढ्यांच्या हिताची आच लागलेल्या या धोरणी अर्धशिक्षित शेतकऱ्यानं शिक्षणातील 'ओ की ठो' माहीत नसताना प्रत्यक्ष कर्मवीरांना एक आश्वासन दिलं. कसलं? तर नगर जिल्ह्यातही रयत शिक्षण संस्था सुरू करण्याचं!

दि. ३-१०-१९४६ रोजी पुण्याचे पतपेढी नोंदणी अधिकारी श्री. इक्राम यांच्या सहीचा एक लखोटा विठ्ठलरावांच्या हाती पडला. त्यांत लिहिले होते, 'सरकारने प्रसिद्ध केलेल्या गॅझेटानुसार तहसिल अकोला व संगमनेरमधील सहकारी सोसायट्यांतील वाद मिटविण्याची आपली 'लवाद' म्हणून एक वर्षासाठी निवड करण्यात आली आहे. या घटनेने विठ्ठलरावांच्या सहकारी क्षेत्रातील कामगिरीला पहिली सामाजिक मान्यता मिळत होती.

आता कुठं १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. देशाची फाळणी झाली. म. गांधीजींच्या आग्रहानं देशाचे पहिले पंतप्रधान झाले पं. जवाहरलाल नेहरू. राष्ट्रपती झाले डॉ. राजेंद्रप्रसाद, गृहमंत्री होते सरदार वल्लभभाई पटेल. अद्याप भारत या स्वतंत्र व लोकशाही देशाची राज्यघटना तयार व्हायची होती. भूमिगत झालेले क्रां. नाना पाटलांसारखे देशभक्त प्रकट होऊन केव्हाच कामाला लागले होते. देशाच्या स्वातंत्र्याची कुणकुण लागताच दि. २/३ ऑगस्ट रोजी पुण्याजवळ काँग्रेसमधील शेतकरी धार्जिण्या पुढाऱ्यांनी आळंदी येथे महाराष्ट्रातील 'शेतकरी कामगार पक्ष' या स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. या स्थापनेत केशवराव

जेधे, तुळशीदास जाधव, शंकरराव मोरे, भाऊसाहेब राऊत आणि त्यांचे सहकारी होते.

यावेळी मुंबई इलाख्याचे मुख्यमंत्री होते - आग्रही स्वभावाचे जुन्या पिढीतील आय. सी. एस. मोरारजीभाई देसाई.

एके दिवशी विठ्ठलरावांना बापूसाहेब भापकरांचा सांगावा आला की, 'कर्मवीर आण्णा नगरला आलेत. थाळ्याला बसला असाल, तर हात धुवायचाच नगरला या.'

विठ्ठलराव नगरला पोहोचले. तिथल्या मराठा बोर्डिंगच्या दालनात शिक्षणलोभी कार्यकर्त्यांच्या मेळ्यात बसलेल्या कर्मवीर आण्णांच्या पायांना हात लावून त्यांनी मनोभावे नमस्कार केला.

ही त्या दोघांची दुसरी भेट होती. आण्णांनी त्यांना विचारलं, "सध्या काय करता, पाटील, शेतकऱ्यांच्या जुपीचं? त्यांच्या कार्याचं?"

"कारखान्याचं भाग-भांडवल गोळा करत गावोगावच्या घरट्याखोपट्यांचे उंबरठे झिजवतोय, अण्णा. त्यात म्हनावं तसं येश अजून लाभत न्हाई. माझच मानसं मोडता घालून खीळ टाकण्याचा प्रयत्न करतात. व्यापाऱ्यांची शेंबडी पोरं भरपेठेत टवाळी करतात. काय करावं, ते समजत न्हाई. अजून कारखान्याच्या परवानगीचं काम सरकारात दोन वर्ष झाली, धूळ खात पडलंय. भाग-भांडवल घेणारे गावोगावचे किसानबंधू काहीच घडत न्हाई, म्हणून हवालंदिल झालेत. त्यांस्नी काहीच उद्योग नसलेले गावगुंड माझ्याखिलाफ चिथावणी देताहेत. वाटतं, हे कारखान्याचं लचांड फुका गळ्यात बांधून घेतलं. हे पेहरेत विसर्जन करून मोकळं व्हावं. लोकांचं घेतलेलं भाग-भांडवल त्याच्या व्याजासह मुरलीधर इंगळे, शंकरराव तांबवेकर यांच्या मदतीनं आता परत करावं आन्- आन् खरं सांगू, आण्णा, या लोनी, बेलापूर, कोपरगाव, संगमनेर अशा चाळीस क्रोशीत मार खाल्लेलं आपलं थोबाड पुन्हा दाखवण्यापरास रयत शिक्षण संस्थेचा झेंडा खांद्यावर घेऊन गावठाण घरदार सोडून तुमच्या संगती फिरावं - अवलिया म्हणून, असं वाटतंय! यासाठी येक करा - एकदा लोनीला माझ्या वस्तीवर चला. विनवणी हाय माझी. आम्हां लोकांच्या अडाणी पोरांच्या शिक्षणाचं झेपेल ते काम सांगा, मार्गी लावा."

असं विठ्ठलरावांनी सांगून हात जोडले आन् मोठ्या उमेदीनं आण्णांचे बोल ऐकायला कान टवकारले.

काही क्षण तो धिप्पाड देहाचा पहाडी पुरुष डोळे मिटून विठ्ठलरावांचा शब्दन् शब्द फक्त ऐकतच राहिला. मग शांतपणे डोळे मिटून कर्मवीर भाऊराव पाटील आण्णा म्हणाले,

''विठ्ठलराव, तुम्ही हाडाचे शेतकरी आहात. रक्ताचे पाटील आहात. जिद्दीचे शेलारमामा आहात. तुम्हीच अशी हाय खाल्ली नि हाती घेतलेलं काम तडीला न लावता त्याला पाठ दाखविली, तर पिढ्यान् पिढ्या कर्जबाजारात, अडाणी रुढीत रुतून बसलेला या भागातला काळीचा मुलगा कधीच मान वर काढणार नाही. त्याच्या पिढीचा तर होईलच, पण पुढच्या पिढ्यांचाही चिखलच होऊन जाईल. माझं ऐका, विठ्ठलराव, आमचं काम आम्हांला करू द्या - तुमचं तुम्हांला करायलाच पाहिजे. आता त्यातून सुटका नाही. जगदंबेचा पेटता पोत ऐन नवरात्रात तुम्ही हाती घेतला आहे, तो आता खाली ठेवता येणार नाही. स्वातंत्र्य आता ऐन तोंडावर आहे. तुम्हांला माघारी हटता येणार नाही. यावेळी तुमच्या लोणीला येऊ शकत नाही. माफ करा. यायचं, त्यावेळेला आल्याशिवाय राहणार नाही - विश्वास ठेवा.''

आण्णांनी विठ्ठलरावांचे जोडलेले हात आपल्या हाती घेतले. वडिलकीच्या मायेनं त्यांचे खांदे थोपटले. त्यांच्या पागुट्यावर आपला गुबगुबीत हातपंजा ठेवला. गावरान मराठी मुलुखातल्या निकोप देवदेताचा जसा त्यांना आशीर्वादच मिळाला.

मग त्या दोघांची बराच वेळ फक्त शिक्षणावरच बोलणी झाली. विठ्ठलरावांनी त्यांचा बोल आन् बोल कान देऊन ऐकून मनाच्या चंचीत चिकण्या सुपारीगत आबादान ठेवून टाकला.

का, कुणाला ठाऊक, जसं पुणतांब्याला चांगदेवाचं दर्शन घेऊन परतताना, सात्रळला अवधूत दत्तात्रेयाचं दर्शन घेऊन परतताना विठ्ठलरावांना न सांगता येणारं समाधान वाटत आलं होतं, तसंच आज वाटत होतं! खरं तर मोठा-मोठा न उकलणारा धीर-दिलासा वाटत होता.

या काळात विठ्ठलराव व त्यांचे सहकारी यांनी मिळून 'दी बागाईतदार

को.. ऑप. शुगर प्रोड्युसर सोसायटी लि. बुद्रुक लोणी' ही संपूर्ण देशातील पहिली-वहिली अठरा-पगड सर्वसामान्य शेतकऱ्यांची सोसायटी स्थापन केली.

विशेष म्हणजे थोर अर्थतज्ज्ञ डॉ. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी, सर्वांच्या आग्रहाखातर या संस्थेचं अध्यक्षपद स्वीकारलं.

या संस्थेचं संचालक मंडळ खालीलप्रमाणे होतं.

| | | |
|---|---|---|
| (१) | अध्यक्ष | - प्रा. डॉ. धनंजयराव गाडगीळ, पुणे. |
| (२) | उपाध्यक्ष | - विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील लोणी बुद्रुक. |
| (३) | संचालक | - डॉ. आर. जी. काकडे, पुणे. |
| (४) | -''- | - व्ही. पी. वर्दे, मुंबई. |
| (५) | -''- | - जे. एल. मेहता, मुंबई. |
| (६) | -''- | - कॅ. हंबीरराव अमृतराव मोहिते, अहमदनगर. |
| (७) | -''- | - शंकरराव एकनाथराव धुमाळ, कोल्हार. |
| (८) | -''- | - गणपतराव रंभाजी औताडे, श्रीरामपूर. |
| (९) | -''- | - यशवंतराव गोविंदराव टेकावडे, बेलापूर. |
| (१०) | -''- | - मुरलीधर गंगाराम कडू पाटील, पाथरे बुद्रुक. |
| (११) | -''- | - जगन्नाथ गणपत थेटे, कोल्हार. |
| (१२) | -''- | - गोपाजी भिमाजी घोलप, पाथरे बुद्रुक. |
| (१३) | कार्यकारी संचालक | - आर. जी. सुळे. पुणे. |

संस्थेचे जनरल सेक्रेटरी झाले - प्रारंभापासून पडेल ते काम करणारे शंकरराव तांबवेकर. चीफ इंजिनियर लाभले एन. सी. डे नावाचे कुशल बंगाली गृहस्थ.

एव्हाना लोणी, संगमनेर, अहमदनगर, पुणे, मुंबई असं वण-वण भटकून विठ्ठलरावांनी आपल्या शेकडो सहकाऱ्यांच्या मदतीनं लाखो रुपयांचे भाग-भांडवल संस्थेच्या नावावर जमा केलं होतं. तरी ते पुरेसं नव्हतं. वैकुंठभाई मेहतांच्या मदतीनं स्वतंत्र भारतात संस्थेची रीतसर सरकार दरबारी नोंदणी केली होती. आता प्रश्न होता कारखान्याची प्रत्यक्ष यंत्रणा उभी करण्याचा. इंजिनिअर डे साहेबांच्या सल्ल्यानं झेकोस्लाव्हाकियाच्या 'स्कोडा' कंपनीची मशिनरी घ्यायचं ठरलं. तिची

किंमत होती एक लाख सत्तर हाजार पौंड - म्हणजे २२ लाख ६० हजार रुपये. या मशिनरीच्या इंग्लिश ऑर्डरवर विठ्ठलरावांनी मोडीत सही केली. सेक्रेटरी तांबवेकरांनी ती पाठविली. दि. २३ एप्रिल १९५० रोजी 'सिरेंजर' नावाच्या खास बोटीनं 'स्कोडा' मशिनरी मुंबईत आली. ती तातडीनं सुमारे २४ लाख रुपये भरून ताब्यात घेणं आवश्यक होतं. तिचं पार्सल बंदरातच पडून राहिलं तर बंदराच्या नियमाप्रमाणे 'डिमरेज' वाढत जाणार होतं. ते चक्रवाढ व्याजाच्या गतीनं वाढणारं होतं. हे परवडणारं नव्हतं.

मशिनरी सोडवून घ्यायला शंकरराव धुमाळ, यशवंतराव टेकावडे, शंकरराव तांबवेकर, मुरलीधर इंगळे यांच्यासह मुंबईला गेलेले विठ्ठलराव हडबडले. यावेळी त्यांचा तारणहार मार्गदर्शक एकच होता - गाडगीळसाहेब! आपल्या सहकाऱ्यांसह विठ्ठलरावांनी पुणं गाठलं. कर्वे रोड लगतच्या धनंजयराव गाडगीळांच्या ते निवासस्थानी आले. 'स्कोडा' कंपनीचा पत्रव्यवहार आणि मुंबई बंदराचे कागदपत्र त्यांच्या समोर ठेवून म्हणाले, 'एकं टाकीनं २४ लाखांवर रक्कम मुंबई बंदरावर रुजू कराया पाहिजे. सोसायटीच्या खात्यावर एवढी रक्कम नाही. काय करायचं श्यायब? 'कोडा' फॅक्टरी ताब्यात घेतली नाही तर डिमरिज वाढणार. कदाचित फॅक्टरी एवढंच होईल ते! काय करायचं?

धनंजयरावही काही क्षण स्तब्ध झाले. मग म्हणाले, 'एक मार्ग आहे. मुंबई इलाखा सहकारी बँकेचे कार्यकारी संचालक व्ही. पी. वर्दे साहेब आहेत. ते बँकेमार्फत एकरकमी हे पेमेंट करू शकतील. पण त्यांना कोणीतरी जामीन राहावं लागेल.' क्षणैक शांतता-शांतता पसरली.

काही एक ठोस निर्धारानं आपल्या खांद्याभोवतीचं उपरणं नीट करत विठ्ठलराव शांतपणे उत्तरले, 'आम्ही तिघंबी जामीन राह्याला तयार आहोत. आम्ही म्हणजे मी, हे शंकरराव धुमाळ व यशवंतराव टेकावडे. त्यासाठी आमच्या जमिनी रीतसर लावून द्यायाला तयारी आहे आमची. काळजी करू नका श्यायब. वर्दे श्यायबास्नी चेक फाडाया सांगा.'

धनंजयरावांनी लागलीच आपल्या चिटणीसांकरवी वर्देंना फोन केला. वर्देंनी 'स्कोडा' कंपनीच्या नावाचा चेक तयार केला.

एखादी सुलक्षणी नववधू वाजत-गाजत नांदत्या घरात आणावी तशी

विठ्ठलरावांनी झेकोस्लाव्हाकियात तयार झालेली 'स्कोडा' नावाची साखर गाळणारी अद्ययावत मशिनरी बुद्रुक लोणीच्या भुताच्या माळावर आणली! त्यावेळचे मुंबई इलाख्याचे उद्योग व मजूर मंत्री ना. मालोजीराजे निंबाळकर यांच्या हस्ते दि. १७ जून १९५०, शनिवार रोजी आशिया खंडातील पहिल्या-वहिल्या सहकारी साखर कारखान्याचा कोनशिला समारंभ बुद्रुक लोणीच्या भुताच्या माळावर संपन्न झाला.

संतांचे सार्थ बोल आहेत -

*'खोडोनि शब्दांचे अंतर।*
*वस्तु दाखविन निज सार।*
*तोचि गुरू माहेर।*
*अनाथांचे॥'*

त्याप्रमाणे मार्गदर्शक, थोर अर्थतज्ज्ञ डॉ. धनंजयराव गाडगीळ, कर्मवीर भाऊराव पाटील, संत गाडगे महाराज यांचे बोल विठ्ठलरावांनी मनःपूर्वक ऐकले. सच्चा नगरी शेतकऱ्याच्या प्रामाणिक निष्ठेने, आपल्या अपार कष्टाने ते मार्गी लावले.

आता सहकारी कार्यकर्त्यांचा विठ्ठलरावांचा दोस्ताना कितीतरी वधारला होता. त्यात गणपतराव अवताडे, कोल्हारचे शंकरराव धुमाळ, जगन्नाथ थेटे, पाथऱ्याचे मुरलीधर कडू, गोपाळजी घोलप, श्रीरामपूरचे यशवंतराव टेकावडे असे गावोगावचे प्रामाणिक कष्टकरी होते. श्रीरामपूरचे आण्णासाहेब शिंदे राजकीय आघाडीवर सरसरून पुढे आले होते. त्यांची शेती व शेतकऱ्यांवरची अनेक अभ्यासपूर्ण व्याख्याने विठ्ठलरावांनी मन लावून ऐकलेली होती. त्यांचे बंधू रावसाहेब शिंदेही कायद्याचे चांगले अभ्यासक होते. दोघांही बंधूंना सामाजिक प्रश्नांत बारीक रस होता.

१९५० साली देशाच्या दृष्टीनं एक ऐतिहासिक मोलाची घटना घडत होती. दि. २६ जानेवारी १९५० रोजी भारत सार्वभौम प्रजासत्ताक झाला होता. देशाची राज्यघटना जाहीररीत्या दिल्लीत संसदेमध्ये घोषित करण्यात आली होती. डॉ. राजेंद्रप्रसाद हे भारताचे पहिले राष्ट्रपती म्हणून नियुक्त झाले होते.

या वर्षी दि. ३१ जानेवारी रोजी राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांचे राष्ट्रपती म्हणून संसद-सदस्यांसमोर पहिले जाहीर भाषण झाले. या पूर्वी तीनच दिवस अगोदर लोणीच्या कारखान्याला मशिनरी आयात करण्याचा परवाना मिळाला होता. हा केवळ एक योगायोग होता - खऱ्या प्रजासत्ताकाचा!

याच वर्षी १९४६ ते १९५२ या काळासाठी रद्द ठरविलेली श्री. दत्ता देशमुख यांची उमेदवारी कोर्टाने ग्राह्य मानली. त्यामुळे श्री. कोते पाटील यांची निवड रद्दबातल झाली. त्या जागी नंतर कोपरगावचे श्री. रोहम व अकोल्यातून श्री. दत्ता देशमुख यांनी पोटनिवडणूक लढविली. त्यात विठ्ठलरावांच्या पाठबळावर श्री. दत्ता देशमुख निवडून आले.

या वर्षी झालेल्या कारखान्याच्या पहिल्याच गळीत-हंगामाने दिलेला उत्पादनाचा प्रतिसाद लक्षणीय होता. या गळिताकरिता कारखान्याचे ऊस लागवडीखाली ७६६ एकर इतके क्षेत्र आणले.

याच गळितात कारखान्याने ३३,०५५ टन ऊस गाळला. त्याची ३७,५०१ पोती '२८ डी' ही म्हणजे पहिल्या प्रतीची साखर निघाली. या साखरेचा जास्तीत जास्त उतारा १२-०२ प्रतिशत इतका मिळाला. सरासरी उतारा ११-४९ प्रतिशत इतका मिळाला. या उताऱ्याचे श्रेय, बारकाव्याने लक्ष घालून आपले काम चोखपणे पार पाडणाऱ्या चीफ केमिस्ट श्री. एस्. डब्ल्यू. गोडबोले यांना सर्वांनीच आवर्जून दिले.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या पहिल्याच चालीत सहकाराचे तीन चोख पायंडे कारखान्याने पाडले. एक : सभासद नसलेल्या २० बिगर शेतकऱ्यांचा ५७६ टन ऊसही केवळ सहकार्याच्या भावनेने गाळून दिला. दोन : कारखान्याच्या कोणत्याही सभासदाला ऊस लागवडीखाली जास्तीत जास्त २५ एकरच क्षेत्र आणता येईल, असा संकेत सर्वांनी मान्य केला; व तीन : पहिल्याच वर्षी कारखान्याने शेती-सुधारणेसाठी 'शेती-सुधारणा' निधीच चालू करून एक आदर्श व दूरदृष्टीच्या सकस सहकारी पद्धतीचा पहिल्याने पाया रोवला.

या नंतर केवळ सहा महिन्यांतच उभ्या देशालाच एक जबरदस्त तडाखा बसला. दि. १५ डिसेंबर, १९५० रोजी भारताचे सार्वभौम प्रजासत्ताक कोरणारे शिल्पकार व देशाचे उपमहामंत्री, काँग्रेसअंतर्गत शेतकरी आघाडीचे अध्यक्ष

सरदार वल्लभभाई जव्हेरभाई पटेल यांचे दुःखद निधन झाले. देश एका पोलादी पाठबळाला पारखा झाला.

विठ्ठलरावांचं सारं चित्त आता कारखाना सुरळीत चालावा व त्यासाठी जोड म्हणून आवश्यक त्या बाबी वेळीच हाताशी असाव्यात, यावर एकवटलं होतं. यातच त्यांचा पतपेढ्यांचा कारखाना, डी. एल. बी.चे व्यवहार व आता कारखाना उठल्यामुळं आल्या-गेल्यांची देखभाल करणं हेही त्यांनाच बघावं लागत होतं. विठ्ठलराव ते गाव-चौकात कोल्हाट्यानं आडव्या उभारलेल्या काठीच्या पुलावर तोल सावरून कसरतीचे प्रयोग करावेत, तसं चौफेर ध्यान ठेवून करू लागले.

विठ्ठलराव कितीही सावध व तत्पर असले, तरी त्यांची जिंदगी हा श्रावणातल्या ऊनपावसाचा खेळ होता, हेच खरं. कारखान्यामुळं त्यांच्या जीवनात आता झळझळीत ऊन पसरलं. पण यानंतर पावसाची मारगिरी होणार, याचा कसलाच माग त्यांना आला नव्हता. त्यांची तिसरी बायको वेणूबाई पोटदुखीनं अचानक आजारी पडली. थोडेच दिवस अंथरूणाला खिळली. तिच्यावर संगमनेरचे डॉ. जोगळेकर, डॉ. काटे, डॉ. अब्राहम वडाळकर पति-पत्नी यांनी शक्य ते सर्व उपाय करून बघितले. ते लागू पडले नाहीत. अन् मग विठ्ठलरावांच्या सोबतीनं कारखान्याचा बॉयलर पाजळता करणाऱ्या वेणूबाईच्या जिंदगीचा बॉयलर मात्र गावदेव म्हसोबानं कठोरपणं फुंकून टाकला. वेणूबाई गेली.

करपवणाऱ्या संकटाची तिरीप एकदा भाजून गेली, की मग ती चढीवरच पडते, की काय, नकळे. वेणूबाई गेली आणि पंधरवड्यात खुद्द विठ्ठलरावांनीच अंथरूण धरलं. त्यांचा वाताचा विकार बळावला. त्यांचे दोन्ही मुलगे बाळासाहेब नि भाऊसाहेब आणि घरची मंडळी चिंतेत पडली. कारखान्याच्या नोंदणीपासून उभारणीपर्यंत झालेली धावपळ, प्रिय पत्नीचा अंत, दगदग व मनस्ताप यांचा तो परिणाम होता. त्यांच्यावर संगमनेरच्या डॉ. जोगळेकरांचे अन् पुण्याहून येऊन कारखान्यावर नुकतेच वैद्यकीय अधिकारी म्हणून रुजू झालेल्या डॉ. परांजपे यांचे उपचार सुरू झाले. गावोगावचे वैदूसुद्धा त्यांना प्रेमापोटी देशी औषधं आणून देऊ लागले. त्यांना लेटून विश्रांती घेण्याचा डॉक्टरांनी सल्ला दिला. ते तर त्यांच्या रक्तातच नव्हतं. निदान गुरुवारच्या दिवशी सकाळी सकाळीच ते हटकून म्हणत,

"बाबूराव महाराजांना बोलावून घ्या. आज बेस्तरवार आहे. त्यांच्या सोबतीनं मला सायळला दत्तदर्शनाला जायचं आहे."

ही मात्रा बरोबर लागू पडे. बैलगाडी जोडली जाई. बाबूराव महाराज व पोथी-मंडळातले दशरथबुवा म्हस्के, मैड, त्र्यंबक वाबळे यांना घेऊन सायळला ते जात. देवदर्शन करून येताना मात्र हटकून त्यांची गाडी कारखान्याच्या माळाकडं वळे. खरं तर त्यासाठीच ते वस्तीबाहेर पडलेले असत. ती आवारात येताच सुळे, डे, जोशी असे अधिकारी, तांबे, तांबवेकर, हजरनीस, खालकर, गोडबोले त्यांच्या गाडीला तत्परतेनं गराडा घालत. ते सवालामागून सवाल घालून कारखान्याच्या तब्येतीचा तपशील प्रथम वसूल करून घेत.

आठ दिवसांतच विठ्ठलराव खडखडीत बरे झाले. हिंडू-फिरू लागले. शंकरराव तांबवेकर व मुरलीधर इंगळे या जोडगोळीला आण्णांना लोणीचं आमंत्रण देण्यासाठी नगर भागात पिटाळले.

शिळेला माणूसपण देणाऱ्या रामाचे पाय लागावेत, तसे रयत शिक्षण संस्थेच्या दूरदृष्टीच्या शिक्षणाच्या उद्‌गात्याचे पाय विठ्ठलरावांच्या बुद्रुक लोणीच्या भुईला लागले. भाऊराव आण्णांच्या मागून त्यांचे खाजगी चिटणीस काटकर, हिशेबनीस मामा दाते, हेडक्लार्क मारूतराव शिंगटे व क्लार्क माळी असा ताफाही उतरला.

बेंबीपर्यंत पांढरी शुभ्र दाढी उतरलेले, पांढरा सफेद, खादीचा घोळदार नेहरू शर्ट घातलेले, तसलंच सफेद खादी गुडघ्याखाली उतरलेलं धोतर पेहनलेले, हातात जाड मुठीचा, तळपता टोमका घोळवणारे असे भाऊराव पाटील डोळ्याच्या कडेपासून कानशिलापर्यंत वळ्या पाडत निरागस हसले. सर्वांना नमस्कार करू लागले. तेव्हा विठ्ठलरावांना सय झाली, ती थेट त्या वऱ्हाडी अवलियाची - गाडगेबाबांची! दोघांत कसला तरी बेमालूम मेळ होता, हे नक्कीच.

दुपारी त्यांच्या थाळा व विश्रांती होताच विठ्ठलराव त्यांना भेटायला बंगल्यावर गेले. ही त्या दोघांची फारा दिवसानंतरची भेट होती. विठ्ठलरावांना पाहिजे, तशी ती निवांतपणे घडत होती.

आण्णा त्यांना म्हणाले, "विठ्ठलराव, फार नामी आणि आपल्या मराठी मुलुखातल्या गावोगावच्या शेतकऱ्यांनी दाखला घ्यावा, असं काम उठवलंत

तुम्ही. शाबास आहे तुमची. एक शाळा उठवायची, तर काय ताप होतो, याची कल्पना आहे मला. तुमचा हा नगरचा भाग आता सुख-समृद्ध होईल. आपणां शेतकऱ्यांची पोरं म्हणजे अकलेच्या बँकाच आहेत, असं मी नेहमी म्हणतो व मानतो. त्या निगा राखून नीट चालवल्या पाहिजेत. साखरेचा उठला, तसा शिक्षणाचाही कारखाना तुमच्या भागात उठला पाहिजे. आणि तोही माझ्या रयत शिक्षण संस्थेचाच. आता हे काम तुम्ही मनावर घेतलंच पाहिजे. तुम्ही साताऱ्याच्या भेटीत दिलेला शब्द मी मनाच्या कुपीत जपून ठेवला आहे. त्याची आठवण देण्यासाठी....''

''मला चांगली सय हाय त्येची, आण्णा. तुमी शब्द टाकावा. तो भुईवर पडायचा न्हाई. या लोनीकर विठ्ठल पाटलाची वंजळ, तो वयल्या वर झेलील. खातर बाळगा.'' विठ्ठलराव मध्येच बोलले.

आण्णा, विठ्ठलरावांकडून त्यांनी बांधलेली खूणगाठ पटताच नेहमीसारखं लहान मुलागत कानशिलाकडं वळ्या पाडत निरागस हसले. म्हणाले, ''हा नगरी विठ्ठल, नुसता कटेवर हात ठेवून विटेवर पाय रोवून कधीच थांबणार नाही, याची खात्री आहे मला. विठ्ठलराव, तुमच्या नगर भागात एकशे एक शाळा काढायचा संकल्प, मी नगर भागाची वेस ओलांडताच सोडला आहे. नुसती 'वंजळ' कामाची नाही. पायाखालची वीट सोडून त्यासाठी गावोगावचा माग घ्यायला माझ्यासंगती फिरावं लागेल. कसं काय? येताय?''

''तयारी हाय, आण्णा. कवाबी आन् त्येबी एका पायावर.'' विठ्ठलरावांनी त्यांच्याच मिस्किल बोलीत दाद दिली.

''मग आजच निघायचं आहे अशा भटकंतीवर. अशा गावांचा माग घ्या, जिथं शाळा उठू शकतील. आपण आपले कार्यकर्ते घेऊन त्या-त्या गावांना जायचं आहे.''

विठ्ठलराव थोडा वेळ थांबून नेमकी गावं डोळ्यांसमोर घेत म्हणाले, ''जाऊ की आपण, आण्णा-आश्वी, कोल्हार, सायळ, कोळपेवाडी अशा गावांना. तिथं रावसाहेब मोहनीराज शिंदे, सर्जेराव दाजी तांबे, पाराजी जगन्नाथ थेटे, एकनाथ सयाजी कडू, मारूतराव तात्याजी देवकर अशी शिक्षण - लोभी माझी माणसं आहेत. शिक्षणाच्या बाबीनं पडेल ती जोड-साथ देतील. हटनार नाहीत. पर

पहिली लाभाची शाळा आन् तीही तुमच्या हाताची माझ्याच गावात निघाली पाहिजे - लोनीत! व्हय म्हना.''

आण्णा पुन्हा हसले. ''काढू. ते तर सहजच ओघानं आलं. मुहूर्ताचा मानाचा नारळ तुमचाच.''

त्या दिवशी भाऊराव आण्णांशी विठ्ठलरावांच्या मनमुराद गप्पा झाल्या. आणि त्याही फक्त शिक्षणावर.

आठ-दहा दिवसांचा दौरा उरकून आण्णांसह विठ्ठलराव पुन्हा लोणीत आले. आण्णांच्या तोंडूनच विठ्ठलरावांना गावातील शाळेची घोषणा करायची होती, म्हणून जिथून गावसुधारणेच्या प्रत्येक कामाला विठ्ठलरावांनी हात घातला होता, त्या म्हसोबाच्या देवळासमोर एका संध्याकाळी गावकऱ्यांची सभा बोलावली. आण्णांनी आपल्या अनुभवी व व्यवहारी भाषेत जमलेल्या लोणीकरांना शिक्षणाचं मोल नाना ढंगांनी पटवून दिलं. ते शवटी म्हणाले,

''या भागात माझ्या रयत शिक्षण संस्थेची पहिली शाळा तुमचे आप्पा व माझे बंधू विठ्ठलराव विखे पाटील यांच्या पाठबळावर आम्ही लवकरच खोलत आहोत. त्यांच्या इच्छेप्रमाणं या शाळेचं नाव म. गांधी विद्यालय ठेवलं जाईल. तुम्ही सर्वांनी या शिक्षणाच्या पवित्र कार्याला सहकार्य द्यावं, ही या भाऊरावाची तुम्हांला हात जोडून विनंती आहे.''

आभार मानताना विठ्ठलरावांनी घोगरल्या शब्दांत जाहीर केलं, ''भाऊराव आण्णा, तुमच्या रयत शिक्षण संस्थेच्या शिक्षण - कार्यासाठी माझ्या कारखान्याची हातजोड म्हणून दर टनामागं पंचवीस पैसे असा **'शिक्षण फंड'** मी सर्वांच्या साक्षीनं व वतीनं जाहीर करीत आहे. आपण तो थोर मनानं आपलासा मानावा. तुमचे आशीर्वाद सदैव आमच्या पाठीशी असावेत.''

विठ्ठलरावांची ही घोषणा ऐकून गावकऱ्यांनी आनंदानं टाळ्या तर उठवल्याच, पण हातातला टोमका घरंगळता सोडत प्रत्यक्ष आण्णांनीही टाळ्यांची दाद दिली. त्यांचा टोमका स्टेजवरच्या फरशीवर ठणठणत उतरला. जशी ती उद्याच्या येणाऱ्या शिक्षणाच्या जागरणाची घंटेसारखी ठणठणती नांदीच होती.

रयत शिक्षण संस्थेच्या शाळा विठ्ठलरावांच्या भागात खोलण्यासाठी भाऊराव आण्णा चाचणी-दौरा करून गेले होते. त्यानंतर त्यांची अधून मधून पत्रं

येत होती. बरेच दिवस भेट मात्र झाली नव्हती. म्हणून विठ्ठलरावांनीच सातारला आण्णांना पत्र लिहून भेटीला येत असल्याचं कळवलं. एके दिवशी त्याप्रमाणं विठ्ठलराव त्यांच्या द्रुपदाबाई अन् पार्वतीबाई या दोन्ही बायका, तसेच मोठा मुलगा बाळासाहेब यांना सोबत घेऊन साताऱ्याच्या शिक्षणऋषीच्या दर्शनासाठी साताऱ्याला गेले. या दौऱ्यात साताऱ्याचे शाळा प्रमुख रा. सु. पाटील यांच्या घरी त्यांनी मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी भल्या सकाळी कर्मवीर आण्णांची भेट घेतली. लोणीत सुरू झालेल्या गांधी-विद्यालय या नगर भागातल्या 'रयत'च्या पहिल्या शाळेची माहिती त्यांच्या कानांवर घातली. पुढं कुठं कुठं शाळा खोलता येतील, याचा तपशील त्यांच्यापुढं ठेवला. त्यांनी दिलेल्या बारीकसारीक सूचना ध्यानपूर्वक ऐकल्या. आण्णांनी या भेटीत विठ्ठलरावांना त्यांच्या ट्रेनिंग कॉलेजला व अष्ट्यातील रयतच्या संस्थांना भेट देण्याचा आवर्जून सल्ला दिला. तिथं ट्रेनिंग कॉलेजचे प्राचार्य म्हणून एस. के. उजवणे हे विद्यार्थीप्रिय गृहस्थ काम बघत होते. मोठ्या तळमळीचा अन् कष्टाचा माणूस. त्यांनी विद्यार्थ्यांच्या श्रमदानावर एक इमारत बांधण्याचं काम हाती घेतलं होतं. विठ्ठलराव त्यांच्या दोन्ही बायकांसह अन् बाळासाहेबांसह इमारतीचं बांधकाम बघायला सातारच्या ट्रेनिंग कॉलेजात गेले. तिथं प्रा. अत्तारांनी त्यांचं स्वागत केलं. फिरून त्यांना बांधकामाची माहिती दिली.

''रयतचा विद्यार्थी नुसता पुस्तकी पढीक शिक्षण घेणारा पोपट होता कामा नये. तो स्वावलंबी व खंदा नागरिक झाला पाहिजे. आपल्या पायांवर उभा राहिला पाहिजे,'' असा भाऊराव आण्णांचा आग्रह होता. तो त्यांचा मुलुखभर गाजलेला शैक्षणिक सिद्धांतच होता. विठ्ठलरावांना विटा उचलणाऱ्या व पाट्या टाकणाऱ्या विद्यार्थ्यांना बघताना त्याचा पडताळा आला.

दुसऱ्याच दिवशी विठ्ठलराव त्यांच्या कुटुंबियांसह सांगलीतर्फेच्या अष्टा या गावी गेले. संगती प्रत्यक्ष भाऊराव आण्णाच होते. तिथं ते शे. का. पक्षाचे उमदे व तडफदार कार्यकर्ते ढवळीचे एन. डी. पाटील यांना भेटले. आण्णांनी त्यांना पत्र लिहून विठ्ठलरावांना रयतच्या शिक्षण संस्थांची माहिती देणं व त्या भागातल्या लोकांची ओळख-पाळख पटवून देणं हे काम करण्यासाठी बोलावून घेतलं होतं. एन. डी. विठ्ठलरावांना कमालीचे हुशार व अभ्यासू वाटले. ते

एकसारखे सर्व प्रकारची माहिती देत बोलतच होते. त्यांनी अष्ट्यातल्या 'रयत'च्या म. गांधी विद्यालय, लठ्ठे अध्यापन गृह, वसतिगृह अन् शेतीविभाग पाहिला.

विठ्ठलराव, कळत्या वयापासून दत्तभक्त असल्यामुळं शेजारीच असलेल्या औदुंबर या दत्तस्थानाला भेटण्याची इच्छा आण्णांना बोलून दाखविली. त्यांनी विठ्ठलरावांसोबत एन. डी. पाटलांना जोडून दिलं. कृष्णेच्या विशाल डोहाकाठी व वडाच्या सावलीत औदुंबर वसलेलं आहे. ते बघताना अनेक ताप-भोग सोसलेलं, टक्के-टोपणे खाल्लेलं विठ्ठलरावांचं कुणबाऊ मन थोडं निवांत झालं. औदुंबरच्या दत्तात्रयाचं दर्शन घेऊन सातारामार्गे ते कुटुंबीयांसह लोणीला परतले.

या वर्षीच्या अखेरी अखेरीला एक महत्त्वाची घटना घडली, मराठवाड्यातील औरंगाबादेकडील शेतकऱ्यांच्या नि कामकऱ्यांच्या विकासाची आच लागलेल्या मराठवाड्यातल्या उद्धवराव पाटील, शेषराव देशमुख, गव्हाणे गुरुजी अशा शेतकरी नेत्यांनी एक शेतकरी परिषद औरंगाबादेत भरावयाचा संकल्प सोडला. त्यासाठी त्यांनी मुंबईला जाऊन यशवंतराव चव्हाण यांना अध्यक्षपदाचं निमंत्रण दिलं. त्यांनी ते कर्तव्यबुद्धीनं स्वीकारलं. मुंबईहून परतताना मराठवाड्यातील मंडळींनी विठ्ठलरावांना लोणीत गाठलं. आणि त्यांनी परिषदेचं स्वागताध्यक्षपद स्वीकारायला पाहिजे, अशी गळ घातली.

विठ्ठलराव त्यांना म्हणाले, "इतकी मोठी माणसं तुमच्या हाताशी असताना मला या भाषणबाजीच्या लफड्यात कशाला गुंतवता?"

पण औरंगाबादकर मंडळी ऐकायला तयार नव्हती. त्यांनी स्वागताध्यक्षपदाचा वीणा शेवटी विठ्ठलरावांच्या गळ्यात चढवलाच.

१९५१ साली वैशाखात विठ्ठलरावांचे कर्तबगार वारस यांचा शुभविवाह झाला. येवला तालुक्यातील मुखेडच्या श्री. शिवराम महितपराव आहेर यांच्या सुशिल व कुटुंबवत्सल कन्या सिंधुताई या बाळासाहेबांच्या पत्नी व विठ्ठलरावांच्या सुनबाई होत. या सिंधुताईनं पुढं उतारवयात विठ्ठलरावांची आपल्या पित्याप्रमाणे दूर्धर व्याधीत न कंटाळता सेवा-शुश्रूषा केली.

१९५२ मध्ये शेतकऱ्यांसमोर सगळ्यांत मोठा सवाल होता, तो पाण्याचा. त्यासाठी भागातील शेतकऱ्यांनी श्रीरामपूर येथे पाणी-परिषद बोलावली. आजपर्यंत नगरच्या भागात पाणी-पुरवठा होत होता, तो कधी काळी १९४६ साली झालेल्या

पाणी-वाटपाच्या तत्त्वानुसार, करारानुसार. ते करार आता बेफाम झाले होते. वाढती ऊस-शेती अन् पाण्याची वाढती गरज लक्षात घेऊन नवे करार करणं आवश्यक होतं. परिषदेचं अध्यक्षस्थान धनंजयराव गाडगीळसाहेब साजरं करणार होते. त्यासाठी नेहमीप्रमाणं काकडेसाहेब व साथीदार घेऊन ते पुण्याहून श्रीरामपूरला आले. विठ्ठलरावही लोणीहून परिषदेसाठी श्रीरामपूरला पोहचले. त्यांच्यासोबत चंद्रभान घोगरे पाटील, मारूती बाप्पा गायकवाड, गोपाजी भिमाजी घोलप, जगन्नाथ थेटे अशी शेलकी शेतकरी मंडळी होती.

ते सर्वजण श्रीरामपूरला पोहचले, तेव्हा परिषदेला सुरुवात होऊन घंटा, दीड घंटा उलटला होता. या काळात जमलेल्या बड्या बागाईतदारांनी आपल्याला पाहिजे तसा पाणी-वाटपाचा राबता जवळजवळ मंजूर करून घेत आणला होता. विठ्ठलराव पोहचले, तेव्हा रूई, तालुका कोपरगाव या गावचे बाबूराव किसनराव कडू बोलत होते. थोड्याच वेळात आपलं बोलणं आवरून ते बसले. विठ्ठलरावांनी अवती-भोवती बसलेल्या लोकांना विचारून परिषदेचा माग घेतला. पसार होत आलेल्या ठरावानं छोटे शेतकरी अलगद बगलेला टाकले जाणार, हे पटकन विठ्ठलरावांच्या ध्यानी आलं. विठ्ठलरावांनी हात उठवून अध्यक्षांची परवागनी घेतली आणि नेमक्या त्याच प्रश्नाला तोंड फोडत म्हणाले,

''अध्यक्षसाहेब, माझ्या कारखान्याचा भागधारक शेतकरी बडा बागाईतदार नाही. पाण्याचं वाटप जे काही व्हायचं असेल, ते समान पद्धतीनं झालं पाहिजे, असं माझं म्हणणं आहे. नव्हे, तो माझा आग्रह आहे. इथले मोठे बागाईतदार लोकसत्तेच्या ताब्यात असलेल्या, भंडारदऱ्याचं पाणी ब्लॉक जादा घेऊन उपसणार. त्यानं उठलेला ऊस खाजगी कारखान्याच्या वाटेला लावणार. दुष्काळाचा माग देणाऱ्या या सालात माझा छोटा शेतकरी 'पाणी-पाणी' म्हणत तळमळणार - अधांतरीच. हे अन्यायाचं आहे. ते थांबलंच पाहिजे.''

आत्तापर्यंत अशा पद्धतीनं मनातल्या बेताला जोड देणारं परिषदेत कुणीच बोललं नसल्यामुळं गाडगीळसाहेब परिषदेचे अध्यक्ष म्हणून कोंडीतच पडले होते. त्यांच्या मनातला विचारच विठ्ठलरावांनी बोलून दाखविल्यामुळं त्यांनीही आपल्या खुर्चीवरून विठ्ठलरावांचीच बाजू लावून धरली. जाणतेपणानं ते म्हणाले,

''विठ्ठलराव म्हणतात, ते रास्त आहे. प्रथम इथला लहान शेतकरी तगला

पाहिजे, मग बड्यांची बाब. पाण्याच्या समान वाटपाबाबत मी त्यांच्याशी पूर्णतः सहमत आहे. तसं मी शासनाला कळविणार आहे.''

परिषदेचं कुजू बघणारं पान विठ्ठलरावांनी परतवलं. जे मनात धरून त्यांनी लोणी सोडलं होतं, तसेच ठराव परिषदेत पसार झाले. अकलेचं सारं चतुरपण पणाला लावून गाडगीळसाहेबांनी ते आपल्या समजावणीच्या नरम भाषेत सर्वांच्या गळी उतरवले. परिषद उलगल्यावर ते उतरले होते, त्या बंगलीत विठ्ठलरावांनी त्यांची निवांत भेट घेतली. त्यांच्या चतुरपणाबद्दल मनापासून त्यांनी त्यांचे आभार मानले. व म्हणाले, ''आमच्या कारखान्याचे अध्यक्ष शोभता तुम्ही, गाडगीळसाहेब!''

तसं गालांतल्या गालांत हसत ते म्हणाले, ''मी अध्यक्ष नाममात्र. खरे बोलवते धनी तुम्ही. तुम्ही आज नसते आलात, तर खरोखरच मी कोंडीत पडलो असतो.''

श्रीरामपूरची पाणी-परिषद पार पडली.

कारखान्याच्या वाटचालीतला एक अत्यंत महत्त्वाच्या समारंभाचा दिवस दुमदुमून उठला. तो होता : १३ एप्रिल १९५४ हा! दिवस ऊनतापीचे होते. या वर्षी सर्व राज्यभर 'सहकार सुवर्ण महोत्सव' ठिकठिकाणी मोठ्या दिमाखदार उत्साहानं साजरा होणार होता. यापूर्वी १९०४ साली फ्रेड्रिक निकल्सनच्या प्रयत्नानं सहकाराचा पहिलावहिला कायदा पास झाला होता, आज त्याला पन्नास वर्ष पूर्ण होत होती. देशभरची सहकाराची चळवळ आता अनुभवाचे टक्केटोणपे खाऊन जाणती होत एकावन्नाव्या वर्षांत आपलं कष्टाळू पाऊल ठेवीत होती.

या समारंभाच्या तयारीसाठी विठ्ठलरावांसह सर्व जण मार्च महिन्याच्या अखेरीपासूनच जुंपले गेले. सर्व संचालकांची बैठक घेऊन या सुवर्ण महोत्सवाला प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई प्रांताचे सहकारमंत्री मा. ना. एम्. पी. पाटील यांनाच आणायचा निर्णय एकमुखी घेण्यात आला. त्यांना रिवाजी आमंत्रण देण्यासाठी संस्थेचे कार्यकारी संचालक सुळेसाहेब व तांबवेकर यांनी मुंबईला केव्हा जायचं, तेही ठरवण्यात आलं. १३ तारखेला पूर्वीचा भुताचा माळ व आजचा प्रवरानगरचा परिसर विजेच्या रंगीबेरंगी दिव्यांच्या रोशणाईनं झळझळून काढण्याचं ठरलं. त्याचं कंत्राट कुणाला द्यायचं, याचाही निर्णय घेण्यात आला. या समारंभाची आमंत्रणं

कुणाकुणाला पाठवायची, याची यादी करण्यात आली. या वेळी विठ्ठलरावांना फार फार जाणवलं, की नेमके आज वैकुंठभाई सहकारमंत्री नाहीत, हे! त्यांनी बैठकीत ही यादी तयार होत असताना पहिलं नाव घेतलं, ते त्यांचंच - ते म्हणाले,

''वैकुंठरायांना या समारंभाचं लाभाचं पहिलं-वहिलं आमंत्रण गेलं पाहिजे. त्याला जोडायच्या सुळेसाहेबांच्या पत्रासोबत मी माझ्या लिखावटीत त्यांना खाजगी पत्र देणार आहे. मला विश्वास आहे, की ते नक्कीच येतील. तसंच काही कारण घडलं, तरच ते थांबतील.'' याचबरोबर विठ्ठलरावांनी कर्मवीर भाऊराव पाटील, मुंबई प्रांताचे विधानसभेचे माजी सभापती श्री. भाऊसाहेब फिरोदिया व बाळासाहेब भारदे यांनाही आमंत्रणं दिली.

या सहकार सुवर्ण महोत्सवाच्या प्रत्यक्ष कार्यक्रमाची रीतसर आखणीही करण्यात आली. पाहुण्यांचं स्वागत कुणी करावं, प्रास्ताविक कुणी करावं, आभार कुणी मानावेत, येणाऱ्या बुजुर्गांची सोय कुठं कुठं नि कशी कशी करावी, हे ठरविण्यात आलं.

विठ्ठलरावांना असंही कळलं होतं, की मुंबईत हा समारंभ फार मोठ्या प्रमाणात साजरा होणार आहे. त्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून पंडितजीच येणार आहेत. म्हणून ही बैठक सरतीला येताना विठ्ठलराव म्हणाले,

''आपल्या कारखान्याचं म्हणून मुंबईत साजऱ्या होणाऱ्या समारंभात एक प्रदर्शनाचं सवतं दालन जरूर खोलावं. ते नीटनेटकं मांडलेलं असावं. त्यात आपल्या कारखान्याची छोटीशी छबीच जितनित उभी करावी. तिथल्या दालनावर काम करण्यासाठी चतुर व बोलकी माणसं नेमावीत. त्यांनी प्रमुख पाहुणे म्हणून येणाऱ्या पंडितजींना काहीही करून आपलं हे दालन जरूर दाखवावं. त्यांना आपल्या कारखान्यात होणाऱ्या साखरेची एक भरगच्च पिशवी भेट देण्यात यावी.''

विठ्ठलरावांची ही कल्पना सर्व सदस्यांनी उचलून धरली. तेरा तारीख जसजशी जवळ येऊ लागली, तसतशी कारखान्याच्या पहारेकऱ्याकडून तो तहत सुळे, डे साहेब यांच्यासह विठ्ठलराव आणि सारे संचालक कमर कसून कामाला जुंपले. पिण्याच्या पाण्यापासून तो येणाऱ्या पाहुण्यांच्या अंथरूण-पांघरूणापर्यंत जुपी करावयाची होती. कारखान्याचं आवार स्वच्छ झाडून साफ करण्यात आलं.

सगळ्या इमारतींना नवी रंगरंगोटी करण्यात आली. एका लोणीतच नव्हे, तर भोवतीच्या चाळीसक्रोशीत उत्साहाचं, अखंड धावपळीचं, पडेल ते काम करण्याच्या हिरिरीचं वारं संचारलं.

लोणी गाव असं होतं - जिथं एके काळी सूर्याचं सावटसुद्धा दिसू न देणारी टोळपाखरांची धाड येऊन गेली होती. आता तिथं कलकलत्या पाहुण्या-रावळ्यांच्या चहूबाजूनं रांगाच रांगा लागणार होत्या.

'सहकार सुवर्ण महोत्सवाचा' दिवस झळझळून उठला! १३ एप्रिल, १९५४! लोणीच्या चहूबाजूंना आंबवतीच्या कमानी, रंगीबेरंगी पताकांच्या साजात डौलानं उभ्या राहिल्या. ठरल्या वेळी मा. ना. एम्. पी. पाटीलसाहेब आपले मित्र व चिटणीस यांसह गाडीतून मुंबईकडून येणाऱ्या वेशीच्या कमानीसमोर आले. तसेच खास पाहुणे म्हणून कर्मवीर आण्णा, भाऊसाहेब फिरोदिया व बाळासाहेब भारदेही आले. विठ्ठलराव आणि त्यांचे मैतर शंकरराव धुमाळ, लक्ष्मणराव म्हस्के पाटील, मुरलीधर इंगळे अशा सर्वांसह त्यांचं जंगी हार घालून स्वागत केले. ताशे, नगारे झडझडले. मुंबई प्रांताचे सहकार मंत्री, सर्व जाती-जमातींच्या सभासदांनी चालवलेल्या सहकारी चळवळीच्या सुवर्ण महोत्सवासाठी लोणीच्या वेशीतू आत आले.

सर्वांनी ठरवला, तसा हा समारंभ काहीही न खटकता अमाप उत्साहात पार पडला. आपल्या भाषणात मा. ना. एम्. पी. पाटीलसाहेबांनी 'बदलत्या काळाला आजच्या मराठी शेतकऱ्यानं कसं सामोरं गेलं पाहिजे', हे अनेक दाखले देऊन पटवून सांगितलं. कारखाना पाहून ते इतके खूश झाले, की त्यांनी एक दिवस लोणीत मुक्काम टाकण्याचा निर्णय जाहीर केला. जय्यत तयारीच्या इरिगेशन बंगल्यावर ते राहिले. कधीकाळी घासलेटच्या चिमण्यांच्या उजेडात खोपटाखोपटांत खुरडंत, रखडत जगणारं विठ्ठलरावांचं लोणी गावठाण रंगीबेरंगी दिव्यांच्या रोशणाईनं आज अंगभर कसं झळाळून उठलं.

या समारंभानंतर आठवडा उलटला. १९५४ च्या एप्रिल महिन्याचा दुसरा हफ्ता आला. आणि एके दिवशी विठ्ठलरावांच्या वस्तीवर सुळे व तांबवेकर दोघे मिळूनच आले. त्यांनी संगती एक लखोटा आणला होता. त्याचा माग देण्यासाठी तांबवेकरांनी तो विठ्ठलरावांना वाचूनच दाखविला. हे आवतन होतं कोल्हापूरलगत

असलेल्या व शिवरायाच्या काळात गाजलेल्या किल्ले पन्हाळ्यावर भरणाऱ्या 'महाराष्ट्र प्रादेशिक सहकारी परिषदेचं.'' विठ्ठलरावांनी या परिषदेला यावं, असं परिषदेच्या कार्यकर्त्यांनी अगत्यानं कळवलं होतं. याही परिषदेचे अध्यक्ष होते यशवंतराव चव्हाणच. विठ्ठलरावांची नि त्यांची तशी पहिली भेट औरंगाबादेच्या शेतकरी मेळाव्यात झालीच होती. पूर्वी कोल्हापूर भागातील माधवराव बागलांशी सत्यशोधक चळवळीमुळं त्यांचा संबंध आलाच होता. जाताना किंवा येताना त्यांना साताऱ्यात भाऊराव आण्णाही भेटण्याचा योग होता, म्हणून विठ्ठलरावांनी ते आवतन स्वीकारलं. 'प्रवरा कारखान्याचा उपाध्यक्ष म्हणून या परिषदेला जरूर येत आहे' अशा मजकुराचं पत्र त्यांनी शंकररावांना तयार करून पुढं पाठवायला सांगितलं.

ही परिषद २५ आणि २६ एप्रिलला पन्हाळ्यावर सजणार होती. म्हणून शंकरराव तांबवेकरांचं 'तांबवे' हे गाव पन्हाळ्याजवळच असल्यामुळं त्यांना व आणखी दोन-चार सोबत्यांना घेऊन, विठ्ठलराव २४ तारखेलाच कोल्हापुरात उतरले. तिथल्या प्रसिद्ध अंबाबाईचं दर्शन घेऊन, आल्याआल्याच राजारामपुरीत जाऊन त्यांनी माधवराव बागलांची भेट घेतली. विठ्ठलरावांची कोल्हापुरात उतरण्याची सोय अमृतरावांचे चिरंजीव व आता विठ्ठलरावांचे सहकारी झालेल्या हंबीरराव मोहित्यांनी नामी केली होती. २५ लाच भल्या पहाटे पहाटे त्यांनी कोल्हापूर सोडलं. पंचगंगेचा पूल ओलांडताना त्यांनी चौफेर नजर टाकली. करवीरच्या कष्टाळू शेतकऱ्यानं भुईचा एक चावरसुद्धा मोकळा सोडला नव्हता. घाम गाळून आणि पंचगंगेचं पाणी वापरून कसा हिरवागार फुलवला होता. ते पन्हाळ्याचा नागमोडी घाट वाघबीळपासून ओलांडू लागले. बाबूराव महाराजांशी चर्चा करताना ऐकलेला शिवरायांचा मुडद्यालाही फुलविणारा इतिहास त्यांच्या मनात घोळू लागला. इथंच तो शक्कलबाज राजा जौहर सिद्दीच्या घेरात कित्येक दिवस अडकून पडला होता. त्याच्या कर्तबगार हयातीचा इतिहास खरं तर इथंच संपायचा. पण या गडावरची रसद संपेपर्यंत त्यानं सिद्दीशी निकराची लढत दिली. या गडावरची रसद संपली, तेव्हा जौहरला हूल देण्यासाठी भाताची शितं लावलेल्या पत्रावळ्यांचे बिंडे तटावरून खाली फेकायला लावले. हेतू हा होता, की शत्रूला वाटावे, गडावर भरपूर धान्य-रसद आहे.

आज त्याच पन्हाळ्यावर एकमेकांना हातजोड देत धनधान्य उठविणाऱ्या किसानांची नव्या काळातील परिषद भरत होती. पन्हाळ्यावर पोहचल्यावर गाडीतून खाली उतरताच विठ्ठलरावांनी त्या पावन भुईला हात लावून तो भक्तिभावानं आपल्या कपाळी भिडवला. पन्हाळगड, ही प्रादेशिक परिषद असल्यानं सांगली, सातारा, कोल्हापूर व सोलापूर भागांतील शेतकरी प्रतिनिधींनी कसा फुलून गेला होता. तबक बागेजवळच्या एका ऐसपैस मैदानाजवळ परिषदेचा एक जंगी शामियाना उठवला होता. या भागातील शेतकरी माणूस कसं आज मुंगेराशीनं पन्हाळ्यावर खचाखच दाटलं होतं. परिषदेची वेळ जवळ आली, तसं मुंबईहून आपल्या कऱ्हाडगावी आलेले यशवंतराव आपले चिटणीस

श्रीपादराव डोंगे यांच्यासह पन्हाळ्यावर आले. परिषदेच्या हौशी कार्यकर्त्यांनी शिंगाड्यांना कातऱ्या ललकाऱ्यांची शिंगं फुंकायला लावून त्यांचं कोल्हापुरी ढंगानं स्वागत केलं. पन्हाळा उत्साहानं फुलारला. आलेले प्रतिनिधी दुहाती रांगेनं उभे होते. विठ्ठलरावांच्याजवळ येताच यशवंतराव खिनभर थांबले. त्यांच्या उजव्या हाताशी त्यांच्याच उमरीची, गोलवट मुखड्याची, तसलाच पोशाख पेहनलेली, पण डोक्यावर टोपी नसलेली एक हसमुख असामी होती.

यशवंतराव विठ्ठलरावांना म्हणाले, ''आपण औरंगाबादेत भेटलो होतो. तुम्ही नगर भागातील सहकारी कारखाना चालवणारे पाटील ना?''

लगेच विठ्ठलराव त्यांना दाद देत अदबीनं म्हणाले, ''जी ... मी लोणीचा... आत्ताच्या प्रवरानगरचा विठ्ठलराव विखे... पाटील.''

तसं 'चला' म्हणत विठ्ठलरावांचा हात धरून यशवंतराव परिषदेच्या बैठकीकडं चालू लागले. बैठकीवर त्यांनी विठ्ठलरावांना आपल्या शेजारीच बसवून घेतलं.

परिषदेच्या कामकाजाला सुरुवात झाली. प्रास्ताविकाचं भाषण चालू असतानाच यशवंतरावांच्या नेहमी उजव्या हाताशी असलेल्या त्या गोलवट मुखड्याच्या असामीनं विठ्ठलरावांकडं बघत त्यांना विचारलं, ''हे पाटील, म्हणजे नेमके कोण?''

तसं आपल्या नेहमीच्या ढंगानं हसत यशवंतराव त्यांना म्हणाले, ''तुम्ही पाटीलच आहात राजकारणातले. गोऱ्या सरकारशी झुंज दिलेले. हेही पाटीलच

आहेत. नगर भागातले. काळ्या मातीशी झुंज देणारे! तुमच्या पद्‌माळ्यासारख्या लोणी या छोट्या गावचे. पण ही असामी फार जिगरी आणि जिद्दीची आहे. त्यांनी आपल्या गावच्या वेशीवर सहकारी साखर कारखाना हर हिकमतीनं उभा केला. लोणीचे विठ्ठलराव विखे पाटील म्हणतात यांना. आणि विठ्ठलराव, हे आमचे मित्र... सांगली जिल्ह्यातल्या पद्‌माळे गावचे... स्वातंत्र्यसैनिक वसंतराव पाटील!''

'राम राम' म्हणत विठ्ठलरावांनी त्या असामीला नगरी रिवाज दिला. त्यांनीही विठ्ठलरावांची आस्थेनं चौकशी केली. ते म्हणाले, ''लोणीकर पाटील, मलाही तुमच्या प्रवरेसारखाच कारखाना माझ्या सांगली भागात उठवायचा आहे. निवांतपणे मी भेटेन तुम्हांला.''

पन्हाळगडावरची दोन दिवसांची परिषद शेतकऱ्यांच्या नाना अडचणींचा उलट-सुलट उपसा करून उलगली. यशवंतराव व वसंतरावांचा निरोप घेऊन, विठ्ठलरावांनी एकदा भरल्या मनानं व डोळ्यानं पुरता पन्हाळगड पायांखाली घातला. शंकरराव तांबवेकर त्यांच्यासंगती होतेच. त्यांनी बाजीप्रभूंसह शिवरायांनी वेढ्यातून पळून जाण्यासाठी गड सोडला, ती राजदिंडी ही जागा दाखविली. जिथं शिवपुत्र शंभूराजे व शिवाजीराजे यांची शेवटची भेट झाली, ती 'सज्जाकोठी' विठ्ठलरावांनी भरल्या मनानं पाहिली. गड सोडण्यापूर्वी तेथील भवानी मंदिरात भवानीमातेचं दर्शन घेतलं. गड सोडून ते कोल्हापूरच्या मार्गी लागले.

विठ्ठलराव लोणीत परतले. ज्याची सर्वांनी धास्त बाळगली होती, तीच लक्षणं दिसू लागली. कडक उन्हाळ्याच्या तडाख्यानं कालव्याचं पाणी गेल्या वर्षीच्या पातळीच्या खाली गेलं. पंधरवडा गेला आणि हाता-तोंडाशी आलेली ऊस-शिवारं बाळून जाणार काय? असा सवाल विठ्ठलरावांसमोर खडा ठाकला. याला एकच तोड होती : भंडारदरा धरणात साठवणीला असलेलं पाणी ऊसशिवाराकडं वळवलं, तरच तड लागणार होती. ते पाणी देणं, न देणं सरकारच्याच अखत्यारीतलं होतं.

विठ्ठलरावांसमोर आता एकच उपाय होता. ठरल्याप्रमाणं आगगाडीत बसणं, मुंबई गाठणं, वैकुंठभाईंना साकडं घालणं आणि सरकार-दरबार हालविणं.

विठ्ठलराव त्याच विचारात असताना नगरी दैनिकात, देवदूतानं धाडावी

तशी बातमी झळकली. कसली? 'मुंबई राज्याचे पाटबंधारे व पाणीपुरवठा मंत्री ना. दौलतराव ऊर्फ बाळासाहेब देसाई यांचा नगर जिल्ह्याचा पाहणीदौरा!'' बाबूराव महाराजांच्याकडून विठ्ठलरावांनी ती बातमी पुन्हा बयाजवार वाचून घेतली. या दौऱ्यात योगायोगानं ना. बाळासाहेब लोणीजवळच्याच बाभळेश्वरावरून जाणार होते. ती तारीख विठ्ठलरावांनी डायरीत टिपून घेतली. इळभरातच मनाशी काही एक बेत आखला - आता संगती शे-शंभर निवडीचे किसान - साथी घेऊन ठरल्या दिवशी मोर्चा बांधायचा! कुठं? तर बाभळेश्वराच्या रस्त्यावर - ऐन तळपत्या उन्हात!

विठ्ठलरावांनी तांबवेकर, इंगळे, यांना अशा निवडीच्या शेतकऱ्यांची यादी करायला सांगितली. यादीतील प्रत्येकाच्या घरकुटाकडं निरोप धाडून ठरल्या दिवशी भल्या पहाटे कारखान्याच्या आवारात हजर राहायला बजावलं. प्रत्येकाला मोर्च्याचा तपशील सांगितला.

आणि तो दिवस उजाडला. विठ्ठलराव शंकरराव तांबवेकर व धुमाळ यांच्या जोडीनं लोणीच्या जवळच्याच चार-पाच गावांतील शंभर एक शेतकऱ्यांना बरोबर घेऊन सारे जण पायीच बाभळेश्वरच्या वाटेला लागले. तिथं पोहोचताच दिवस चढतीला आल्यानं उन्हाच्या माऱ्यानं हैराण झालेले विठ्ठलरावांचे साथी वडा-पिंपरीच्या सावलीखाली जागजागी बसले. मंत्रिमहोदय यायला अद्याप घंटाभर अवधी होता. तोवर कुणी कुणी आणलेल्या दशम्यांची न्याहरी आटोपून घेतली. सारे तवाने झाले.

थोड्या वेळानं मंत्री ना. बाळासाहेब देसाई येत आहेत. याचा माग देणाऱ्या पोलिसांच्या गाड्या दूरवरून भोंगा फुंकत येताना दिसल्या.

सर्व लोणीकरांनी बाभळेश्वरच्या रस्त्यावर शिस्तवार फळी धरून रस्ता रोखून टाकला. पोलिसी गाड्या माणसांचा घोळका बघून चार-पाच हातांवरच रुकल्या. तशी मागून येणारी, टपावर लाल दिवा असलेली मंत्र्यांची पांढरी गाडीही रुकली. त्यामागून येणाऱ्या पाणी-पुरवठा खात्याच्या अधिकाऱ्यांच्या व पिछाडीला असलेल्या रक्षक पोलिसगाड्याही आचका देत थांबल्या. विठ्ठलराव त्यांच्या मोजक्या सोबत्यांनिशी थेट ना. बाळासाहेब देसाईंच्या गाडीला भिडले. विठ्ठलरावांना आतूनच ओळखून ते गाडीबाहेर आले. वर उन्हाळी हंगामातील

नगरी सूर्व्या कसा आग ओकत तळपत होता. त्याला साक्षी ठेवून दोघांचे चटकेदार सवाल-जबाब झडू लागले.

विठ्ठलराव पोटतिडकीनं म्हणाले, ''धरणात मायंदाळ पाणी असून आम्हां शेतकऱ्यांच्या उन्हाळ्यात वाळून चाललेल्या ऊसपिकाला ते मिळत नाही, म्हणजे अन्यायच न्हाई, श्यायेब? पाण्याबिगार आमचा ऊस कोळपणार आणि माझ्या ह्या आणि अशा कैक किसानांचे लाखो रुपडे गाळात जाणार. या वक्ताला तुमी काहीच का करणार न्हाई आमच्यासाठी? हातात कासरे असून ही सरकार - दरबारची गाडी आम्हां गोरगरिबांच्या खोपटाकडं वळती न्हाई का करणार तुम्ही? शिवाजीराजांच्या सातारा जिल्ह्यातले हाईसा तुमी. तुमी, व्हय, का न्हाई, याचा निवाडा दिल्याबिगर आम्ही इथनं हटणार न्हाई!''

बाळासाहेब गंभीर झाले. विठ्ठलरावांना शांत करत म्हणाले, ''पाटील, शांत व्हा. पाण्याचा केवढा साठपा आहे, त्याचं वाटप काय आहे, याचा याच जागी फैसला होईल.''

त्यांनी विठ्ठलरावांच्या खांद्यावर हात ठेवून तो दोनदा थोपटला. पाठीशी उभ्या असलेल्या भंडारदऱ्याच्या इंजिनियर बाळेकुद्रीकडं बघत त्यांनी त्यांना विचारलं, ''हे विठ्ठलराव पाटील म्हणतात, त्याप्रमाणं धरणात पुरेसा साठा आहे का?''

बाळेकुंद्री म्हणाले, ''होय, साहेब.''

''मग या शेतकऱ्यांच्या वाळत चाललेल्या पिकांना पाणी देण्यात कसली अडचण आहे तुमची?''

कायदे जनलोकांसाठी असतात. जनलोक कायद्यासाठी नसतात, हे मानणारा तो निडर व तत्पर कार्य करणारा लोकनेता होता. त्यांनी अचूक वर्मावर बोट ठेवलं.

भेदरलेले अधिकारी पडेल सुरात म्हणाले, ''साहेब, ते करारानं बांधून दिलेलं पाणी आहे. कमिटेड वॉटर आहे. कराराप्रमाणं सरकारला ते आगाऊ पाणीपट्टी भरणा केलेल्यांना पुढं ते पुरविलं पाहिजे. नाहीतर ते संबंधित लोक पुढं सरकारविरुद्ध कोर्टात जातील.''

ते ऐकताच बाळासाहेबांचा मुखडा रसरसून आला. कपाळपट्टीवर घामाचे थेंब तरारले. कोल्हापूरच्या राजर्षी शाहूंच्या विचार-तालमीत तयार झालेला तो पाटणचा पठ्ठ्या शांतपणे व सडेतोड कडाडला. ''कुणीच न बघितलेलं आणि उद्या येणारं पीक तगविण्यासाठी आजचं हे समोर दिसणारं पीक देखता - डोळा कोळपू द्यायचं, वाया घालवायचं? अहो, मग गांधीजींनी, नेहरूंनी कमावलेल्या या स्वातंत्र्यापेक्षा मोगलाई काय वाईट होती? हे असं म्हणणार नाही काय देशातली जन-रयत? ते काही नाही. आजच्या आज धरणाचे दरवाजे खुलते करा. कालव्याचं पाणी राबतं करा. ते वाळून-कोळपून चाललेल्या शिवारांकडं वळवा. मी देईन, द्यायचा तो जाब, वेळ पडेल तेव्हा या पाण्याच्या करारदारांना.''

ते किसान बच्च्यालाच शोभावेत असे बेधडक बोल ऐकताना विठ्ठलरावांचा कुणबाऊ हुर्दा हरखून, भरून आला. विठ्ठलरावांनी काहीच न बोलता ना. देसाईंचे दोन्ही हात मायेनं व अभिमानानं हातात कवळून घेतले व म्हणाले, ''लई म्हेरबानगी झाली, श्यायेब.''

तसं विठ्ठलरावांच्या खांद्यावरचं उपरणं थोपटत त्यांनी विठ्ठलरावांना स्वतः गाडीचं दार खोलून आपल्या गाडीत घेतलं. शेतकऱ्यांच्या कारखान्याची त्यांनी, आतड्याच्या मायेनं करावी, तशी बारीकसारीक चौकशी केली. तशी करताना ते सहज म्हणाले, ''तुम्ही शिकलेले नसलात, तरी व्यवहारी पंडित आहात.''

विठ्ठलरावांच्या कारखान्यासमोर आता वेगळाच प्रश्न आला. त्यांच्या ५०० टन उसाचं गळीत करणाऱ्या फॅक्टरीची ताकद आता त्यांना अपुरी वाटू लागली. ती वाढवणंच भाग होतं. ताकद नसलेल्या शेतकऱ्यांना ऊस उठविण्यासाठी उपलब्ध करून दिलेलं पाणी, जादा उत्पादन काढणाऱ्यांना जोडून दिलेली सवलतीसह बक्षीस-योजना, कारखान्याच्या सुरळीत चाललेल्या कारभारामुळं सभासदांची पालटत चाललेली आर्थिक स्थिती यामुळं आता सभासद नसलेल्या शेतकऱ्यांतही कारखान्याचे भाग घेण्याची चुरस लागली.

५०० टन उसाचं गळीत करणारी यंत्रणा त्यांची गरज व भूक आता भागवूच शकणार नव्हती. दोन सालांतच आताच्या तिप्पट गळिताची ताकद असलेल्या फॅक्टरीची गरज तीव्रतेनं भासू लागली. पैशाच्या बाबीनं अशी दाबजोर फॅक्टरी खरेदी करण्याची आता कारखान्याची ऐपतही तयार झाली होती. गेली दोन वर्ष

सर्वांच्या खाजगी चर्चेत हा विषय कैकवार येऊनही गेला होता. या तातडीच्या व नडीच्या बाबीचा कंडका पाडण्यासाठी ताबडतोब संचालक मंडळाची बैठक घेणं भाग होतं. तशी सूचना विठ्ठलरावांनी सुळे व तांबवेकर यांना दिली.

पंधरा ऑगस्टचा तिरंगा कारखान्याच्या धुरांड्याशी होड घेऊन फडफडला. आठ दिवसांतच २२ ऑगस्ट रोजी गाडगीळसाहेबांच्या अध्यक्षतेखाली संचालक मंडळाची कारखान्याच्या वाटचालीतील ही मोक्याचं वळण देणारी बैठक बसली. तिची सुरुवात करताना बैठकीचे व कारखान्याचे अध्यक्ष असलेल्या दूरधोरणाच्या गाडगीळ साहेबांनी सांगितलं,

"तुम्ही सर्वांनी दिवस-रात्र एक करून, घाम गाळून उठवलेला हा कारखाना आता एका टप्प्यावर येऊन ठेपला आहे. कारखान्याची याहून गळिताची क्षमता असलेली मशिनरी आता केवळ अटळ आहे. ती खरेदी करावीच लागणार. कारखान्याची आर्थिक ऐपतही तेवढी निर्माण झाली आहे. माझी एकच सूचना आहे - घ्यायची ती मशिनरी चांगल्या देशातील चांगल्या कंपनीची व दीर्घकाळ काम देणारी अशीच असावी नि ती आत्ताच खरेदी करावी. या कामात पारंगत असलेले आपले इंजिनियर श्री. निर्मलचंद्र डे यावर आपला योग्य निवाडा देतील. तो सर्वांनी शांतपणे ऐकून, द्यायचा तो निर्णय एकमुखी द्यावा."

ते ऐकून कमालीच्या शांत स्वभावाचे असलेले पण कामात तसूभरसुद्धा कसर व चुकारतट्टूपणा न मानवणारे डेसाहेब उठले. आपल्या घरातीलच एखादं लग्नकार्य पार पाडताना घ्यावी, तशी हरएक बाबींची दक्षता घेत ते बोलले. म्हणाले,

"मी अध्यक्षांच्या सूचनेशी पूर्णतः सहमत आहे. आपल्याला हवी तशी मशिनरी सध्यातरी एकाच देशात उपलब्ध आहे - जर्मनीत. ती बाराशे टनांच्या उसाचं गळीत कसलीही तक्रार न निर्माण करता सुरळीत व नमुनेदारपणे करू शकेल. एवढंच काय, पण गरज पडल्यास तिच्यात थोडाफार फेरफार केल्यास ती पंधराशे टनापर्यंतचाही वाढीव गळिताचा प्रतिसाद देऊ शकेल. अर्थातच जगभर यंत्रसामग्रीसाठी प्रख्यात असलेल्या जर्मनीची ही मशिनरी असल्यामुळं तिला थोडी जादा किंमत द्यावी लागेल, हेही खरंच. मला व्यक्तिशः वाटतं, की ही जर्मनीची मशिनरीच आपण पुढच्या काळाचं भान ठेवून खरेदी करावी. द्यायचा तो निर्णय

शेवटी सर्व सभासदांनीच घ्यायचा आहे.''

''काय नाव त्या नामी फॅक्टरीचं, डे साहेब?'' विठ्ठलरावांनी मुद्द्याचा प्रश्न केला.

''तिचं नाव आहे, पाटीलसाहेब - बकाव वुल्फ ग्रेव्हेन ब्रोईश! आणि तिची किंमत आहे शहाऐंशी लाख पंचेचाळीस हजार रुपये!''

ती किंमत ऐकताना मंडळाचे सर्वच सभासद विचारात पडले. बैठकीत खिनभर सन्नाटा दाटला. एकदम एकरकमी एवढी रक्कम खर्ची घालावी काय, याच विचारात सारे पडलेत, हे विठ्ठलरावांनी ताडलं. त्यांच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणं ती दाटली कोंडी फोडून टाकत ते म्हणाले,

''मंडळी, जमाना पालटलाय्. आखूड शिंगाची, कमती चारा खाणारी, अधिकाचं दूध देणारी, मारकुटी नसलेली गाय जनावरांच्या बाजारात मिळायचे दिवस सरले! कारखान्यासाठी आखायचा तो आराखडा साऱ्यांनी भान ठेवून आखायचा आहे. आमचे डेसाहेब म्हणत्यात, तीच 'बकाव'का काय, ती हीच फॅक्टरी माझ्या सभासद-शेतकऱ्यांच्या उसाला न्याय देईल. ती म्हणजे तीच खरेदी करायची आपण. बोला मंडळी, तुमचा काय इरादा?''

विठ्ठलरावांच्या 'सा' ला गाडगीळसाहेबांनी आपला 'रे' जोडला आणि फॅक्टरी खरेदीची सरगम पुरी करत ते म्हणाले, ''अचूक आणि बरोबर बोललेत विठ्ठलराव! हा जगन्नाथाचा रथ आपण इथवर चिकाटीनं खेचून आणला आहे. तो तसाच पुढं नेला पाहिजे - ही 'रसयात्रा' आपण पार पाडलीच पाहिजे.''

त्यांच्या बोलण्यानं बैठकीत हुरूप संचारला. प्रवरा सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळानं एकमुखी निर्णय घेतला. तो घेताना शंकरराव धुमाळ, लामखडे मास्तर, जगन्नाथ थेटे, चंद्रभान घोगरे, सुळेसाहेब, वर्देसाहेब, काकडेसाहेब आन् दगडू कडसकर या बैठकीतल्या साऱ्या संचालकांचे मुखडे उदंड हुरूपानं व कृतार्थतेनं कसे उजळून उठले.

बुद्रुक लोणीचं आता प्रवरानगर झालंच होतं त्या प्रवरानगरचं आता उमाप साखर पिकविणारं 'शर्करानगर' होणार होतं.

१९५६ साली भारत सरकारच्या सहकारी खात्याकडून एक महत्त्वाचा

लखोटा प्रवरानगरात येऊन थडकला. त्या लखोट्यानं कारखान्यातील लहानथोर कर्मचाऱ्यांना व चाळीस एक गावांतील भागधारक शेतकऱ्यांना खडबडून जागंच केलं. खलिता होता अध्यक्ष गाडगीळसाहेबांच्या नावाचा आणि तोही प्रत्यक्ष भारत सरकारचा.

भारत सरकार अखिल भारतीय सहकारी साखर कारखान्यांची पहिली परिषद लोणीत-प्रवरानगरात भरविणार होतं. हे म्हणजे राजाच्या अंबारीचा हत्ती पहारेकऱ्याच्या घरकुलात शिरण्यासारखंच होतं. विठ्ठलरावांची सारी ताकद पणाला लावणारं होतं. खलिता होता देशाचे शेतकीमंत्री रफी अहमद किडवाई यांचा. त्यांच्या सूचनेवरून परिषदेची व्यवस्था बघण्यासाठी मुंबईहून सहकारी खात्याचे खास अधिकारी पी. डी. कसबेकरसाहेब पहिल्यानं लोणीत उतरणार होते. विठ्ठलराव, मोहिते व डे साहेब या साऱ्यांशी खाण्या-जेवण्यापासून ते उतरण्यापर्यंतच्या व्यवस्थेची चर्चा करणार होते. या परिषदेसाठी चहूबाजूच्या प्रांतांतून प्रतिनिधी येणार होते, ते असे देशभरच्या सहकारी कारखान्यांचे ३९, आंध्र प्रांताचे १०, सहकारी खात्याचे ६, भारत सरकारचे, मुंबई, गुजरात, संयुक्त प्रांताचे प्रत्येकी ५, मुंबईच्या रिझर्व बँकेचे, मद्रास प्रांताचे व आसामचे प्रत्येकी ४, बिहार, ओरिसाचे प्रत्येकी ३, कानपूरच्या साखर संस्थेचे, मुंबई प्रांताचे, मुंबई प्रांत सहकारी बँकेचे, सौराष्ट्राचे आणि पंजाबचे प्रत्येकी २ आणि औद्योगिक वित्त विकास महामंडळाचा १ असे एकूण ९४ प्रतिनिधी व निरनिराळ्या वृत्तपत्रांचे वार्ताहर, येणाऱ्या प्रतिनिधींचे चिटणीस, लघुलेखक, टंकलेखक व लेखनिक असा मोठाच तांडा येणार होता. ही तर तालेवारांची देशभर गाजत येणारी सहकार-दिंडीच होती. मोठ्या इभ्रतीचा होता हा मामला!

ठरल्याप्रमाणं व्यवस्था बघणारे कसबेकरसाहेब मुंबईहून आले. परिषद भरणार होती ऐन उन्हाळ्यात. तारखा होत्या १४, १५, १६ एप्रिल अशा. तसा नगरी भाग दुष्काळीच. सर्वांसमोर मुख्य सवाल खडा होता, तो पाण्याचा.

आल्या आल्या कसबेकरसाहेबांनी नगरचे कलेक्टर एस. डब्ल्यू. देसाई, एक्झि. इंजिनीयर श्री. एस्. जी. बाळेकुंद्री, गाडगीळसाहेब, विठ्ठलराव व कारखान्याचे जबाबदार ज्येष्ठ अधिकारी यांची एक बैठक घेतली. बैठकीत पाण्याचा प्रश्न निघाला, तसा येणाऱ्या पाहुण्यांच्या उठण्या-बसण्याच्या, उतरण्याच्या

जागेचाही प्रश्न चर्चेला आला. प्रवरानगरात तर अशा तालेवारांनी उतरावं, अशी एकच जागा होती, ती म्हणजे इरिगेशन बंगला. मग कुणी काय, कुणी काय, असं या बाबीनं सुचवू लागलं. शाळा, विद्यालयं, पतपेढ्यांची हापिसं वापरात आणावी, असं कुणीतरी सुचवलं. ही बैठक कलेक्टर देसाईसाहेबांच्या देखरेखीखाली भरली होती. बैठक उतरण्याच्या जागेच्या प्रश्नावरून कुंचबलेली बघताच विठ्ठलराव अंगच्या सवयीनं हात उठवून म्हणाले, "यावर मी एक तोड सुचवू का?"

कलेक्टर देसाईसाहेब मोठ्या खिलाडू वृत्तीचे होते. ते हसत म्हणाले, "अडलेलं घोडं तिढ्यातून बाहेर काढण्यात तर तुमची ख्याती आहे, पाटीलबुवा. तुम्ही सुचवाल, ते बिनतोडच असेल. सांगा बघू, काय उकल काढली, ती!"

विठ्ठलरावांनी खाकरत तोड सांगितली, "मी ही नुसती सहकाराची दिंडी मानत न्हाई. ही अवघ्या देशभरच्या म्होरक्यांनी काढलेली मोहीमच मानतो. जसा शिवाजीराजाच्या काळात पडत हुता, तसा या तालेवारीचा आमच्या गावठाणात भुताच्या माळावर एक जंगी तळ टाकावा आता. त्यासाठी साऱ्यांची लष्कराच्या भल्यामोठ्या डेऱ्यांतूनच सोय करावी. त्यामुळं कामाचा उठावणी पटशिरी हुईल, कारण सम्दे एका जागेलाच पायजे तवा मिळतील. यासाठी लागणारे लष्कराचे डेरे नगरच्या लष्करी तळावरून मागवून घ्यावेत. सरकारला ते सहजी साध्य आहे. या तळासाठी लागणारी मुबलक जागा माझ्या कारखान्याच्या आवारात हाताशीच आहे."

विठ्ठलरावांची ही तोड ऐकून जाणकार देसाईसाहेब 'नाईस का फाईस!' असं काहीतरी म्हणाले. त्यांनी ही तोड उचलून धरली.

बाळासाहेब देसाईंपासून भंडारदऱ्याच्या इंजिनीयर बाळेकुंद्रीची नि विठ्ठलरावांची घसट वाढलीच होती. त्यांच्याकडं बघत विठ्ठलराव म्हणाले, "या अवघ्या देशाच्या सहकारी तळाला पाणी पाजण्याची जोखीम हे बाळेकुंद्रीसाहेब का उचलणार नाहीत? एवढं मोठं भंडारदरा त्यांच्या अंगठ्याखाली तर हाय!"

त्यांनीही "जरूर. ही व्यवस्था मी आणि माझे लोक काटेकोरीनं करतील." असं म्हणत हुरूपानं संमती दिली.

एप्रिलचा पहिला हप्ता उजाडला आणि लोणी गावच्या वेशीत देशाच्या चहुभागांतून प्रतिनिधींना घेऊन एक एक करत गाड्या धडकू लागल्या. कारखान्याच्या नव्या थाटातील इमारतीशेजारीच लष्करी डेरे, राहुट्यांचा ऐसपैस तळही उभा झाला. बारा-तेरा तारखेपर्यंत प्रवरानगर गजबजून गेलं.

लोणीच्या या पहिल्या-वहिल्या सहकारी साखर कारखान्यात उभ्या देशाची पहिली-वहिली सहकारी परिषद तोंडावर आली. हा एक इतिहासच होता. विठ्ठलराव, त्यांचे संचालक, मैतर, कारखान्याचे अधिकारी, लहानथोर नोकर-चाकर, पाहुण्यांच्या आवभगतीत टवकाभरसुद्धा कमी पडणार नाही, याची दक्षता घेत होते. पंधरा दिवस कारखान्याच्या फाटकावरील दरवानापासून तो थेट मोहिते, डे साहेबांच्यापर्यंत कुणाच्याही पायाला थारा म्हणून नव्हता.

चौदा तारखेचा परिषदेचा दिवस फटफटला. उभा केलेला शामियाना सहकारातल्या जाणत्या; अनुभवी आणि चौकस असामींनी खचाखच भरून गेला. या परिषदेचं अध्यक्षपद भूषविणार होते, ते गाडगीळसाहेबच. त्यांचा तो रास्त मानच होता. जमलेल्या प्रतिनिधींचं प्रथम, सुळेसाहेबांच्या नंतर आलेले उमदे व ऐटदार कार्यकारी संचालक कॅ. हंबीरराव मोहिते यांनी भावभऱ्या बोलीत मनापासून स्वागत केलं.

परिषदेचं उद्घाटन करून केलेल्या भाषणात अध्यक्ष गाडगीळसाहेबांनी मुंबई प्रांतातील खेडोपाडी पसरलेल्या सहकारी चळवळीचा अधिकते साखर कारखान्याच्या चळवळीचा आढावा घेतला. येणाऱ्या अडचणी व त्यांवर मराठी मुलुखातल्या कष्टकरी व जिद्दीच्या शेतकऱ्यांनी शोधून काढलेले उपाय यांचं खुमासदार वर्णन त्यांनी केलं.

देशातल्या सरकारी व निमसरकारी संस्थांनी यापुढं कुठली पाऊलवाट धरली पाहिजे, याचं डोळस व बारीकसारीक मुद्दे खोलून सांगणारं नामी भाषण केलं. कुठून कुठून आलेले प्रतिनिधी त्यांनी नागागत नुसते डोलवत ठेवले.

दुसऱ्या व तिसऱ्या दिवशी हरएक प्रांतातील प्रतिनिधींनी फारच खोलीवरचे व लोणीकरांना कधी ऐकायलाही न मिळालेले विचार मांडून दाखविले. दक्षिणेच्या आंध्र, मद्राससारख्या प्रांतातून आलेल्या लोकांना नीटसं हिंदी बोलता येत नव्हतं, पण त्यांनी मांडलेले मुद्दे लोकांना नेमके समजून येत होते.

या परिषदेत भांडवलाची उभारणी कशी करावी, कारखान्याकरता लागणारा सिमेंट, कोळसा, लोखंड, वाहतुकीची साधनं असा मला कसा खरेदी करावा, कारखान्याच्या वेगवेगळ्या विभागांवर काम करणारा कुशल कामगार कसा मिळवावा, त्यांच्याकडून कामाचा उठाव घेताना येणाऱ्या त्यांच्या म्हणून अडचणी कशा निवाराव्या, तंत्रविशारदांच्या नेमणुका त्यांच्याकडचं हुकुमी ज्ञान पारखून कशा कराव्या, ऊस पिकविणारे सभासद, कारखान्यात काम करणारे कामगार यांनी एकमेकांशी कुठल्या जबाबदारीच्या जाणिवेनं वागावं, अशा एक म्हणता शंभर विषयांचा पिंजून पिंजून कसा कीस पडला. आज आवश्यक ते निश्चित ठराव करून ते पसार करण्यात आले.

पंढरीची आषाढी किंवा कार्तिकी यात्रा भरावी, तसंच गेले तीन दिवस लोणीतल्या लहानथोरांना फार फार जाणवून गेलं. लोणी गावच्या घरात कुठून कुठून आलेल्या या पाहुण्यांचे आभार मानण्याचं काम विठ्ठलरावांवर सोपविण्यात आलं होतं.

विठ्ठलराव त्यासाठी उभे राहिले. यातील एक एक जबरी आसामी पुन्हा कधी लोणीत येणार की नाही? पुन्हा कधी दिसतील की नाही असे विठ्ठलरावांना क्षणभर वाटले. मनानं व वागण्यानं रांगडे-थोडेसे कडवे - कधीकधी दगडासारखं कठोर असणारे विठ्ठलराव आज मात्र शामियान्यात जमलेल्यांचे आभार मानून निरोप घेताना घुसमटले. त्यांच्या हातांचे तळवेसुद्धा घामेजून आले.

जमल्या सगळ्यांना दोन्ही हात जोडून पहिल्यानं रामरामाचा नगरी रिवाज दिला. व भरल्या, घोगरल्या बोलीत विठ्ठलराव म्हणाले, ‘‘माझ्या तिळाएवढ्या या पिटक्या गावात कळसूबाईच्या डोंगरागत असलेले आपण सारे मायेनं आलात. आम्ही आमच्या कुवतीनं दिलेली चटणी-भाकर कुरकुर न करता आपण गोड मानली. जगदंबेवर ठेवावा, तसा भक्तिभाव या सहकाराच्या माऊलीवर मी हयातभर नेकीनं ठेवला. त्या माऊलीला साक्षी ठेवून आपण साऱ्यांनी लाख लाख मोलाचे विचार इथं मोकळ्या मनानं व घरच्यासारखे मांडलेत. गेल्या तीन दिवसांत मी भरून पावलो आहे. या गावात असाही एखादा दिवस उमटेल, हे ना मला, ना माझ्या सोबत्यांना कधी वाटलं. आता आपण माझा हा लोणी ऊर्फ प्रवरानगर हा मराठमोळा गाव सोडून आपआपल्या गावी जाणार. मनाच्या देठापासून या

गावाच्या वतीनं व कारखान्याच्या क्षेत्रातील चाळीस एक गावांतील कास्तकऱ्यांच्या वतीनं आपले आभार मानताना माझं मन भरून आलं आहे. या क्षणी एवढंच सांगावंसं वाटतं - आमच्याकडून काही चुकलं - माकलं असेल - कमी पडलं असेल, तर त्यासाठी मोठ्या काळजानं मला आणि माझ्या माणसांना माफ करावं - काळ्या आईशी नातं सांगणाऱ्या साखरेची पांढरी पताका खांद्यावर घेऊन जिंदगीभर सहकार पंढरी गाठण्यासाठी वणवण केलेल्या लोणीच्या या विठ्ठल पाटलाला आपण कधी विसरू नये. मागणं लई न्हाई, लई न्हाई! राम राम!!''

विठ्ठलरावांनी पुन्हा हात जोडले आणि ते खाली बसले. परिषद उलगली.

कर्मवीर भाऊराव पाटलांना दिलेल्या वचनाप्रमाणे विठ्ठलरावांनी नगर जिल्ह्यात रीतसर रयत शिक्षण संस्थेचं रोपटं लावून ते वाढविलं. संस्थेनेही त्यांच्या या कार्याची नोंद घेतली. (स्व.) यशवंतराव चव्हाण रयतचे अध्यक्ष असताना विठ्ठलराव काही काळ उपाध्यक्ष होते.

१९५७ च्या मार्चमध्ये महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावर एक क्रांतिकारक उलथापालथ झाली. द्विभाषिकाचा प्रश्न समोर ठेवून सं. म. समिती व काँग्रेस यांच्यात गाजलेल्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांची 'लढत' झाली. आ. अत्रे यांनी संपूर्ण महाराष्ट्राचा झंझावती व धावता दौरा केला. या निवडणुकीत साथी एस. एम. जोशी, प्रबोधनकार ठाकरे, नाना पाटील, ना. ग. गोरे, सेनापती बापट, कॉ. एस. ए. डांगे आदी पट्टीच्या वक्त्यांनी व नेत्यांनी उभा महाराष्ट्र सं. म. च्या वातावरणानं पेटवून उठविला. त्यांना दाजीबा देसाई, उद्धवराव पाटील, अहल्या रांगणेकर आदी सहकाऱ्यांनी न थकता जोड-साथ दिली. परिणामी या ऐतिहासिक निवडणुकीतही महाराष्ट्रभर काँग्रेसची दाणादाण झाली. समितीचे उमेदवार ठिकठिकाणी प्रचंड बहुमताने निवडून आले.

आपल्या नगरच्या मतदार-संघात विठ्ठलरावांनी आपल्यासाठी एक लक्षणीय निर्णय यावेळी घेतला. त्यांनी, आजवर सहकाराच्या कामात साथ करणाऱ्या काँग्रेसच्या कानवडे पाटलांना विरोध करून समितीच्या बी. सी. कांबळे व खाडिलकर यांना पाठिंबा दिला. त्यासाठी प्रचार-दौऱ्यात भाग घेऊन अनेक ठिकाणी, अनेक सभांतून भाषणे केली. आपल्या असंख्य कार्यकर्त्यांना संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनासाठी कामाला लावले. श्री. कांबळे व श्री. खाडिलकर

प्रचंड मतांनी निवडूनही आले.

या निवडणुकीत बारामती मतदार संघातून पूर्वीच्या कामामुळे काँग्रेसतर्फे केशवराव जेधे निवडून आले.

१९५९ साल विठ्ठलरावांच्या जीवनात कमालीच्या उलट सुलट घटना घडविणारं 'उलथापालथीचं साल' ठरलं. महाराष्ट्राच्या राजकीय क्षितिजावरही या वर्षी अनेक उलथापालथी घडल्या. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ, सीमा-भाग आंदोलन, महा-गुजरात, त्रिराज्य या राजकीय घुसळणीतून महाराष्ट्र व गुजरात द्विभाषिकाच्या राज्य-कल्पनेकडं वाटचाल करू लागले. मुंबई केंद्रशासित करण्याच्या भारत सरकारच्या विचारामुळे महाराष्ट्र व गुजरात ढवळून निघाले.

राजकीय आघाडीवर ही लक्षणीय परिवर्तने होत असतानाच महाराष्ट्राचा सहकार वर्धिष्णु होतच होता. याच वर्षी वारणानगर स. सा. कारखाना, वारणानगर, जि. कोल्हापूर व गंगापूर सहकारी साखर कारखाना, रघुनाथपूर, जि. औरंगाबाद हे सहकारी साखर कारखाने नव्याने सुरू झाले.

जसे विठ्ठलरावांच्या घरी त्यांचे दुसरे चिरंजीव भाऊसाहेब यांचे शुभकार्य झाले, तसेच थोरले चिरंजीव बाळासाहेब यांना दि. १६-५-१९५९ रोजी दुसरा मुलगा झाला. त्याचे नाव राधाकृष्ण असे ठेवण्यात आले.

याच वर्षी दि. १२ नोव्हेंबर, १९५९ रोजी विठ्ठलरावांना एका जिद्दीच्या व सच्चा आदर्शाला मुकावे लागले. कर्मवीरांच्या निधनानंतर त्यांना बसलेला तो दुसरा असा वर्मी तडाखा होता. या दिवशी पुणे मुक्कामी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सदैव जिवाचा आटापिटा करणारे, विठ्ठलरावांनी गुरूवत मानलेले श्री. केशवराव जेधे यांचे विठ्ठलरावांना घायाळ करणारे दुःखद निधन झाले.

१९६१ सालचा आठ ऑगस्टचा दिवस उजाडला. विठ्ठलरावांची आज, त्यांच्या जन्मगावात - लोणीत एकसष्टी साजरी होणार होती. त्यासाठी त्यांच्यावर प्रेम करणारे, एकजात झाडून सारे कामाला लागले होते. गेले आठवडाभर ते खपत होते. खुर्द आणि बुद्रुक अशी दोन्ही लोणी गावं, त्यांनी आंबवतीच्या कमानी जागजागी उभारून सजविली होती. ठिकठिकाणी झालेल्या, पताका फिरविल्या होत्या.

या कार्यक्रमासाठी खास सवड काढून वैकुंठभाई मेहता मुंबईहून लोणीत आले. त्यांचं तोलदार स्वागत करण्यात आलं. विठ्ठलराव नको नको म्हणत असतानाही त्यांची गावकऱ्यांनी ६१ झूलबाज बैलांच्या सजविलेल्या रथातून गावभर ढोल-लेझमांच्या गजरात मिरवणूक काढली.

समारंभासाठी मुद्दाम आलेल्या वैकुंठभाईंनी एकसष्टीच्या समारंभाची शाल शेकडो-हजारो शेतकरी बाया-पुरुषांच्या साक्षीनं विठ्ठलरावांना पांघरली. हाती श्रीफळ दिलं.

ते बघताना गावबांधवांनी टाळ्यांचा कसा गारा-पाऊसच पाडला. विठ्ठलरावांनी अत्यंत नम्रपणानं वैकुंठभाईंना सगळ्यांच्या समोर वाकून नमस्कार केला. त्यांनी क्षणात त्यांना वर उठवून छातीशी बिलगतं केले. शंकरराव तांबवेकरांनी एका चांदीच्या करंडकातून काढलेलं एक मानपत्र त्यांच्या हातात दिलं. त्यांनी ते सर्वांना संथ बोलीत वाचून दाखविलं. पुन्हा ते करंडकात घालून तो विठ्ठलरावांच्या हातात देताना ते पुटपुटले, ‘‘शाबास आहे, विठ्ठलराव तुमची!’’

त्यांचं अध्यक्षीय भाषण सुरू झालं. जमलेल्यांनी आपले कान टवकारले. विठ्ठलराव तर त्यांच्याकडं एकटक बघतच राहले. ते म्हणाले, ‘‘विठ्ठलरावांचा सहकार महर्षी, उद्योगी महापुरुष, आदरणीय देशभक्त असा तुम्ही सर्वांनी या मानपत्रात उल्लेख केला आहे. माझ्या मते त्यांच्याबाबत एकच विशेषण राहून गेले आहे - ‘अहिंसक क्रांतिकारक’ हे!’’

१९५७ साली उभा महाराष्ट्र ढवळून काढणारी संयुक्त महाराष्ट्राची चळवळ गाजली. ती संपत आली असताना दि. २६ जानेवारी १९६० रोजी भारत सरकारने विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील या अर्धशिक्षित नगरी शेतकऱ्याच्या कार्याची उचित नोंद घेतली. भारताचे पहिले राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते देशाच्या राजधानीत - दिल्लीत - संसद भवनात विठ्ठलरावांना समारंभपूर्वक ‘पद्मश्री’ प्रदान करण्यात आली.

विठ्ठलरावांचा दुर्मिळ व कमालीचा जिद्दी स्वभाव दिसतो तो त्यांनी उभारलेल्या ‘प्रवरानगर सहकारी साखर कारखान्या’चं रीतसर उद्घाटन करण्यात. मालोजीराव निंबाळकर यांच्या हस्ते १९५० ला कोनशिला समारंभ झालेल्या पहिल्या सहकारी साखर कारखान्याचं उद्घाटन त्यांनी बखळ १० वर्ष थांबविलं

होतं. कशासाठी? तर देशातील आपल्या पहिल्याच शेतकऱ्यांच्या साखर कारखान्याचं उद्घाटन देशाच्या पहिल्याच पंतप्रधानानं करावं या आग्रहानं.

१९६० साली महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री झालेले यशवंतराव चव्हाण विठ्ठलरावांना खूप मानत. त्यांनी शब्द दिला होता की, ''मी पंतप्रधानांना अवश्य लोणीच्या 'भुताच्या माळा'वर आणीन - त्या भुताच्या माळाचा 'सहकारी आप्पा' तुम्ही आता 'पंचमहाभुताचा माळ' केला आहे. अवश्य मी पंडीतजींना आणेन.''

त्याप्रमाणे प्रारंभी वर्णन केल्याप्रमाणे १५ मे १९६१ रोजी त्यावेळचे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा. यशवंतराव चव्हाण भारताच्या पंतप्रधान पं. नेहरूंना घेऊन बुद्रुक लोणीत आले. त्यांनी उद्गार काढले ते अर्थपूर्ण होते. ते म्हणाले होते - ''२६ जानेवारीला प्रजासत्ताकाच्या दिवशी 'पद्मश्री' घेण्यासाठी विठ्ठलराव भारताच्या राजधानीत आले होते. आज मी त्यांच्या राजधानीत आलो आहे!''

शब्दशः शून्यातून अंगभूत शहाणपणानं, अपार परीश्रमानं भारतीय शेतकऱ्यांच्या आर्थिक आघाडीसाठी जिद्दी व चिवट लढत देणारा विठ्ठलराव एकनाथराव विखे पाटील हा एक दुर्मिळ व सच्चा शेतकरी होता. दि. २७ एप्रिल १९८० रोजी वयाच्या ८२ व्या वर्षी पहाटे-पहाटे विठ्ठलरावांनी आपली जीवन लढत संपविली.

मातीतला हा शेतकरी, मातीचं ऋण फेडून 'मातीतला देशभक्त' हे बिरूद सार्थ करून नगरी मातीत लय पावला!!

❑ ❑ ❑



*श्री. शिवाजी सावंत*

कोल्हापूर जिल्हयातील आजरा या लहानशा गावी जन्म. कोल्हापूर येथील सुप्रसिद्ध राजाराम हायस्कूलमध्ये काही वर्षे अध्यापन. तिथल्या दीड तपातल्या अध्यापकीय जीवनातच **"मृत्युंजय"** या कादंबरीचे लेखन.

**"मृत्युंजय"** ही त्यांची कादंबरी अपार लोकप्रिय ठरली. मराठी भाषेची मर्यादा ओलांडून ती हिंदी, गुजराथी, कन्नड, बंगाली, तेलगू, राजस्थानी, मल्याळी, इंग्रजी इत्यादी भाषांमध्ये अनुवादित झाली आहे.

कोल्हापूर महानगर पालिकेने मार्च २००० मध्ये **"कोल्हापूर भूषण"** पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. *महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार*, दैनिक केसरीचा *साहित्य सम्राट न. चिं. केळकर पुरस्कार*, *ललित मासिकाचा पुरस्कार*, बंगालीतील *ताम्रपटासह पुनमचंद भुताडिया पुरस्कार*, गुजराथी सरकारचा व आसामी भाषांतरकाराचा *केंद्रिय साहित्य अकादमीचा पुरस्कार* आणि भारतीय ज्ञानपीठाचा *मूर्तीदेवी पुरस्कार* अशा अनेक व प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या पुरस्कारांनी ही साहित्यकृती भूषणभूत झाली. विशेष म्हणजे १९९० साली कलकत्याहून रायटर्स वर्कशॉप या संस्थेमार्फत नोबेल पुरस्कारासाठी या मराठी साहित्यकृतीचे नामांकन झाले होते.

**"मृत्युंजय"** च्या भरघोस यशानंतर श्री. शिवाजी सावंत यांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनाचा वेध घेणारी **"छावा"** ही कादंबरी लिहीली. तिला देखील महाराष्ट्र शासनाचा *गौरवशाली पुरस्कार* लाभला. या कादंबरीचे ज्ञानपीठाने हिंदी भाषांतर प्रकाशित केले.

या शिवाय **"लढत"**, **"संघर्ष"**, **"क्रांतीसिंहाची गावरान बोली"**, **"शेलका साज"**, **"अशी मने असे नमूने"**, **"मोरावळा"** ही पुस्तके तसेच **"मृत्युंजय"**, **"छावा"** ही नाटके अशी त्यांची विपूल ग्रंथसंपदा आहे. अलिकडे प्रसिद्ध झालेल्या **"युगंधर"** या श्री भगवान श्रीकृष्णाच्या चक्रवर्ती जीवनावरील महाकादंबरीनेही त्यांच्या लौकिकात मोलाची भर टाकली आहे.

भारतीय ज्ञानपीठ या भारतातील सर्वश्रेष्ठ वाङ्मयीन व्यासपीठाने प्रवर्तीत केलेल्या ताम्रपटासह रु. ५१,०००/- चा १२ वा *मुर्तीदेवी पुरस्कार* १९९४-१९९५ साली तेव्हाचे उपराष्ट्रपती **डॉ. के. आर. नारायणजी** यांच्या हस्ते समारंभपूर्वक प्रदान करण्यात आला. मराठी ज्ञानपीठाचा मूर्तीदेवी पुरस्कार प्राप्त करून देणारे ते पहिले मानकरी ठरले.